

॥ॐ॥

१ मे २०२१, शनिवार

प्रिय मा. लताताई
सादर सप्रेम नमस्कार.

पूर्वी तुमच्या एका वाढदिवसाला आण्णा दिल्लीत होते. त्या वेळी त्यांनी मला लिहिलेल्या एका पत्रात तुमचा वाढदिवस साजरा करण्याचं फर्मान सोडलं होतं. ते फर्मान त्या वेळी अंमलात आणलं तसं आजही त्यांच्या चैतन्यरूप अस्तित्वाने दिलेलं फर्मान अंमलात आणतेय असं समजा !
सोलापूरच्या कामातील मंडळी, सत्संगी साधक, सोलापूरची मित्रमंडळी आणि शेवटी आम्ही मैत्रिणी अशा क्रमाने या धारिणीत लेख वा पत्रं आहेत. कोणत्याही लेखनाचं मुद्रितशोधन वा संपादन न करता जसं आलं तसं लेखन पाठवलं आहे. तेवढा वेळच हाती नव्हता. काही मंडळी तुम्हाला स्वतंत्रपणे लिहितील.
काही ऑडिओज आणि व्हिडिओज WhatsApp वर पाठवले आहेत आणि काही हस्तलिखित किंवा टाईप केलेली पत्रे मेलवर पाठवली आहेत.
आमच्या सर्वांच्या देवचाफ्यांचं सुगंधी प्रेम तुम्हाला यातून पोचावं आणि तुम्हाला निखळ आनंद मिळावा अशी आशा आहे. काही त्रास झाला तर आधीच क्षमा मागून ठेवते. सवडीने रवंथ करत सगळं वाचलंत तरी चालेल...!

गायत्री

# वर्ड फाइलमधील पत्रे वा लेख (एकूण ६१)

वा. उषाताई खिरे
विवेक घळसासी
मंगलताई जोशी
सुजाता गोवंडे
अपर्णा कल्याणी
सुलभा कुलकर्णी
वसुंधरा अनासपुरे
मीना सुमंत
सविता माढेकर
श्वेता औरसंग-वाळवेकर
प्रज्ञा जेरे-अंजळ
प्रमिला कारमपुरी
जयश्री छत्रे
स्वप्ना मित्रगोत्री
ओंकार केळकर
नागेश भोसेकर
धनंजय कुलकर्णी
अग्रजित वझे
शांतामावशी पाटील
श्वेता कनाळे
मुक्ता दाबके
मानसी केसकर
अस्मिता इनामदार
निगडी केंद्रीय समिती सदस्य
विद्या व अविनाश गोडबोले
संजीव कुसूरकर
सीमा व पुरुषोत्तम नगरकर
वासंती देशपांडे
डॉ. प्रेमा जोशी
वैशाली देगांवकर
बारामती ध्यान केंद्र साधक
ध्यानमंदिर, बारामती
गुरुकृपा साधना केंद्र
सुमित्रा शेटे-महाजन
डॉ. जयवंत घाटे
रोहिणी व चंद्रशेखर मोघे
धनश्री ओक
मिलिंद गोरटे
डॉ. हिमांशू वझे
नीला मोरे
अलका काकडे
चंदा पाटील
मंजूषा गाडगीळ
संगीता जाधव
अपर्णा सहस्रबुद्धे
स्नेहल पेंडसे
उमा-गौरी ठाकुर
नलिनी गुजराथी
नीला देशमुख
गीता तांबे
अनुराधा राव
सुप्रिया क्षीरसागर
विदुला बुरसे
सुप्रिया कुमठेकर
मानसी बोडस
कल्पना आठल्ये
संगीता कुलकर्णी
अनिता देशमुख
सुखमणि रॉय
भारती ठाकूर
गायत्री सेवक

## मेलवर स्वतंत्रपणे पाठवलेल्या फाइल्स (एकूण ५३ व्यक्ती)

विद्याताई सप्रे (मेल PDF)
डॉ. नरेंद्र कुंटे (PDF)
सुदाम भोंडवे (PDF)
अनघा लवळेकर (PDF)
अनुराधा (मीरा) तारे (PDF)
प्रतिभा तबीब (PDF)
आशू कुलकर्णी (PDF)
दीपश्री बोकील (PDF)
सुनीता पारखी (PDF)
जयंत आठल्ये (PDF)
सुलभा चिकसे (PDF)
गीता ठाकुर (PDF)
बसवराज देशमुख (PDF)
उमा प्रतिनिधी (PDF)
मुकुंद जेरे (PDF)
डॉ. रवींद्र पुजारी (PDF)
विद्या शिंदे (PDF)
आचार्य गोविंददेव गिरि (फोटो)
यशवंतराव लेले (फोटो)
प्रमोद कुलकर्णी (फोटो)
ललिता नाडकर्णी (फोटो)
रश्मी गंभीरे (फोटो)
कमल शहा (फोटो)
शरद मुजुमदार (फोटो)
माधवी जोशी (फोटो)
प्रतिभा इंगळे (फोटो)
चित्रा कवठेकर (फोटो)
सुनीता मोडक (फोटो)
नीलिमा देव (फोटो)
शिवगंगा सगरे (फोटो)
सुनीता स्वामी (फोटो)
सुचेता वझे (फोटो)
माधुरी खरे-चितळे (फोटो)
डॉ. माधवी रायते (फोटो)
डॉ. इरेश स्वामी (फोटो)
सुनेत्रा पंडित (फोटो)
नारायण कुलकर्णी (फोटो)
सीमा व रमेश कुलकर्णी (फोटो)
उर्मिला करवा (फोटो)
विश्वास जतकर (फोटो)
अनुराधा जोशी (फोटो)
हर्षा किर्वे (फोटो)
चित्रा पुरंदरे (फोटो)
प्रशांत चव्हाण (फोटो)
प्राची सरडे (फोटो)
मेधाविनी वाटवे (फोटो)
ऐश्वर्या अभ्यंकर (फोटो)
उषाताई आठवले (फोटो)
ममता पाच्छापूर-कुलकर्णी (फोटो)
संजीव तागडे (फोटो)
अलका साठे (फोटो)
सिद्धी देव (Word file)
नरेंद्र जोशी (ड्राइव्हवर ऑडिओ)

# Whatsapp वर पाठवलेल्या गोष्टी (एकूण १८)

प्रमिलताई मेढी (व्हिडिओ)
आसावरी रहाळकर (व्हिडिओ)
चारुदत्त आराध्ये (व्हिडिओ)
वीणा बादरायणी (व्हिडिओ)
आशाताई गोखले (फोटो whatsapp)
विनय हर्डीकर (ऑडिओ)
नंदिनी पिंपळापुरे (ऑडिओ)
वनमाला किणीकर (ऑडिओ)
शुभदा पाटील (ऑडिओ)
उज्ज्वल बापट (ऑडिओ)
जयश्री खांडेकर (ऑडिओ)
शुभदा कुलकर्णी (ऑडिओ)
भारती अभ्यंकर-कुलकर्णी (ऑडिओ)
शीला लिमये (ऑडिओ)
संजय गंभीरे (ऑडिओ)
डॉ. नेहा जोशी (ऑडिओ)
सुनीता कुलकर्णी (ऑडिओ)
श्रीनिवास कुलकर्णी (ऑडिओ)

प्रिय,
चि.लताताई,
सप्रेम आशीर्वाद.

सत्तरी पूर्ण करून तुम्ही पुढच्या दशकात प्रवेश करत आहात. तुम्हला उत्तम आरोग्य, सर्व तऱ्हेची वैचारिक, अध्यात्मिक कार्य समृद्धी लाभू देत. तुमच्या वैयक्तिक आयुष्याचे, कार्याचे आणि समाजाचे जे काही कल्पना-चित्र तुमच्या मनात असेल ते पूर्ण होऊ दे अशी शुभकामना. या प्रवासात आमच्यासारख्या अनेकांना तुमच्याकडून लाभ मिळू दे अशी ईच्छा.

मी व माझ्या सर्व कुटुंबियांकडून पुन:श्च शुभेच्छा!

कळावे,

तुमची,
**उषाताई**

अधिक : यानिमित्ताने मनात खूप आठवणी आल्या. मंजिरीच्या सहाय्याने जसे आठवले तसे लिहून ठेवले ते ही स्वतंत्रपणे जोडत आहे.

लताताई आता सत्तरी पूर्ण करत आहेत त्यानिमित्त त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा. त्यांना उत्तम आरोग्य, सर्व तऱ्हेची वैचारिक, अध्यात्मिक कार्य समृद्धी लाभावी, त्यांनी जे वैयक्तिक आयुष्याचे, कार्याचे काही कल्पना-चित्र निर्माण केले असेल ते त्यांच्याकडून पूर्ण व्हावे अशी शुभकामना.

लताताईंचे शिक्षण चालू असल्यापासून मी त्यांना पाहिलेले आहे. परंतु पुण्यात असल्या आणि आमच्या गाठी भेटी जरी होत असल्या तरी प्रत्येक वेळी आमचा जवळून सहवास यायचा असे होत नसे. कारण त्यांच्या अभ्यासात, युवती विभागाच्या कामात त्या आणि माझ्या कामात मी असे बरेच वेळा होत असे. त्यांच्या Ph.D. च्या निमित्ताने आमचा संबंध येत होता. M.A. ला असतांना त्यांना प्रथम श्रेणी मिळाली होती. तसेच Ph.D. साठी स्कॉलरशीप सुद्धा मिळाली होती. डॉ. कोठुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे विद्यापीठातून वाचन कौशल्यावर त्यांनी Ph.D. केली. संशोधन करत असतांना अडचणी येतच असतात पण कुठेही तडजोड न करता आहे ते स्वीकारून त्या पुढे गेल्या.

मा.आण्णांच्या हाताखाली सहाय्यक म्हणून काम करत असतांना, मा.संचालक कार्यालयाचे काम पाहात असतांना, संशोधन संस्थेच्या कामामध्ये मदत करत असतांना संबंध येत होता. परंतु त्यांचा खरा परिचय हा नंतर होत गेला. औद्योगिक संस्थांमध्ये वेगळीवेगळी प्रशिक्षणे होत होती. त्यावेळी प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये मी व लताताई बऱ्याच वेळेला एकत्र असू. डेहराडूनला तिथल्या व्यवस्थापकांचा orientation वर्ग, foundation वर्ग यासाठी आम्ही एकत्र शिकवायला होतो. काही वाचन विषयीचे वर्ग त्यांनी घेतले होते. दिल्लीला सामाजिक कार्यकर्त्यांचे व्यक्तीविकासाचे वर्ग चालू होते ते वर्ग आम्ही हिंदीतून घेतले.

लताताईंनी मा.आप्पा आणि मा.आण्णा या दोघांबरोबर काम केले आहे. संचालक पदावरील व्यक्तींबरोबर त्यांचे स्वभाव खूप भिन्न होते तरी लताताईंनी दीर्घकाळ काम केले, त्यांच्याशी जमवून घेतले. मा.अण्णाच्या बाबतीत तर साहाय्य केलेच पण त्यांच्या इतकीच धुरा पण त्यांनी सांभाळली. या सगळयात त्यांनी त्यांचे स्वतःचे विचार, व्यक्तिमत्व जपले प्रसंगी संघर्ष करावा लागला तरीसुद्धा आणि कुठेही एकमेकांवरचा विश्वास कमी न होता.

लतातार्इंची साहित्यातील गती, लेखन कौशल्य हे प्रबोधिनीच्या खंडातून कळते. पहिल्या दोन खंडांसाठी त्यांचे काहीनाकाही सहाय्य होते. परंतु तिसऱ्या खंडासाठी त्यांचे योगदान अधिक होते. त्यांच्या साहित्यिक गुणामुळे सोलापूर हराळीचे वृत्त सुद्धा रोचक असतात, वाचाविशी वाटतात असे बऱ्याच जणांनी मला बोलून दाखवले. प्रबोधिनीतील अनेक पद्यही त्यांच्या प्रतिभेतून स्फुरली आहेत. अजूनही त्या एखाद्या प्रसंगासाठी चटकन काव्य करत असतात.

लतातार्इंची उत्तम बुद्धी ही पुण्यात ज्ञान प्रबोधिनीत असल्यापासूनच जाणवत होती. त्यांचे भाषेवर, इंग्रजीवर प्रभुत्व होते. पण पुढे ते त्यांच्या कार्यामध्ये जास्त प्रकट व्हायला लागले. पुण्यात असतांना राजस्थानच्या दौऱ्याच्यावेळी सती प्रश्नावर अभ्यास करायला आणि त्या लोकांच्या मुलाखती घ्यायला असे एकूण अभ्यास दौऱ्यात मी त्यांच्याबरोबर होते. रेल्वेचा प्रवास आणि तिथले वास्तव्य हे आमचे एकत्र होते. तेव्हाही त्यांचा तो विषय, अभ्यास, त्यांचे धाडस, त्यांची धडाडी, आणि या प्रश्नावरील त्यांची आत्मीयता याचे दर्शन होत होते. त्या सगळयांना सांभाळून घेत असत. सगळयांकडे त्यांचे लक्ष असायचे.

सोलापूर आणि हराळी येथे गेल्यानंतर त्यांच्यावर कार्याची खरी जबाबदारी वाढत गेली. सोलापूरचे काम अगदी छोटयाश्या जागेतून सुरु करून अनेक संघर्षांना तोंड देत त्यांनी मोठे केले. सोलापूर आणि हरळीच्या कार्यातील प्रत्येक टप्प्या मी जवळून पहिला आहे. त्यामुळे तेथील कार्यकर्त्यांचे आणि कार्याचे दर्शन होत असायचे. हे काम वाढवतांना खूप संघर्ष करावा लागला. केवळ आर्थिक धडपड नाही तर तेथील सरकारी कार्यालयात जाऊन मान्यता घेणे, अनुदान मिळवणे, त्याआधी जागा मिळवणे, नवीन इमारती करता आवश्यक ते सर्व गोष्टी पूर्ण करणे हे सर्व मा.आण्णांच्या बरोबरीने त्यांनी केले. संस्थेची जी अनेक प्रकारची कामे असतात ती सर्व त्यांनी केली. कोणते एक खाते त्यांच्याकडे होते असे नाही. तर सकाळी उठल्यानंतर चहा करण्यापासून दिवसभराच्या स्वयंपाकाची व्यवस्था, मदतनीस असतील पण नवीन इमारत झाल्यावर निवासी लोकं असत त्यांच्याकरता सकाळचा चहा हा लतातार्इंनाच करावा लागत असे. कितीही पाहुणे, अभ्यागत असले तरी सकाळी चहा तयार असायचा नि मग त्या सव्वा सहाला उपासनेसाठी जायच्या. त्यांच्या सकाळच्या साधनेत कधी खंड पडला नाही. हे सगळे करत असतांना त्या केव्हा त्यांचे कार्य नियोजन करत असायच्या ते काही कळायचे नाही. अर्थ कार्यालयातही बघून कुठे सह्या करायच्या असतील, शिक्षकांच्या बैठकी असतील, प्राचार्यांबरोबर बोलणे असेल, त्याबरोबरच ९,१० वीच्या मुलांना इंग्रजी शिकवणे असेल, शिशु शाळेतील मुलांशी बोलणे असेल किंवा निवासी मुलांशी आत्मीयतेने बोलणे असेल या सगळयाच आघाडया एखाद्या कुटुंबातील व्यक्ती जशी आपल्या कुटुंबाला सांभाळते तसे ज्ञान प्रबोधिनीचे सगळे कुटुंब लतातार्इंनी सांभाळले. हे त्यांचे सगळे दर्शन जवळून मला होत होते. हे करत असताना एक विशेष आणखीन जाणवते म्हणजे त्यांचे स्वतःचे वाचन, साधना चालू होते. सतत व्यवस्थापकीय कामे, प्रशासकीय कामे, कौटुंबिक जबाबदाऱ्या, हे सगळे करत असतांना त्यांनी कोणाकडेही दुर्लक्ष केले नाही. स्वयंपाकघराची नुसती देखभाल केली असे नाही तर तेथे काम करणाऱ्या सर्व सेवकांमध्ये त्यांनी स्वच्छता, आतिथ्य, आल्या-गेलेल्यांची आत्मियतेने काळजी घेणे ही वृत्ती जोपासली. तसेच त्यांच्या सर्वांगीण प्रगतीकडेही त्यांनी लक्ष दिले.

लतातार्इंच्या आई-वडिलांचा सहवास अधून मधून मला मिळत असे. प्रबोधिनीचे काम कधी त्या घरूनही करत. तरी त्यांचे त्यांच्या आई-वडिलांकडे पूर्ण लक्ष असायचे. त्यांना त्यांच्या वडिलांकडून वाचनाचा, लिखाणाचा, अध्यात्माचा वारसा मिळाला. सोलापूरला सामाजिक, संस्थात्मक, संघटनात्मक कामाचा संघर्ष त्यांना करावा लागला. लताताई म्हणजे प्रत्येक व्यक्तीची काळजी घेणाऱ्या. त्यामुळे त्यांना याचा ताण जाणवत होता. पण या सगळ्या अडचणींना तोंड देत त्या पुढे जात होत्या.

हरळीला जेव्हा भूकंपात हा भाग उध्वस्थ झाला तेव्हा तिथे जाऊन आपण काम सुरु करायचे असे सोलापूच्या कार्यकर्त्यांना वाटले. या कामाबद्दल सर्वांना माहितीच आहे. परंतु असे काम सुरु करतांना त्याचा मुख्य आधार हा लताताईंचा  होता. त्यामुळे लताताई तिथे हरळीच्या कामात पहिल्यापासून होत्या. तिथल्या कामामध्ये सगळ्या अडचणींना त्यांनी तोंड दिले. या सगळ्या कामात त्या खूप थकून जायच्या. त्यांना विश्रांतीची पण गरज असायची. या सगळ्या व्यवस्थापकीय, प्रशासकीय कामात झोकून दिल्यानंतर मुळात त्यांचा स्वभाव जो होता वाचन, लेखन, चिंतन, मनन आणि अध्यात्म याची त्यांना गरज होती. त्यामुळे त्यांनी एक वर्षभर या सगळ्यातून रजा घेऊन मौनात राहून अध्यात्मिक साधना केली. एखाद्याला वाटेल अध्यात्म म्हणजे काय करत असतील. त्यांचा सत्संग लोकांना माहित होता. पण हा अध्यात्म त्यांचे स्वतःचे चित्त व्यापक करत गेला. रामकृष्ण मठासाठी त्यांनी खूप लेखन केले. त्याच्या लाखांच्या वर प्रती गेल्या. रामकृष्ण माठातील विचारांचा आणि साहित्याचा प्रसारासाठी  लताताईंच्या लेखनाचे खूप मोठे योगदान झाले. फक्त एखाद्या व्यक्तीसाठी लताताईंनी केले असे नाही, कौटुंबिक परिवार, प्रबोधिनीला सांभाळले असे नाही तर त्याच्या पलीकडे जे समाजासाठी मानवतेसाठी करायचे ते पण त्यांनी सांभाळले. म्हणजे त्यांच्या सत्संगाचा अर्थ खूप वेगळाच घ्यावा लागेल. स्वामी विवेकानंद, स्वामी रंगनाथन, उपनिषद यावर लेखन करत असतांना सुद्धा आधुनिक मानसशास्त्र व समाजशास्त्र याची धडपड त्यांना आहे. त्यामुळे Maslow Need hierarchy यावरही त्यांचे प्रभुत्व आहे. त्याचे आधुनिक संदर्भ सुद्धा त्या रस घेऊन पाहत असतात.  आजकाल असे वाटते कि बरेच लेख हे केवळ publisher perish बाहेर असल्यामुळे अनेकजणांना व्यवहारात आपले काम प्रसिद्ध करण्याची गरज वाटते आणि त्याकरिता वेगळ्या वेगळ्या मार्गाने त्यांची प्रकाशने होत असतात. परंतु आपले विचार आपले काम त्यातून सामाजिक बदल यासाठी लेखन करणे त्याकरिता आपले विचार पुढे नेणे हे काम करणे थोडे अवघड आहे पण हा लताताईंचा  सहज स्वभाव आहे.  खूप लेखन केले आहे त्यांनी. त्यांची प्रवचने ज्यांनी ऐकली त्यांना त्यांच्या ज्ञानाची व्यापकता कळेल. जे ज्ञान कर्मशील असते ते अधिक  महत्वाचे, किंवा ते अधिक व्यापक  असते. त्यांचे ज्ञान  हे कर्मशील झालेले  आहे. लताताई जेवढ्या अत्यंत तज्ज्ञ आणि शिकलेल्या परदेशी माणसाशी सहजतेने वागू शकतात, बोलू शकतात, संवाद करू शकतात त्यात त्यांना  कुठलाही ताण येत नाही. तेवढ्याच हरळीतल्या ग्रामीण भागातल्या अतिशय अशिक्षित असलेल्यांशी सुद्धा त्यांचा सहज संवाद असतो. कमावलेले संवाद कौशल्य आणि रक्तात भिनलेले संवाद कौशल्य यातला जो फरक असतो तो इथे आपल्याला नक्की दिसतो. वत्सलता त्यांच्या स्वभावात सहज दिसते.  तो अविभाज्य भाग आहे. त्यांच्या रक्तात  भिनलेला गुण आहे.

अनेक गोष्टी सांभाळतांना, coordinate करत असतांना गोंधळ होत नाही असे नाही. परंतु त्यात काम करणाऱ्यांची उर्मी असते, प्रत्येक व्यक्तीला हे काम लताताईंनी पहिले म्हणजे बरे असते असेही वाटते.

लताताईंची अध्यात्मिक साधना म्हणजे स्वतःचे मौन, ध्यान, प्रवचने, सगळ्या साधुसंतांचा विचार, सत्संग, संतांची प्रवचने.

प्रभावी व्यक्तिमत्व सगळीकडेच स्वीकारले जाते, हवेहवेसे वाटते परंतु लताताई सर्व प्रकारच्या व्यक्तींबरोबर जमवून घेणाऱ्या आहेत. दर्शनी व्यक्तिमत्वाच्या पलीकडचा माणूस लताताईंना समजतो आणि त्या सहज संवाद साधू शकतात.

कार्यकर्त्यांशी त्यांचा आत्मीयतेने संवाद असतो . कार्यकर्त्यांची प्रगती होत राहील इकडे त्यांचे लक्ष असते आणि त्यासाठी  त्या वेळही देत असतात. कार्यकर्ते घडणीमध्ये त्यांना रस असतो आणि आवश्यक ती मदतही करत असतात. या व्यक्ती कोठेही असल्या तरी त्या लताताईंचे मागदर्शन घेत असतात.  त्यांना गैर वर्तन आवडत नाही. त्याची जाणीव त्या लगेच करून देतात. आवश्यक तेव्हा शिक्षाही करतात. त्याशिवाय माणूस घडत नाही. हा त्यांचा  स्वभाव आहे. त्यात कृत्रिममा नाही.

प्रबोधिनीच्या शिक्षण पद्धतीत भावकोशाला महत्व दिले पाहिजे हे लक्षात आल्यावर त्या विषयाची प्रमुख जबाबदारी लतातार्इंनी घेतली आणि त्यांच्या बरोबर काम करण्याची मला संधी मिळाली. यासाठी काही मुलाखती घ्यायच्या ठरल्या तेव्हा लक्षात आले की कुठलेही केंद्र असू दे लताताईंचा सगळ्यांशी अगदी सहज संवाद होतो. त्याचप्रमाणे त्यांनी शिक्षण विषयक व कार्यकर्त्यांच्या सर्वांगिण विकासासाठी, कौटुंबिक जीवनातील व कार्य जीवनातील स्वास्थ्यासाठी, प्रगतीसाठी त्यांनी किती विचार केला आहे ते लक्षात येते.

प्राचीन भारतीय विचार, योगाभ्यास, अर्वाचीन साहित्य या सगळयाचा एकत्र विचार लताताईंचा झालेला आहे. या सगळ्याला त्या गवसणी घालू शकतात. ही त्यांच्या बुद्धीची आणि अनुभवाची व्यापकताही त्याला कारणीभूत आहे.

लताताईंचे विद्याव्रत अजून चालूच आहे. जेव्हा त्यांनी मोठ्या जबाबदाऱ्या घेतल्या तेव्हा वीरव्रत घेतलेले अजूनही सुप्त स्वरुपात आहे. सेवाव्रत तर त्यांच्या अंगी मुरलेलेच आहे. या तिन्हींचे आचरण आपल्याला लताताईंमध्ये दिसते.

आत्तापर्यंतच्या वाटचालीत त्यांना काही त्रास झाले नसतील का? जरूर झाले असतील. परंतु ते त्यांनी मागे टाकले आहेत. कुठेही त्यांच्या मनात कटुता राहिलेली नाही. मनाची उदारता आणि क्षमाशीलता ही त्यांच्याकडे अनुभवायला मिळते. हे अध्यात्मिक विकासाचे आचरणात पडलेले प्रतिबिंब आहे असे मला वाटते.

त्या पुण्यात आल्यानंतर अधूनमधून आमच्या भेटी घरी होतात. मुद्दाम आवर्जून त्या माझ्या घरी येतात. तेव्हा सर्वच कुटुंबियांची त्यांची भेट होते. कॅनडात मा. आण्णा आणि त्या गेल्या असतांना आवर्जून त्यांनी माझ्या मुलीकडे थोडे वास्तव्य केले. मुलगी, जावई, मुलगा, सून, नात, धाकटे बंधू आणि अलिकडेच परिचित झालेला माझा चुलत भाचा या सर्वांना त्यांच्याबद्दल स्नेहादर वाटतो आणि सोलापूर हराळीच्या कामाबद्दल आत्मियता वाटते. लताताई पण त्यांच्या स्नेहाची दखल घेत असतात.

या सगळया प्रवासात त्यांच्या अध्यात्मिक उंचीमुळे त्यांनी एक आनंद मिळवला "हे आनंदी गाणे" असेच पुढे वाढो, त्यांनी गुणगुणत राहो आणि आम्हाला ऐकयला मिळत राहो हीच सदिच्छा.

**- उषा खिरे**

********************************************************************************

**अध्यात्म-तरुवरील 'स्वर्णलता !'**

लताताईंनी आपल्या जीवन साधनेची सत्तर वर्षे पूर्ण केली आहेत. या आनंदाच्या क्षणी माझ्या डोळ्यासमोर घटना-प्रसंगाचा एक पट आपसुक उलगडतो आहे.

सोलापुरात पुण्याच्या 'ज्ञान प्रबोधिनीचं' आगमन झालं त्याला साधारण तीन तपे होत आली. या आगमनानं लताताई नावाचं एक शांत सात्विक व्यक्तिमत्त्व माझ्या परिचयाचं झालं. नावाशी ओळख तशी जुनीच होती. पुण्याच्या 'तरुण भारता'त लताताईंचे लेख येत असत. युवकांसाठीचं हे लिखाण मी वाचत होतो. पण प्रत्यक्ष त्यांच्याशी ऋणानुबंध जुळला तो केळकरबाईंची सोलापूरची शाळा ज्ञानप्रबोधिनीकडं हस्तांतरित झाल्यावर ! आज त्या वयाच्या एकाहत्तरीत पदार्पण करत असताना मला होणारा सहज आनंद; या प्रदीर्घ आत्मीय यात्रेचा परिणाम आहे.

लताताईंच्या शैक्षणिक योगदानाचा, राष्ट्रीय कार्यातील त्यांच्या कार्याचा, बालकामगारांच्या शिक्षणासाठी त्यांनी केलेल्या उत्तम कार्याचा, सोलापूरच्या शाळेसाठी लगतची जागा उपलब्ध करण्यासाठी त्यांनी केलेल्या अथक परिश्रमाचा, सोलापुरातील त्यांच्या, विविध शिक्षण संस्थातील उपक्रमांचा आढावा घ्यायचा तर एक ग्रंथच तयार होईल. या आणि अशा गतिविधीत त्यांच्या बरोबरीनं सहभागी झालेल्या सहकारी बंधू-भगिनींच्या

मनोगतात तो विषय येईलच ! या आनंद क्षणी मी, कृतज्ञतापूर्वक, माझ्या जीवनातील काही गोष्टींबाबत काही लिहीन !

माझ्या जीवनातलं एक परिवर्तन घडण्यास लताताईंचा वाटा मोठा आहे. मी लेखन करत होतो, संपादकाला ते करावंच लागतं. भाषणंही करत होतो. संपादकाला अशी कार्यक्रमाची शोभा वगैरे वाढवण्यासाठी बोलावंच लागतं. पण लेखी वा मौखिक अभिव्यक्तीला म्हणावी अशी दिशा नव्हती. अधिष्ठानही नव्हतं. त्यामुळं नैमित्तिक गरजा भागवणारा छोटा दुकानदार असतो ना तसं माझं होतं. रंगपंचमीली पिचकारी, रंग विकावेत, नारळी पौर्णिमेला राख्या विकाव्यात, संक्रांतीला पतंग विकावेत, गणपतीत गणपतींच्या मूर्ती अन् दिवाळीत फटाके... पण नक्की काय तर रामा-शिवा-गोविंदा !

माझ्या बोलण्याला दिशा दिली ती सोलापुरातल्या माझ्या 'वाग्यज्ञ' या प्रवचनांच्या उपक्रमानं ! हे उपक्रम यशस्वी होण्यासाठी करवलीसारख्या उभ्या राहिल्या लताताई ! प्रवचनासाठी निवडायचे विषय, मराठी-संस्कृत शब्दांचे अचूक उच्चार अशी तयारी त्या करुन घेत. मुद्दाम करुन घेतो आहोत हे जाणवू न देता त्या हे करत.

माझी ही दिशा कारणापुरती राहू नये म्हणून मग लताताईंनी मला, प्रबोधिनीतील रविवारच्या उपासनेत, अध्यात्मपर शिबिरांत सतत बोलावले. व्यासपीठ दिले. जमिनीवर इतर श्रोत्यात मी बसू शकत होतो पण लताताई ( गायत्रीताई आणि रघुकाकाही ) मला छान 'बसकर' असलेल्या खुर्चीवर बसवण्याची व्यवस्था करत/ करवीत. केवढा अहंकार सुखावे म्हणून सांगू ! आता कळतं की वांड विद्यार्थ्याला मॉनिटर बनवण्याची ही शैली होती ! पण हळुहळू मला उमगलं की हे आसन पक्कं तेव्हाच होतं जेव्हा काही अधिष्ठान लाभतं !

दिशा देणाऱ्या लताताईंनी मला आणि माझ्या बायकोला स्वामी माधवनाथांच्या पायावर अलगद घातलं. आणि अविष्कार, अभिव्यक्तीच्या सोसातून अनुभूतीच्या दिशेनं मला वळवलं. 'देव आणि देश' या दोन तारीवर वाटचाल सुरु झाली. आज जे काही वक्तृत्वाच्या क्षेत्रात मला लाभलं आहे त्यामागं ही 'शक्ती' आहे.

माझ्यासाठी लताताई मोठी बहीण, सुख-दु:खाच्या क्षणी एक मैत्रिण, योग्य वेळी मार्गदर्शन करणारी सल्लागार अशा विविध रुपांनी आहेत याचा मला अभिमान वाटतो. अध्यात्म-तरुवरील ही स्वर्णलता जीवनाचा ताल सांभाळण्याची प्रेरणा देणारी आहे.

मी सोलापूर सोडून नागपूरला आलो. लताताईंच्या सहवासाचे क्षण अंतरले. क्वचित सोशल मिडियाच्याद्वारे संपर्क होतो. पण नित्यतेचा आनंद त्यात कसा असणार ? असं असलं तरी रोज दोनदा लताताईंची हमखास आठवण उजळतेच ! एकदा मी, माझी पत्नी, गायत्रीताई आणि आण्णा असे आम्ही आळंदीला गेलो होतो. योगायोगानं आमच्या लग्नाचा तो वाढदिवस होता. आळंदीत लताताईंनी आम्हा दोघांना ज्ञानदेवांची मूर्ती दिली. आमच्या देवघरात ती आहे. सकाळी पूजेच्या वेळी आणि संध्याकाळी दिवा लावताना ती मूर्ती दिसते आणि आळंदीचा सगळा प्रसंग आठवतो !

लताताई, तुमच्या स्वस्थ आणि साधक-पथदर्शी दीर्घायुरारोग्यासाठी लाख लाख शुभकामना !

**-विवेक घळसासी**

*******************************************************************************

।। श्री ।।

"ज्ञानोपासक-मौन तपस्विनी, वं . लताताई

सश्रध्द नमस्कार.

तुमच्या ७० व्या वाढदिवसानिमित्त, मला जी कृतज्ञता व्यक्त करावयाची आहे त्या संदर्भात "वाचे बोलता न ये" अशी परिस्थिती असल्यामुळे मी काहीही करू शकत नाही. पण, "तुम्हाला ,उत्तम आरोग्यासह उदंड आयु अन् सुख समृध्दी लाभो" अशी मनःपूर्वक प्रार्थना "माझ्या गुरुदेवांना" नक्की करेन .

माझी तब्येत बरी आहे. तुम्हाला दिलेला शब्द पूर्ण करून घेणे न घेणे हे मात्र गुरूदेवांच्या मनाप्रमाणे होणार आहे.

तुमची

मंगलताई **(मंगलताई जोशी)**

*****************************************************************************

आदरणीय लताताई,

मला, मी शाळेत असतानाचे सर्व दिवस आठवले.

तुमच्या उत्साहित चेह-यामुळे आमचा उत्साह द्विगुणित व्हायचा.

तुमच्याकडूनच आम्ही सर्वजण उत्तमता शिकलो.

आपला साधेपणा आणि हसतमुख चेहरा मनाला भारावून टाकायचा.

त्यामुळेच आम्ही सर्व आपल्या कुटुंबासाठी काम करत आहोत असं वाटायचं.

स्वाती म्हणते मी शाळेत शिकवताना उत्तमता, प्रत्येक काम मनापासून आणि १००% करण्यासाठी मला आदरणीय आण्णा, लताताईंचे स्वभावविशेष यांची विशेषत्वाने जाणीव होते. आठवण होते.

अनिरुद्ध ही म्हणतो की या उत्तमता या गुणाचा मलाही जीवनात खूपच उपयोग होतो.

लताताई, तुम्हाला माझ्या, स्वाती आणि अनिरुद्धच्या वाढदिवसाच्या खूप खूप खूप शुभेच्छा व शतशः प्रणाम.

तुम्हाला दीर्घ आणि निरोगी आयुरारोग्य लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना.

**सौ सुजाता गोवंडे**

*****************************************************************************

आदरणीय डॉ. स्वर्णलता भिशीकर (प्रिय लताताई) यांच्या सत्तरी पूर्तीनिमित्त एक छोटीशी काव्यभेट.वार्षिक वृत्तांमधील लताताईंच्या कार्यसंकलनावर आणि त्यांच्याविषयी थोरा-मोठ्यांनी लिहिलेल्या लेखांवरआधारित केलेला हा अल्पसा प्रयत्न)

भूलोकीच्या रे देवचाफ्या, त्रिवार वंदन तुला !
शब्द जिचे कल्लोळ अमृताचे
मितले मवाळ रसाळ साचे
भिशीकरांची कुलभूषणा
कुसुम - चंद्रशेखरात्मजा
भूलोकीच्या रे देवचाफ्या
त्रिवार वंदन तुला!
भारती -क्रांतीची तू अनुजा
आनंदाची तू अग्रजा
सात्त्विक,शालीन,सोज्वळ भगिनी
नाव तुझे ग स्वर्णलता
भूलोकीच्या रे देवचाफ्या

त्रिवार वंदन तुला!
रा.स्व.संघाचा बाणा घेऊनी
रा.से .समितीचा ताणा जोडूनी
राष्ट्रसेवेचे कंकण लेवुनी
घडली थोर राष्ट्रसेविका
भूलोकीच्या रे देवचाफ्या
त्रिवार वंदन तुला!
शाळा -कॉलेज -आत्ममग्नता
रुग्णसेवेचे मानस जपता
झाली भेट ती वं.आप्पांशी
उमलली पहाट परिवर्तनाची
भूलोकीच्या रे देवचाफ्या

त्रिवार वंदन तुला !
अनासक्त तू,देशभक्त तू
मूर्ती सोशिकतेची
ईश्वरनिष्ठा तुझी अलौकिक
साधेपण हे वलय संस्कारा
भूलोकीच्या रे देवचाफ्या
त्रिवार वंदन तुला !
मानसशास्त्री बी.ए. एम. ए.
संशोधनी विद्यावाचस्पती लेणे
तुरा खोविला मानाचा तो
यशाच्या भरजरी मुकुटा
भूलोकीच्या रे देवचाफ्या
त्रिवार वंदन तुला !
संशोधन न् वर्गसंचालन
व्याख्याने अन् कार्यशाळा
परिसंवाद न् चर्चासत्रे
शिबिरांचा तो रंग निराळा
प्रफुल्लित सुगंधित मनाच्या
भूलोकीच्या रे देवचाफ्या
त्रिवार वंदन तुला!
विद्यार्थी-अध्यापक-
व्यवस्थापक - वैज्ञानिक
शासकीय संस्था न् औद्योगिक
शिक्षण- मानस-समाजशास्त्र
तत्त्वज्ञान- आध्यात्मिक
प्रशिक्षणे वाढवी
बुद्धिमत्ता -गुणवत्ता
भूलोकीच्या रे देवचाफ्या
त्रिवार वंदन तुला !
प्रांत-राष्ट्र-आंतरराष्ट्रीय ख्याती
भगिनीसंस्थांशी स्नेहबंध तो किती
नरवीर चरित्रमालिका न्
प्रासंगिक उद्बोधन
तणावमुक्ती-कौशल्यविकसन
नित्य नवे दालन
कर्तृत्वशिखरी विराजणाऱ्या
भूलोकीच्या रे देवचाफ्या

त्रिवार वंदन तुला!
जीवनचरित्रे कित्येक,
असंख्यात अनुवाद ,
संस्कारपोथ्या लेखन,
परीक्षणे कित्येक
स्फुटलेखन -नाटिका -
प्रवेश -एकांकिका
यशोदारचित देवचाफ्याचे
भावसौंदर्य अवलोका
साहित्यप्रतिभेने नटलेल्या
भूलोकीच्या रे देवचाफ्या
त्रिवार वंदन तुला!
संतसाहित्य-अनुभवकथन
ग्रंथसंपादनांची लाट
उजळीतसे आत्मोल्लासाची
गहन-गूढ ती वाट
घनगर्जितसे शब्द ठाम ते
वळवी अवघड घाट
उपनिषदांचा संदेश जीवना
देई सुबोध पाठ
संस्कृतिप्रेषक हे,
भूलोकीच्या रे देवचाफ्या
त्रिवार वंदन तुला!
प्रत्येकअक्षरा लाभला
सरस्वतीचा नादमय झंकार
शब्दकळेने नटलेले
वार्षिक वृत्त सुंदर
साहित्यसंपदा तव किती
वर्णावी , हे माते शारदे!
तव परिसस्पर्शे या लोहाचे
स्वर्ण व्हावे असा वर दे!
व्याकुळवेडी ,आवेगओली
गंधहूल जपणाऱ्या,
भूलोकीच्या देवचाफ्या
त्रिवार वंदन तुला!
कित्येक भूसंपादने -परवाने
कित्येक वास्तू बांधकामे

कित्येक परदेशी दौरे अन्
कित्येक चळवळी आंदोलने
व्यक्ती अन् गावांची
कित्येक पुनर्वसने
कित्येक उपक्रम - प्रकल्प
कित्येक भूकंप न् नंतरची कामे
कित्येक सोहळे अन्
कित्येक संघर्ष वादळे
अंतरीची कर्मज्योत
प्रदीप्त ठेवणाऱ्या ,
भूलोकीच्या रे देवचाफ्या
त्रिवार वंदन तुला!
शासकीय पाठपुरावा
निधिसंकलन- प्रकल्पलेखन
साखरशाळा- साक्षरता प्रसार
बालकामगार पुनर्वसन
बालसंस्कार केंद्रे,
प्रौढ प्रशिक्षणवर्ग,
गुरुकुल वसतिगृह ,
न् सौरऊर्जा प्रकल्प
शिक्षण-शेती,
ग्रामविकसन
स्त्रीशक्ति प्रबोधन
संकल्पपूर्तीच्या हे मेरुमणी,
भूलोकीच्या रे देवचाफ्या
त्रिवार वंदन तुला!
सत्संग-संस्कार विभाग स्थापना,
मूलभूत जनसंपर्क
कलशारोहण चतु:समारंभ,
ते मानबिंदू सर्वार्क
या बहुविध कार्यापुढती
शत पुरस्कार नतमस्तक होती
समर्पण त्याग सेवा परिश्रमाच्या
या तर सहस्राहुती
सर्व धर्म-संप्रदायांना
सामावून घेणाऱ्या,
भूलोकीच्या रे देवचाफ्या
त्रिवार वंदन तुला !
राष्ट्रीय-सामाजिक जाणीव-जागृती ,
हे तर मोठे कार्य
सुवर्णमंदिरातील
कडव्या सीखांना
निर्भय आवाहन ,
याचा,वाटतो आम्हा गर्व
पंजाब सद्भाव यात्रा
हे तर अविस्मरणीय पर्व
शबद कीर्तनाने शीख बांधव
जागृत झाले सर्व
राष्ट्रीय आव्हाने अन्
आवाहने झेलणाऱ्या,
भूलोकीच्या रे देवचाफ्या
त्रिवार वंदन तुला !
वं.आप्पा पेंडसे,
डॉ.आण्णा ताम्हणकर,
स्वामी माधवनाथजी ,
वं. विमलाजी ठकार,
पू गुळवणी महाराज ,
पू.स्वामी रंगनाथानंदजी,
आचार्य किशोरजी व्यास,
स्वामी श्रीकांतानंदजी
सुजनांचे कृपाशीर्वाद,
कार्यप्रेरणा अन् सत्संग
लताताई,खरोखरच अपुले
जीवन आहे धन्य
मांगल्यस्वरूपा हे
भूलोकीच्या रे देवचाफ्या
त्रिवार वंदन तुला!
आप्पांची मानसकन्या
ज्ञानप्रबोधिनीची विश्वस्त
सचिव ,कार्यवाह, केंद्र उपप्रमुख
या नात्याने सदैव कार्यात व्यस्त
तेजस्विनी तू तपस्विनी
निरलस समाजसेविका
थोर शिक्षणतज्ज्ञ अन्

उत्तम पुरोहिता
भूलोकीच्या रे देवचाफ्या
त्रिवार वंदन तुला !
अगत्यशील तू सुगृहिणी
जशी झुंजार कार्यकर्ती
रसाळ प्रवचनकारा तशी
महान अध्यात्मयोगिनी
समुपदेशिका तू ,तू प्रबोधिका
समर्थ संस्थाचालिका न्
कुशल रुग्णसेविका
विदुषी ही तर तुझीच ओळख
त्याहून प्रेमळ माता
भूलोकीच्या रे देवचाफ्या
त्रिवार वंदन तुला !
शांत -तेजसी- स्निग्ध- राजसी
मृदू -कोमल- निर्मल -सुंदर
चैतन्याची सळसळती लहर
उत्साही अन् घनगंभीर
निर्जन एकांती रमणाऱ्या
भूलोकीच्या रे देवचाफ्या
त्रिवार वंदन तुला!
भैमरथीचे निमित्त झाले
सुहृद स्नेही सु-मने जमले
अवघे संतजन सज्ज जाहले
शुभाशीष देण्या तुला
भूलोकीच्या रे देवचाफ्या
त्रिवार वंदन तुला !
त्रिवार वंदन तुला!!
त्रिवार वंदन तुला!!!

**डॉ.अपर्णा कल्याणी**
ज्ञान प्रबोधिनी,
सोलापूर.

*************************************************************************

आदरणीय लता ताईंना साष्टांग नमस्कार

ताई आपण 71 व्या वर्षात पदार्पण करीत आहात यानिमित्ताने आम्ही सर्व प्रबोधक व प्रबोधिकाआपल्याला आरोग्यपूर्ण दीर्घायुष्य लाभावे अशी ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहोत

बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले या उक्तीनुसार मी आपल्याला वंदन करीत आहे .सोलापूर केंद्र आणि हराळी च्याउभारणी आणि विस्तार त्याच बरोबर मी व माझ्या सारख्या असंख्य व्यक्तींची जडणघडण यासाठी तुम्ही घेतलेली मेहनत सदैव आठवत राहते .बालशिक्षण का वकसे करावे? मूल त्याच्यातल्या मूलभूत क्षमता कशा समजून घ्याव्यात हे आपल्याकडून समजून घेता घेता जीवनाचे ध्येय काय असलं पाहिजे काम करताना 'जनीजनार्दन भाव'ठेवून काम कसे करावे याचा वस्तुपाठच आपण घालून दिलात .आपला सेवाभाव मी खूप जवळून पाहिला आहे एकदा पंढरपूरच्या कुसुमताई आराध्ये प्रबोधिनीत मुक्कामाला होत्या त्यांचे आदरातिथ्य उत्तम झालेच पण झोपताना तुम्ही त्यांचे पाय चेपून दिलेत दुसऱ्या दिवशी सकाळी ही गोष्ट मला सांगताना कुसुम ताईंना गहिवरुन आले. त्या मला म्हणाल्या मला संत सहवास लाभला त्यांच्याकडून सेवा घेण्याची माझी योग्यता नाही .पण त्यांच्या रूपाने मला प्रत्यक्ष आई रुक्मिणी मातेने स्पर्श केला .असे कितीतरी वेळ त्या बोलत होत्या. मी ज्यावेळी पंढरपूरला त्यांना भेटायला जाई त्यावेळी त्या आपल्याविषयी भरभरून बोलत असत अशी आपल्या सेवाभावाची कितीतरी उदाहरणे मी जवळून पाहिली आहेत. वाणीतील कोमलता. वर्तनातील ऋजुता.,प्रेमळ सहवास आम्हालाच काय पण शाळेतील बाल गोपालांनासुद्धा हवाहवासा वाट. शाळेत वरती ताई दिसल्या नाही तर आपल्याला पाहण्यासाठी मुलं तळघरात चक्कर मारून येत असत.शाळेतल्या विद्यार्थ्यांपासून ते अनेक

संघटनांचे कार्यकर्ते पदाधिकारी आपल्यामुळे प्रबोधिनीशीजोडले गेले .अगदी निरपेक्ष पणे सर्वांना सहजपणाने आपण जोडून घेत असत.
मला स्वतःला आपल्या सहवासातले अनेक मौलिक अनुभव आहेत की जे कधी तुमच्या समोर व्यक्त करता आले नाहीत अध्यापिका विद्यालयात दर शनिवारी माननीय गायत्री ताई उपासना घेत असत आणि तुम्ही विद्यार्थिनीशी संवाद साधत असत. आपण  दहा पंधरा मिनिटाचा वेळ  देत असत त्यातून माझ्या आत्मिक विकासाला खूप म्हणजे खूपच मदत झाली .मनोव्रुत्तीतही बदल झाला. आपण अनेक वेळा स्वामी विवेकानंदा विषयी बोलत असत त्यांचे चरित्र ऐकताना माझ्या मनात काही शंका निर्माण झाल्या त्याचे तुम्ही स्वप्नात दृष्टांत देऊन निरसन केलेत. आणखी एक प्रसंग एका रविवारी सकाळी मी अक्कलकोटला जाऊन आले होते आणि चार वाजता सत्संगासाठी प्रबोधिनीत आले तुम्ही विचारले अक्कलकोट वरून प्रसाद आणला का प्रसाद ?काय घडले हे मलाही कळले नाही मी झटकन माझ्या हाताची ओजळ आपल्यासमोर धरली आणि आश्चर्य म्हणजे हातातून अत्तराचा सुगंध दरवळत होता जणू प्रत्यक्ष स्वामीजींनी आपल्याला तो सुगंध रूपी प्रसाद पाठवला होता .असेच आपण एकदा बार्शीला नानासाहेब काळे यांच्या आश्रमात गेलो होतो. तेथील  वेद अध्ययनकेंद्रातील सर्वात छोटा पाच वर्षाचा मुलगा तुम्हाला एवढा  बिलगला होता आणि तुमचा आणि त्याचा संवाद हा जणु काही पूर्वजन्मीची ओळख दाखवत होता. असे नानासाहेबांना देखील वाटून गेले. गुजरात सहलीत तर केवळ आपल्या कृपाशीर्वादाने संत श्री विमलाजीच्या शेजारी बसून प्रसाद ग्रहण करण्याचे भाग्य लाभले.
आचार्य किशोरजी व्यास अर्थात्गोविंद जी गिरी ,स्वामी,माधवराव नगरकर, नानाजी देशमुख ,स्वामी भौमानंद जी आपले पिताजी काही बापूसाहेब कै. सरलताईबाबर आदरणीय निवेदिता दीदी अशा कितीतरी ऋषितुल्य व्यक्तींचे विचार ऐकायला मिळाले त्यांचे जवळून दर्शन घेता आले ते केवळ आणि केवळ आपल्यामुळेच.
अध्यापकांच्या पंचकोश विकसनासाठी तुम्ही वर्षानुवर्षे प्रयत्न करीत आहात. वा .ना .दांडेकर ,वि.वि.चिपळूणकर प्रबोधिनीचे अनेक ज्येष्ठ कार्यकर्ते मा श्री .शरद राव सुंकर ,शिरीष जोशी, अनेक जण .यासारख्या दिग्गजांच्या मार्गदर्शनाचा लाभ झाला. आजही वयाच्या सत्तराव्या वर्षी सुद्धा तेवढ्याच ऊर्जेने प्रसन्नतेने आपले मनुष्य घडणीचे कार्य चालूच आहे
. प्रबोधिनीची संपूर्ण प्रार्थनाच
आपण प्रत्यक्ष आचरणात आणून दाखवलीत .ताई शतशः प्रणाम
आपली कृपाभिलाषी
**सौ. सुलभा कुलकर्णी**
*******************************************************************************

मा. लताताईचा परिचय होऊन उणीपुरी तीस वर्षे झाली. मागे वळून पाहताना आजही ती पहिली भेट आठवते. त्यांच्या व्यक्तिमत्वाने , गोड आणि आश्वासक बोलण्याने भारावूनच टाकले. खूप जुनी ओळख असल्यासारखेच वाटले. बाल विकास मंदिर मध्ये मुलींच्या प्रवेशासाठी गेले होते मी अन मला नोकरी मिळाली. ती स्विकारतानाच विचार हाच होता की, स्व.आण्णा व मा. ताई यांचा सहवास मिळेल आणि तेच वेतनापेक्शा जास्त मोलाचे होते. हेही ऋणानुबंध असावेत कदाचित.
आमच्यासाठी मा. आण्णा, लताताई आणि गायत्रीताई म्हणजेच प्रबोधिनी परिवार होता सुरुवातीस. दैनंदिन शालेय कामकाजासोबतच शालाबाह्य उपक्रम व नियमित बैठकातून कार्यपरत्वे जवळीक वाढली. सखोल अभ्यास, सुस्पष्ट विचार, शिस्तीचा आग्रह, छाप पाडणारे बोलणे व अध्यात्मिक अधिष्ठान इ. जाणवले आणि अंगवळणी पडत गेले. मनोमन त्याना गुरुस्थानी कधी बसवले ते कळलेच नाही. साप्ताहिक सत्संगातील प्रवचने ही

तर आठवड्याची संजीवनीच. आणि मनात असे ठरवले की मा. लतताताई जे सांगतील ती गुरुआज्ञाच समजून कधीच नाकारायचे नाही. आमचे हराळीत येणे हा त्याचाच एक भाग.

बाल विकास मध्ये 15 वर्षे नोकरी केली. सेवक ते कार्यकर्ता असा प्रवास मा. ताईंच्या प्रेरणेनेच झाला. शालेय सहलीचे नियोजन —(विद्यार्थी,शिक्षक,सत्संग यांच्या ) – सहलीतून विशेष आनंद मिळण्यासाठीची धडपड, त्या काळात त्यांचे अनौपचारिक मोकळे वागणे, सर्वसमावेशकता, अडचणीना यशस्वीरित्या तोंड देणे इ.गोष्टी त्यानीच शिकविल्या. त्या शिवाय बर्ची नृत्य, मिरवणुकांचे मा. आण्णाच्या मार्गदर्शनाखाली सराव, सादरीकरण इ. आम्ही त्यांचे कडूनच शिकलो. मा. लतताताई पाठ पाहणार असे समजले तरी एक दडपण यायचेच – अगदी स्वाभाविक रित्या. त्या निरीक्षणानंतर खूप छान समजावत. एक विश्वास निर्माण होत असे.. आजही तसेच आहे. वैयक्तिक अडीअडचणीत त्यांचे मार्गदर्शन घेतच असू. त्यांचा खांद्यावरचा हात आश्वस्त करीत असे व आजही ते तसेच आहे. मला तर खूप अनुभवता आले. विलक्षण प्रेमळ असलेली ही लता प्रसंगवशात 'रण रागिणी' होउ शकते हेही नैनिताल सहलीत पाहिले.

मा. लतताताई प्रवेश द्वाराशी हात मागे बान्धुन आहेत म्हटल्यावर कोणीच धाडस करीत नसे आत येऊ देण्याची विनंती करायला. हराळीत तर लतताताई येताहेत हा निरोप खुणेनेच कळवला जाई आणि सर्व जण आपापल्या कामात व्यग्र असल्याचे दिसत असे. ही दहशत नाही तर त्यांच्या शिस्तप्रियतेची जाणीव व वैयक्तिक आदर.

स्त्री शिक्षण, महिला सबलीकरण इ. महिला विषयक प्रश्नाबाबत त्या आजही तितक्याच जागरूक आहेत. शिक्षणासाठीचे खर्चासाठी, औषधोपचारासाठी खाजगी मदत, सहिष्णुता हा त्यांचा आणखी एक गुण. आणि दयार्द्रता, कनवाळूपणा टोकाचा. कारण आपल्याला कुणी फसवेल हे त्याना कधी वाटतच नाही. याचे मुख्य कारण त्यांचा स्वच्छ स्वभाव. माणसातल्या प्रामाणिकपणावर खूप विश्वास.

प्रसंगी विरोध करणारी मंडळी अडचणीवर मार्गदर्शनासठी त्यांचेकडे हक्काने येतात. कारण त्याना ताईंच्या बद्दल वाटणारा विश्वास. हा विश्वास त्या निर्माण करु शकल्या कारण त्या अध्यात्म जगतात. आपण कर्म करीत रहावे आणि त्याचा उल्लेख कुठे कधी करू नये ही त्यांची धारणा.. गीतेतेल्या तत्वज्ञानाप्राणे.

त्यांच्या व्यक्तिमत्व जडण घडणीत कुटुम्बातील संस्कार, ज्ञान प्रबोधिनीतील उत्तुंग व्यक्तिमत्वे, अध्यात्मिक क्षेत्रातील अधिकारी इ. अनेकांचा फार मोठा वाटा आहे. आई वडिलांचा सम्रुद्ध वारसा त्याना लाभला. राष्ट्रसेवा समितीचे संस्कार बालपणीच झाले. मा. आप्पा पेंडसे यांचा सहवास, मा. आण्णांचे बरोबर केलेले विविध कार्य प्रकल्प त्याना खूप काही शिकवून गेले.प.पू. स्वामी माधवनाथांचा अध्यात्मिक वरद हस्त , पुज्य विमलाजी ठकार यांच्या विचारांचा प्रभाव, स्व. सरलताई बाबर तर अध्यात्म क्षेत्रातील सहकारीच. आणि स्व. सुषमाताई वाटवे यानी तर धुराच सोपवली त्यांचेवर.

प्रबोधिनीवरील त्यांचे प्रेम विलक्षणच... सर्वस्व मानतात त्या प्रबोधिनीला. आणि त्या अतीव प्रेमामुळे प्रबोधिनीच्या अस्मितेवर झालेल्या हल्ल्याचा सामना करताना त्या तुटून पडतात हे हराळीतही पाहिले.

मा. आण्णांना सोलापुरात बाल विकास मंदिर च्या माध्यमातून प्रबोधिनीच्या कार्याची व्याप्ती वाढविण्यास त्यानी सम्पूर्ण सहकार्य केले. मा. गायत्रीताई सेवक या अशाच प्रबोधिनीच्या झोकून दिलेल्या पुर्ण वेळ युवा कार्यकर्त्या. सोलापुरात युवक संघटन करण्यात त्यांचा मोठाच वाटा. या तिघानी प्रबोधिनीचे विविध उपक्रम राबविले आणि प्रबोधिनीला एक विशिष्ट स्थान सोलापुरात प्राप्त करून दिले. तसेच काम हराळीतही उभे करण्यात मा. आण्णांना सम्पुर्ण सहकार्य केले. वास्तविक व्यवस्थापन हा त्यांचा प्रांत नाही.

मला व्यक्तिगत त्या गुरुस्थानी आहेतच. आमच्या हराळीतल्या वास्तव्यात त्यांचेमुळे विविध क्षेत्रातील लोकांची ओळख झाली व सहवासही लाभला. त्यांच्या आग्रहामुळे अध्यात्मिक गुरु लाभले. आमचे कुटुम्ब प्रबोधिनीचे प्रतिद्रित व स्वामी माधवानंद यांचे अनुग्रहितते त्यांचेमुळेच.

किती म्हणून सांगावे..अध्यात्म जगणे काय असते हे त्यांचेकडे पाहिल्यावर कळते. त्यांचा परिवार खूप मोठा आहे. त्यातीलच मी एक. सतत त्यांच्या उत्तुंग व्यक्तिमत्वाकडे मान उंच करून पाहणारी पण उमजू न शकलेली. आमचे नाते कसे आहे ते नाही मला शब्दात स्पष्ट करता येणार.. पण या ह्रुदयातले त्या ह्रुदयी जपायचे हेच खरे. माझ्या नातवंडाच्या त्या लाडक्या ‘लता आजी’ आहेत. त्यांचे लाड पुरवणारी अत्यंत प्रेमळ हक्काची आजी. त्याना भेटण्याची ओढ नातवाना सततच असते.

मा. लताताई कडे देण्यासारखे खूप आहे.फक्त घेणार्याच्या ओंजळीला किती पेलवते हे ज्याचे त्याने ठरवावे. मी मात्र अद्याप अतृप्तच आहे. समाधानासाठी म्हणत असते की नाही किती या पेक्षा आहे किती हे महत्वाचे.

आज या मंगल दिनी ईश्वराकडे एकच मागणे की आमच्या लताताईना आरोग्य सम्पन्न दीर्घायुष्य दे.

या दिव्यत्वाला विनम्र अभिवादन.

**वसुंधरा मुरार - अनासपुरे,**

सोलापूर २०.०४.२०२१.

*******************************************************************************

भाग्याची ग मी
लाभे मला अशी ताई
सर्वगुणसंपन्न
सदैव असे प्रसन्न
होता मुखावलोकन
मिळे ऊर्जा सर्वा भिन्न
शिकवे ग मला
गीतं वक्तृत्व नि
कौशल्य विभिन्न
भावपूर्ण वाचनातून
गर्भितार्थ उलगडताना
सार्थ नृत्यातून संदेश पोचवताना
कधी उमगली समजेना
स्व अभिव्यक्ती सर्वांना
अर्धशतकाहूनी वीस
झाली वर्षे ग ताईला
अमाप सदिच्छा मी देते-----
देवा
दे आशीर्वाद भला तिला
दे आशीर्वाद भला तिला
दे आशीर्वाद भला तिला
माझ्या ताई--आदरणीय लताताईंना वाढदिवसाच्या अनंत शुभेच्छा

**सौ.मीना/गायत्री सुमंत**, सोलापूर प्रबोधिनी

*******************************************************************************

**आदरणीय लतातार्इंच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या काही आठवणी.**

चैतन्याची मूर्ती असलेल्या लतातार्इंची माझी पहिली भेट १९९७ साली जून महिन्यात झाली. शिशु अध्यापिका विद्यालयाचा कोर्स पूर्ण झाल्यावर चांगल्या शाळेपासूनच नोकरीचा अर्ज देण्यास सुरुवात करावी असा विचार मनात आला व तो या शाळेपासूनच सुरुवात करावी असा विचार करुन नोकरीचा पहिला अर्ज मी आपल्याच शाळेत प्रथम दिला. साधारण दोन दिवसांनी मला शाळेत मुलाखतीसाठी बोलावण्यात आले. आ.कै. अण्णा व आ. लतातातार्इंनी माझी मुलाखत अनौपचारिक पध्दतीने घेतली .मुलाखत चालू असताना मनात सतत विचार येत होते की ,प्रत्यक्ष समोर असलेल्या मातृवत्सल सरस्वती च्या सहवासात सेवा करायची संधी मिळावी.जणूकाही परमेश्वराने माझी तळमळ ऐकली व मला येथे सेवा करण्याची संधी मिळाली.

आ. लतातार्इंच्या सहवासात अनेक गोष्टी शिकायला मिळाल्या. कोणताही कार्यक्रम ठरविताना त्याचे नियोजन कसे करायचे , कार्यक्रमाच्या आदल्या दिवशी प्रत्येकाचे जे खातेवाटप आसावयाचे त्यतील काही राहिले का? काम पूर्ण करताना काही अडचण आहे का ? काही राहिले का ? व कार्यक्रम झाल्यानंतरचा शोधबोध. यामुळे घरगुती कार्यक्रम करतानाही या पध्दतीने नियोजन केल्यामुळे कार्यक्रम व्यवस्थित व नियोजनबद्ध व्हायला मदत व्हायची.

असाच अजून एक प्रसंग आठवतो तो म्हणजे शिशुशाळेत दर महिन्यात एकदा खाऊ असतो व सर्व मुलांना शाळेतील खाऊ अतिशय आवडतो. मुलांनी उद्या डबा आणू नये ,उद्या खाऊ आहे अशी सूचना बाहेर लागली . खाऊचे सामान आणले गेले व खाऊ करावयाच्यावेळी अचानक पाहुणे आले व स्वयंपाकघरातील सिलेंडर संपला. पाहुणे मोठे असल्याने कमीतकमी नाष्टा व चहापाण्याची सोयतरी मावशींना करावयाची होती. मावशी सिलेंडर घेऊन गेल्या. लतातार्इंनी सर्व परिस्थिती प्रत्यक्ष पाहिली व अशा परिस्थितीत काय करुयात याबाबत चर्चा करुन गरम पोह्यांचा बेत बदलून दडपे पोह्यांचा बेत अचानक केला . त्यावेळी लतातार्इंनी पाठीवर हात फिरवून खरी सुगरण आहात असा प्रेमाने फिरविलेला हात व दिलेला आशिर्वाद अजूनही खूप प्रेरणा देऊन जातो.

ज्ञानप्रबोधिनीच्या आधारस्तंभ असणाऱ्या लताताई आम्हाला तुमचा शंभरावा वाढदिवसही असाच दिमाखात साजरा करावयाचा आहे.

शुभदिन हा शुभदिन हा आपुल्या लतातार्इंचा.

धन्यवाद

**सविता माढेकर**

*******************************************************************************

**सत्तरी**

**स्व** - आ. ताई शिस्तप्रिय असून स्व च्छंद जीवन जगणाऱ्या,

**र्ण** - आ. तार्इंच्या व्यक्तिमत्त्वातील एक उत्तम पैलू म्हणजे योग्य नि र्ण यक्षमता असणाऱ्या,

**ल** - आ. ताई समाजासाठी आणि शिक्षणासाठी ल ढा देणाऱ्या,

**ता** - आ. ताई कल्पना आणि विचारांचा ताळमेळ घालून ध्येयपूर्ण जीवन जगणाऱ्या,

अशा या प्रिय आ. ताई स्वर्णलता

आनंदी, उत्साही ताई सत्तरी गाठली बघता बघता.

आ. तार्इंच्या जन्मदिनी तार्इंना नमन !

**सौ. श्वेता औरसंग - वाळवेकर**

ज्ञानप्रबोधिनी प्रशाला, सोलापूर
******************************************************************************

**कार्यरत.... साधनारत....**

१९८८-८९ साली पुण्याची ज्ञान प्रबोधिनी सोलापुरात यायला आणि माझ्या वडिलांची पुण्याहून सोलापूरला बदली व्हायला एकच गाठ पडली. इयत्ता आठवीसाठी आमची प्रवेशपरीक्षा आणि मुलाखत घ्यायला मा. लताताई होत्या. ही त्यांची आणि माझी पहिली भेट. त्यावेळची त्यांची सुप्रसन्न मूर्ती आजही आठवते आहे. मी पुण्यातल्या एका मोठ्या शाळेतून आले होते. साठ-पासष्ठ मुलींच्या वर्गात शिक्षिकांना सगळ्या मुलींची नावंही धड माहिती नसायची. त्यामुळे लताताईंचं आपल्याशी इतकं प्रेमाने बोलणं, त्यांच्याशी इतका सहजपणे व्यक्तिगत संपर्क, संवाद साधायला मिळणं याचं खूपच अप्रूप वाटायचं.

मी दहावीत असताना वडिलांची परत एकदा बदली झाली आणि मी मा. आण्णा, लताताई, गायत्रीताईंबरोबर सहनिवासात राहायला आले. त्यांची सेवाव्रती जीवनं इतक्या जवळून बघायला मिळणं हा मी माझ्या आयुष्यातला एक भाग्ययोगच समजते. लताताई नित्यनियमाने पहाटे उठून ध्यानसाधना करायच्या. सकाळी ६.१५ च्या उपासनेआधी त्यांची नित्यकर्मं, ध्यान हे सर्व झालेलं असायचं. रविवारच्या सत्संगालाही त्यावेळी नुकतीच सुरुवात झाली होती. त्यात लताताई दासबोधावर प्रवचन करायच्या. एका रविवारी त्यांना कुठेतरी बाहेरगावी जायचं होतं. जायच्या आधी त्यांनी माझ्या हातात दासबोध ठेवला आणि सांगितलं, "या रविवारी मी सत्संगाला नसणार आहे. यातल्या सच्छिष्यलक्षणे या भागावर यावेळी तू प्रवचन कर". अरे बापरे! त्यावेळी मी होते जेमतेम पंधरा-सोळा वर्षांची! गडबडूनच गेले! लताताईंना नाही म्हणून कसं सांगायचं! मोठ्या मुश्किलीने अर्धा तास बोलायची तयारी केली. प्रत्यक्ष बोलताना मी काढलेले सगळे मुद्दे पाच-दहा मिनिटातच सांगून संपले. झालं प्रवचन! ते मी माझ्या आयुष्यात केलेलं पहिलं आणि (बहुधा) शेवटचं प्रवचन! हळूहळू लक्षात आलं की लताताईंच्या बोलण्याला, लिहिण्याला, विद्वत्तेला साधनेची, उपासनेची पक्की बैठक आहे. आपणही त्यांच्यासारखी साधना केली पाहिजे हे त्या शाळकरी वयात मनात रुजलं.

लहानपणी आपल्या मनात बऱ्याचदा काहीतरी विचित्र विचार ठाण मांडून बसलेले असतात. आधीच्या शाळेत आलेल्या अनुभवांमुळे म्हणा किंवा आणखी कशामुळे म्हणा पण माझ्या मनात असं बसलं होतं की आपण दिसायला काही चांगले नाही. माझा स्वतःचाच चेहरा आरशात बघायला मला आवडायचं नाही. एकदा काय झालं. मला कोणीतरी म्हणालं, "मोठं कपाळ, छोटं नाक....तू अगदी लताताईंसारखी दिसतेस....त्यांची मुलगीच!" मला असलं मस्त वाटलं त्यावेळी! लताताई तर किती छान दिसतात...आपण त्यांच्यासारखे दिसतो...मणजे आपणही छान दिसतो...दिसू शकतो! हे logic मनात पक्कं बसलं. स्वतःच्या दिसण्याबद्दल नकारात्मक विचार मनात येणं बंद झालं. पण नंतर समजायला लागलं की लताताईंच्या बोलण्या-लिहिण्याप्रमाणेच छान दिसण्यालादेखील साधनेची, उपासनेची बैठक आहे. अगदी खरंखरं त्यांच्यासारखं व्हायचं ही काही साधी सोपी गोष्ट नाही. अजूनतरी त्या मार्गावर माझी सुरुवातीची धडपडच चालू आहे.

लताताईंमुळे कळत-नकळत झालेला आणखी एक संस्कार म्हणजे 'शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम्'. हे त्यांनी कुठल्या वैचारिकात सांगितलं होतं असं नाही. पण त्यांच्याबरोबर राहून हे महत्त्वाचं शिक्षण झालं. शरीर हे धर्माचं साधन आहे. धर्माचरण म्हणजे मुख्यतः दोन गोष्टी - स्वतःची आध्यात्मिक साधना आणि परोपकार (इतरांच्या उपयोगी पडणं). या दोन्ही गोष्टी सध्य करण्याचं शरीर हे साधन आहे. त्यामुळे आपण व्यायाम केला पाहिजे, शरीर सुदृढ ठेवलं पाहिजे, योग्य तो आहार घेतला पाहिजे, पथ्यपाणी केलं पाहिजे, औषधं वेळेवर घेतली पाहिजेत... पण हे सर्व कशासाठी? मला जर काही मोठं ध्येय गाठायचं असेल तर शरीर या साधनाची गरज आहे आणि म्हणून ते

व्यवस्थित राहिलं पाहिजे...यासाठी! शरीराची आणि फक्त शरीराचीच काळजी करत आणि काळजी घेत बसणं हे कुठल्याही वयात जीवनाचं साध्य होऊ देऊ नये ही शिकवण लताताईंमुळे मिळाली. कित्येक आधीव्याधींना सामोरं जाताना, शरीराला प्रचंड त्रास होत असताना देखील आपली साधना नेटानं चालू ठेवणं, 'इदं न मम' या भावनेने अखंड अविरत कार्यरत राहाणं ही गोष्ट खरंच अलौकिक आहे असं मला वाटतं.

दहावीचं एक वर्ष, बी. ए. ची तीन वर्षं आणि पूर्णवेळ काम करत असतानाचं एक वर्षं अशी तब्बल पाच वर्षं लताताईंबरोबर सहनिवासात राहिले. त्यांच्याकडून अजून खूप शिकायचं राहून गेलं असं खूपदा वाटतं. पण जे शिकायला मिळालं तेही काही थोडं नाही याचं समाधानही मनात आहे. लताताईंना शंभर वर्षाचं उत्तम, निरामय आयुष्य लाभो, त्यांच्या आदर्शाच्या प्रकाशात, त्यांच्या प्रेमाच्या छत्रछायेत कार्यरत, साधनारत राहण्याचं भाग्य आम्हालाही आणखी खूप वर्षं लाभो अशी त्यांच्या सत्तरीनिमित्त परमेश्वराकडे प्रार्थना करते.

**-प्रज्ञा जेरे - अंजळ,** बंगलोर

*************************************************************************

**आम्ही बी घडलो तुम्ही बी घडाना**

आम्ही बी घडलो, तुम्ही बी घडा ना। परिसाच्या संगे लोह बिघडले। लोह बिघडले, सुवर्णची झाले। असे एक सुंदर गीत आम्ही पूर्वी गायचो.त्याची मला आत्ता आठवण येतेय. २५ वर्षांपूर्वीची गोष्ट.१९९६ च्या ऑगस्ट महिन्यात ज्ञानप्रबोधिनी सोलापूरच्या उपासना मंदिरात प्रौढ साक्षरता वर्ग उपक्रमांतर्गत शहर साक्षरता अभियान सुरू झाले. डॉ.स्वर्णलता भिशीकर या शहर साक्षरता अभियानाच्या सचिव होत्या. सोलापूर शहरातील अनेक शाळांच्या सहभागाच्या माध्यमातून संपूर्ण शहरात हे साक्षरता वर्ग चालणार होते.त्या दृष्टीने कामांचे नियोजन सुरू होते. त्यासाठी शाळेतील मुख्याध्यापक,शिक्षक व पूर्णवेळ कार्यकर्त्यांसाठी लताताई तीन दिवसांचे प्रशिक्षण वर्ग घेणार होत्या. त्यावेळी पद्मशाली समाजाची प्रतिनिधी आणि पूर्णवेळ कार्यकर्ती या नात्याने या उपक्रमात सहभागी होण्याचे भाग्य मला लाभले. पद्मशाली समाजात सुमारे २५ वर्षांपूर्वीच्या त्या काळात मुलींच्या शिक्षणाला मुळीच स्थान नव्हते,किंबहुना भरपूर विरोधच होता.अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून माझ्यासारख्या एक - दोन जणी कशाबशा पदवीधर होण्यापर्यंत मजल मारू शकल्या होत्या. मी पण प्रथमच अशा काही उपक्रमासाठी घराबाहेर पडले होते.आश्चर्य म्हणजे या उपक्रमाच्या निमित्ताने माझे आयुष्यच बदलून गेले.आयुष्याला एक वेगळी दिशा मिळाली,वेगळा मार्ग मिळाला.माझे शिक्षण मराठी भाषेतून झाले असले तरी मातृभाषा तेलुगू असल्याने मराठी बोलणे कठीण वाटायचे.उच्चारात खूप चुका व्हायच्या.त्यामुळे एक प्रकारचा न्यूनगंड निर्माण झाला होता.समाजात,लोकांमध्ये मिसळण्याची भीती वाटत असे. त्यामुळे या एवढ्या मोठ्या प्रशिक्षण शिबिरात माझे साधे नाव सांगतानादेखील मला त-त-प-प होत होते. हात- पाय थरथरत होते.मी घामाने चिंब झाले.शिबिरातील सगळे मला हसायला लागले.पण लताताईनी माझ्याजवळ येऊन त्या वेळी तेवढ्याच प्रेमाने , ममतेने मला जवळ घेऊन अतिशय शांतपणे माझे नाव विचारून घेतले.

मग नंतर साक्षरता प्रसाराच्या कामानिमित्ताने ताईंना वारंवार रिपोर्टिंग करायला जावे लागायचे. त्या प्रत्येक वेळी लताताईंच्या प्रेमळ स्पर्शातून मला नवीन उमेद मिळू लागली.आत्मविश्वास वाढू लागला.

मला मराठी बोलता येत नसल्याने काही गोष्टी मी हावभावांतून- देहबोलीतून समजून घेऊ लागले. साक्षरता वर्गांना भेटी देण्यासाठी लताताई दुपारी चार ते रात्री दहा किंवा कधीकधी तर त्याहीनंतर वाड्या - वस्त्यांमध्ये जाऊन तेथील महिला व पुरुषांशी संवाद साधू लागल्या.आपल्या बोलण्यातून त्या प्रौढांना मानसिक बळ देत असत. वृद्ध आजी आजोबा लताताईंच्या प्रेमळ स्वभावामुळे भारावून जात.त्यांच्या पायांवर मस्तक ठेवून नमस्कार करीत.त्या भारावलेल्या काळात वाड्या- वस्त्यांमधील युवक-युवतींसाठी मोठमोठे मेळावे घेतले गेले.

या उपक्रमानंतर लताताई यांच्या मार्गदर्शनानुसार साखर शाळेत व हराळी येथील ज्ञान प्रबोधिनीच्या उभारणीच्या काळात मी काम केले आणि अनेक गुणांची शिदोरी माझ्यासोबत बांधून घेतली. सायंकाळची बैठक,आध्यात्मिक शिबिरे,कार्यशिबिरे,सहली यातून असंख्य जीवनोपयोगी व्यावहारिक बाबी शिकता आल्या.एकदा ज्ञान प्रबोधिनीत दुपारच्या वेळी कोणाचे तरी घड्याळ आणि इतर काही गोष्टी चोरीला गेल्या.कर्मचारी, निवासी कार्यकर्ते ,विद्यार्थी यांच्या मागे पोलिसांच्या चौकशीचा ससेमिरा लागला. तेवढ्यात मी काही कामे करून बाहेरून आले.चौकशीचा मारा आता माझ्यावर सुरू झाला. लताताईंना हे कुठूनसे समजले. त्या ताबडतोब तिथे आल्या. आणि पोलिसांना त्यांनी सांगितले, ही आमची मुलगी आहे. या शब्दांमध्ये केवढा मोठा विश्वास सामावलेला होता.

एकदा स्व.वा.ना.उत्पात यांच्या आठ दिवसीय विनायक दामोदर सावरकर या देशभक्तीपर व्याख्यानांचे आयोजन ज्ञानप्रबोधिनी ने उमरग्याजवळील अचलबेटावर केले होते.परगावी मुक्कामासाठी तेही इतक्या दीर्घकाळासाठी घरातून प्रथमच मी बाहेर राहिले होते. सवय नसल्यामुळे म्हणा किंवा आणखी काही कारणांमुळे म्हणा मला तिथे रात्री झोप येत नव्हती.ही गोष्ट लताताईंच्या लक्षात आली. लहान बाळाला थोपटून आपण झोपवतो त्याप्रमाणे मायेने ताईनी त्या दिवशी मला थोपटून झोपवले. कोण करेल बरे इतके कोणासाठी ?

माझ्या घरात मला माझ्या वडिलांची आध्यात्मिक शिकवण होती.पण लताताईंकडून त्या शिकवणीला घट्ट अशी जोड मिळाली.आध्यात्मिक बीजारोपण करून,त्या बीजाला सतत खतपाणी घालून योग व प्रवचनांच्या माध्यमातून बोधामृत पाजून पू. स्वामी माधवानंदजी यांच्याकडून अनुग्रह देऊन मला पुनीत केले आहे. दासबोध, तुकाराम गाथा,ज्ञानेश्वरी यांच्या वाचनातून माझ्या विचारांना धार लावण्याचे महत्कार्य त्यांनी माझ्यासाठी केले आहे. काम लहान किंवा मोठे नसते. कमी किंवा जास्त असा कामाचा दर्जा नसतो. प्रत्येक गोष्ट उत्कृष्ट आणि उत्तमच कशी करता येईल? मन लावून तिच्यात प्राण कसे ओतता येतील?कामातच देव कसा असतो ?या सगळ्यांची जाणीव लताताईनी मला करून दिली. अशा शेकडो गोष्टींची पुंजी मला त्यांनीच प्रदान केली आहे.

२००३ साली माझे श्री. श्रीकांत कुलकर्णी यांच्याशी लग्न ठरले. तेव्हा मी लताताई अण्णांचा आशीर्वाद घ्यायला गेले होते. आई जसा मुलीला प्रेमळ उपदेश करते तसा उपदेश ताईनी मला केला. सप्तपदीचे महत्त्व, संसार करताना येणारे कठीण प्रसंग, भांबावून टाकणारी परिस्थिती,काटकसर कशी करावी ,आयुष्यात आपण स्वतःची आणि कुटुंबाची काळजी कशी घ्यावी, जोडीदाराचे गुण-दोष स्वीकारुन आनंदाने कसे राहावे हे सगळे त्यांनी मला सविस्तर समजावून सांगितले.लग्नानंतर पहिल्यांदा आम्ही दोघे ताईंना भेटायला गेलो तेव्हा खाऊ, भेटवस्तू आणि सर्वात मोलाचे म्हणजे त्यांचे शुभाशीर्वाद त्यांनी दिले. अशा लताताईंसोबतच्या कितीतरी आठवणी आहेत १ मे २०२१ ला ताईंना सत्तर वर्षे पूर्ण होत आहेत.त्यांना उत्तम आरोग्य आणि दीर्घायुष्य लाभो अशा हार्दिक शुभेच्छा!

**सौ.प्रमिला कारमपुरी-कुलकर्णी**

*****************************************************************************

**बहुआयामी लताताई**

१ मे २०२१ला डॉ.स्वर्णलता भिशीकर यांना वयाची ७० वर्षे पूर्ण होत आहेत. ताई आता ७१ व्या वर्षात पदार्पण करतील. त्यांना त्यानिमित्त खूप खूप व मनःपूर्वक शुभेच्छा! प्रबोधिनीच्या परिवारातील एक मातृतुल्य, ऋषितुल्यअसे हे व्यक्तिमत्त्व! आमच्या साऱ्यांच्या लताताई! त्यांच्याविषयी काय लिहू , किती लिहू असे झाले आहे.मी त्यांच्याविषयी पहिल्यांदाच लिहित आहे,कारण आम्हाला त्यांच्याविषयी लिहिण्या - बोलण्याची संधीच आम्हाला त्या कधी देत नाहीत. ज्ञान प्रबोधिनीत मला कामाची संधी मिळावी यासाठी एकदा मी अर्ज दिला होता. तेव्हा लताताईंची आणि माझी पहिली भेट मुलाखतीच्या वेळी झाली.मला प्रबोधिनीत येऊन येत्या नोव्हेंबर

महिन्यात तीस वर्षे पूर्ण होत आहेत.या संपूर्ण काळात माझा आणि त्यांचा कामानिमित्त अनेकदा अगदी जवळून संबंध आला. त्यातून मला उमगलेल्या लताताई थोडक्यात मांडण्याचा प्रयत्न करते. काही उणे-अधिक झाल्यास क्षमा करावी.

लताताईंनी आपलं सारं जीवन ज्ञान प्रबोधिनीच्या कार्याला समर्पित केले आहे कोणत्याही कार्यात कसं झोकून देऊन काम करायचं हे त्यांच्याकडून शिकावे. ज्ञान प्रबोधिनीत आल्यापासून पाहतेय,अगदी कोणताही उपक्रम असो,त्यात पुढाकार घेऊन अत्यंत तळमळीने हिरिरीने सहभागी होणाऱ्या लताताई !आमचे सर्वांचे प्रेरणास्थान केव्हा झाल्या ते कळलेच नाही.यामध्ये बालविकास केंद्र साखळी, साक्षरता अभियान, साखरशाळा ,बालकामगारांची शाळा ,एड्सविषयीचे जनजागरण समाजदर्शन उपक्रम अशा अनेक कार्यांमध्ये त्यांनी कायम सिंहाचा वाटा उचललेला आहे. त्यांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून आणि त्यांचे मार्गदर्शन घेऊन अत्यंत प्रामाणिकपणे आमचे मार्गक्रमण सुरु आहे.

आदरणीय,वंदनीय आणि सन्माननीय अशा लताताईंना अनेक पुरस्कारांनी गौरवण्यात आलेले आहे.वुमन ऑफ द ईयर अमेरिकन बिबलियोग्राफिक असोसिएशन २०००,सरदार नातू पुरस्कार पुणे,श्रीपाद प्रकाशन पुरस्कार २०१५,लायन्स क्लबतर्फे शैक्षणिक,सामाजिक,आध्यात्मिक क्षेत्रातील उत्कृष्ट कामाबद्दल देण्यात येणारा स्त्रीरत्न पुरस्कार २०१५,महाराष्ट्र साहित्य परिषद, जुळे सोलापूर शाखेच्या वतीने देण्यात येणारा स्व.दत्ता हलसगीकर श्रेष्ठ साहित्य पुरस्कार,श्री.वि.गु.शिवदारे प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात येणारा जीवनगौरव पुरस्कार,मोंढे ऑटो मोबाईल्सच्या वतीने देण्यात येणारा आदर्श माता पुरस्कार,अखिल भारतीय शैक्षिक महासंघ,इंदौर यांच्या वतीने दिलेला शिक्षा भूषण पुरस्कार २०१८,लोकसत्ताच्या वतीने देण्यात आलेला दुर्गा पुरस्कार २०१८ इत्यादी पुरस्कार लताताईंना मिळालेले आहेत.त्यांच्या सर्वच पुरस्कारांची नोंद या लेखात घेता आली नाही याची खंत वाटते. पण यांपैकी अनेक पुरस्कार कार्यक्रमांना उपस्थित राहण्याचे भाग्य मला लाभले. त्यांचे कौतुक पाहून मन आनंदाने भरून जाते.

ज्ञान प्रबोधिनीच्या उपासना मंदिरात गेल्या ३० वर्षांपासून दर रविवारी नियमितपणे (कोरोना काळाचा अपवाद वगळता)संध्याकाळी सत्संग चालतो. ज्ञानेश्वरी, दासबोध,तुकाराम गाथा,अन्य संत साहित्य अशा ग्रंथांचे वाचन, निरूपण असते. मा.लताताईंनीच हा सत्संग विभाग सुरु केला आहे.अगदी उत्साही पुढाकाराने,कल्पकतेने अनेक उपक्रम त्यांनीच सुरु केलेले आहेत. दरवर्षी जानेवारी महिन्यात विवेकानंद जयंती निमित्त कै.परमानंद भिशीकर व्याख्यानमालेचे आयोजन सुमारे २० वर्षे लताताई करत होत्या. ही व्याख्यानमाला म्हणजे आनंदाची पर्वणीच जणू! अनेकांची श्रवणीय व्याख्याने मनावर ठसा उमटवून जायची.

लताताईंनी त्यांच्या साधनेने स्वतःची आध्यात्मिक उन्नती खूपच जलद गतीने केली असे वाटते.अत्यंत हळू आवाजात, शक्य तितके मोजकेच, कमी प्रमाणात बोलणे, एक-दोन महिने अज्ञातवासात शांत स्थळी जाऊन मौनाभ्यास करणे ,मौन पाळता यावे यासाठी त्या काळापुरता जनसंपर्क खंडित करणे ही फारच कठीण गोष्ट त्या सहज साध्य करतात.खरोखरच धन्य त्या लताताई! त्यांच्या पाया पडताना जेव्हा-जेव्हा त्यांचा हात माझ्या पाठीवरून फिरतो तेव्हा तेव्हा एक प्रकारची आध्यात्मिक ऊर्जा आपल्यात येत आहे असे जाणवते. इलेक्ट्रिक प्रवाहच (करंट)जणू ! मी यात एक अक्षरही खोटं लिहीत नाही. मी असा अनुभव अनेकदा घेतला आहे.

मा.लताताईंनी अनेक प्रबोधन गीते रचली आहेत.त्यांच्याकडे दैवी काव्यप्रतिभा आहे .कुमार साहित्य संमेलनात त्यांनी तयार केलेले शीर्षक गीत गायले गेले. गतीने वाचन कसे करता येईल अर्थात वाचनकौशल्याचे उत्तम मार्गदर्शन त्या करतात.तसेच मराठीचा इंग्रजीत अनुवाद आणि इंग्रजीचा मराठीत अनुवाद अत्यंत चांगल्या पद्धतीने करू शकतात.त्यांचे अक्षर पण खूप छान आहे.सततचे वाचन-लेखन यामुळे त्यांची वाणी सुद्धा ओघवती आणि रसाळ आहे.त्यांचे बोलणे ऐकत राहावे असे वाटते. पत्रलेखन ही कला आता खूप मागे पडत चालली

आहे.परंतु या पत्राच्या माध्यमातूनच लताताईंनी देश-विदेशातील सर्वांशी पूर्वीपासून स्नेह जपला आहे, वृद्धिंगत केला आहे.

अतिथी देवो भव । या उक्तीप्रमाणे लताताई प्रबोधिनीत येणाऱ्याचे अगत्याने, आपुलकीने स्वागत करतात.अगदी घरातील आईप्रमाणेच खाऊ-पिऊ घालतात .तसेच अतिथींच्या निवासाची व्यवस्थाही उत्तमपणे करतात. मा.कै.दादा संभूस म्हणत की, आतिथ्य कसं करायचं असतं यासाठी सोलापूरला यायला हवं.लताताई व आण्णा इथे सोलापूरला असायचे तेव्हाची ही गोष्ट.

लताताईंचे बोलणे जसे कमी तसाच आहार पण खूपच कमी. जेवणात तिखटाला कुठेही स्थान नाही. मसालेदार, तेलकट जेवण वर्ज्य.कोणत्याही प्रसंगी बाहेर जेवायला बोलावले तर फक्त थोडंसं स्वीट घेणार!त्यामुळेच विचारही सात्त्विक आणि चांगले !

मी जसजसा विचार करत आहे तसतशी माझी लेखणी थांबायला तयारच नाही असे दिसतेय. काय करू?लताताई गरजूंना मदत करण्यात अत्यंत तत्पर असतात. कोणी आजारी असेल,कोणाला काही आर्थिक अडचण असेल ,तर लगेच चेक देऊन मोकळ्या.आपण शंभर रुपये द्यायचे झाले कुणाला तर शंभर वेळा विचार करतो.त्यांचा दातृत्व हा पण एक मोठा गुण आहे. तर असे हे प्रसन्न आणि प्रभावी व्यक्तिमत्त्व ! वक्तृत्त्वाने, कर्तृत्वाने आणि दातृत्वाने परिपूर्ण असे सार्थक जीवन ! त्यांच्या पुढील दीर्घायुष्याच्या वाटचालीत त्यांना उत्तम आरोग्य लाभावे.नुकतीच त्यांची गुडघ्याची शस्त्रक्रिया झाली आहे, त्यातून त्या लवकर बऱ्या होऊन पूर्वीप्रमाणेच कार्यरत होवोत आणि आम्हाला सर्वांना कार्य प्रेरणा देत राहोत हीच ईश्वरचरणी मनोमन प्रार्थना !

**जयश्री श्रीकांत छत्रे** ज्ञान प्रबोधिनी सोलापूर

*****************************************************************************

आदरणीय लताताईंस,

साष्टांग नमस्कार

खरे तर आपल्यातला हा पहिलाच पत्रव्यवहार! तुमच्या ७०व्या वाढदिवसाने ही संधी दिली. काय आणि किती सांगू ताई तुम्हाला माझ्या मनातलं?

आजही तो शाळेचा दिवस आठवतो. इयत्ता सहावीत असेन मी. नुकतेच ज्ञानप्रबोधिनी संस्थेने बाल विकास मंदिर ही शाळा चालविण्यास घेतली होती .ज्ञानप्रबोधिनीच्या सगळ्यांची अजून पुरेशी ओळखही नव्हती सर्वसाधारणपणे प्रत्येक शाळेत असतो तसा शिक्षकांचा मुख्याध्यापकांचा धाक मलाही होता .धाक कसला? भीतीच ती! आपली चूक असो वा नसो मार खाण्याची ,ओरडा खाण्याची तयारी .मग ती पालकांकडून असो वा गुरुजनां कडून ! तर त्या दिवशी मला शाळेत पोहोचण्यास उशीर झाला मी घाईघाईतच वर्गात जात होते आणि अचानक समोरून तुम्ही येत होत्या. त्या घाईत माझ्या दप्तराचा धक्का तुम्हाला लागला आणि ओरडा बसेल या भीतीने मी पळून गेले .तास सुरू झाले आणि थोड्याच वेळात मला बोलावलं. माझी मार खाण्याची मानसिक तयारी आधीच झाली होती. मान खाली घालून मी तुमच्या कचेरीत दाखल झाले पण घडले उलटेच तुम्ही मला खुर्ची दिलीत बसण्यासाठी आणि फक्त एवढेच म्हणालात," सकाळी तुझ्या दप्तरा सोबत काय झालं स्वप्ना?" मी म्हटलं ,"सॉरी ताई ,लागलं तुम्हाला ." "मग असं झाल्यावर काय करतात?" तुम्ही विचारलं. मी म्हटलं ,"माफी मागतात. पण खरंच चुकून झालं ताई." त्यावर हसून तुम्ही म्हणालात," चूक झाली तर घाबरायचं नाही माफी मागायची. पळून तर अजिबात जायचं नाही." खरं सांगू ? एवढ्या आपुलकीने याआधी माझ्याशी कोणीच कधी बोलले नव्हते. एका ६वीतल्या मुलीला पहिल्यांदाच इतकं आश्वस्त वाटलं असेल ! या एका प्रसंगाने आपल्यातील अंतर कमी झालं आणि हा गुरुमंत्र मी आयुष्यभर असाच जपून ठेवेन आणि त्याचं पालन करेन हा निर्धार मी त्या क्षणी केला

मग पुढे वक्तृत्व स्पर्धा असो निबंध स्पर्धा असो कोणत्याही स्पर्धेत बक्षीस मिळालं की ,आधी लताताई आणि अण्णांना दाखवायचं. मग मार्गदर्शक दलाच्या रविवारच्या तालमी आल्या आणि नेतृत्वगुण म्हणजे नेमके काय खरा नेता कसा असावा? याचं प्रात्यक्षिकच मिळालं.

ताई तुमचा सहवास म्हणजे पौर्णिमेचं चांदणं! तुमच्या शांत धीर गंभीर स्वभावाने आमच्या आयुष्यातील दाहकता कमी झाली. तप्त उन्हात थंडगार वाऱ्याची झुळूक यावी असं तुमचं बोलणं. ध्यानधारणा असो व राष्ट्रप्रेम दोन्ही गोष्टी तुम्ही रुजविल्यात. आज हार्टफुलनेस ध्यान संस्थेची प्रशिक्षक स्वयंसेवक म्हणून काम करत असताना तुम्ही गिरवून घेतलेले धडे उपयोगी पडत आहेत

काय आणि किती लिहू? तुमच्या ७० व्या वाढदिवसानिमित्त एवढंच म्हणेन तुमचा आणि अण्णांचा परिसस्पर्श झाला आणि माझं आयुष्य उजळून निघालं . खूप खूप धन्यवाद ताई ! तुमच्यातील एक जरी गुण घेऊन तो जोपासता आला तरी जीवन सार्थकी लागलं असं म्हणेन मी.

तुम्हाला निरामय व उदंड आयुष्य लाभो हीच त्या विधात्याच्या चरणी प्रार्थना

तुमची
**स्वप्ना (मित्रगोत्री)**

*************************************************************************

**नाबाद सत्तर**

सात्विक शांतता अनुभवली असेल पण कधी तिला पाहिली आहे का? तीही चालती बोलती.शिस्त पाहिली पण शिस्तीतील मितभाषी सात्त्विकता अनुभवली का? बरं या सर्वात अजून एका कंगोऱ्याची भर म्हणजे ज्ञानी व तपस्वी आणि तीही विद्यार्थीप्रिय.

बर तपस्वी म्हणावं तर वावर नेहमीच लोकाभिमुख आणि सामाजात.

अस आगळंवेगळं रसायन म्हणजे आमच्या लताताई म्हणजे स्वर्णलता भिशीकर

ताई १ मे रोजी आपल्या वयाची सत्तरी पूर्ण करत आहेत . आपल्या ज्ञानाचा, कार्याचा अनुभवांची वाचनाची वक्तृत्वाची सुवर्णमहोत्सवी शिदोरी घेऊन आता अमृत महोत्सवात (७०) च्या टप्प्यात पदार्पण करत आहेत त्याबद्दल त्यांचे आम्हा तमाम विद्यार्थ्यांकडून अभिनंदन आणि शुभेच्छा.

जिवेत शरद शतम॥

लताताई म्हणलं की समोर येते त्यांचे हसरे, मितभाषी, स्वागतोस्तुक, विद्यार्थीप्रिय व्यक्तीमत्व. मोठं कुंकू हातात घड्याळ, साधी साडी आणि साधी राहणी हे त्यांचे सिग्नेचर मार्क.

मला आठवतो माझा पहिला दिवस ,ग्रँड एन्ट्री तीही रडत कारण मला जायचं होतं नुमवीत कारण तिथे खेळायला झोका होता. माझा पहिला इंटरव्ह्यू ( मुलाखत) त्यांनीच घेतली. माझेच नाही तर इतर अनेकांचं बोट पकडून त्यांनी शाळेत नेलं आणि कायमच आपलंसं केलं अगदी घट्ट , प्रबोधिनी मार्क.

त्यांचे प्रसन्न व्यक्तिमत्त्व मुलांनाच नाही तर पालकांना देखील भुरळ पाडायचं. कितीही पालक त्रासलेले असु देत. रागावले असतील लताताई बोलता बोलता त्यांना शांत करायच्या. त्यांच्या व्यथा ऐकून घेऊन धीर द्यायच्या, पण शाळेला उगाच उशीर झाला तर त्यांच्या तील शांत ताईंचा मात्र तुळजापूरकर सर व्हायचे, शिस्तीला पर्याय नाही आणि चुकीला माफी नाही.

ओघवती भाषा शैली, अफाट वाचन, लेखन, अध्यात्मिक बैठक, विवेचन, भाषेवरील पकड  आणि तथास्तु म्हणणारी जिभेवरील वागदेवी ह्या त्यांच्या जमेच्या बाजू.
जनमानसाचे आणि विशेषतः मुलांचे मन ओळखण्याची क्लुप्ती आणि किल्ली त्यांना अगदी सहज अवगत होती. बालमानस शास्त्रातील त्यांची डॉक्टरेट त्यांच्यातील अभ्यासपूर्ण विदूशीला आणि व्याख्याताला पोषक ठरली. आपलं म्हणणं कंटाळवाणे न होता मोजक्या शब्दात आणि विशिष्ट लयीत व शांत आवाजात मांडणं नुसतं मांडणं नाही तर पटवून देणे ही त्यांची हातोटी.
गोष्टी सांगताना त्या जितक्या आजी सारख्या भावुक होतात तितक्याच शिस्त लावताना कठोर, जितक्या त्या ध्यानात अंतर्मुख होतात तितक्याच रामकृष्ण मठात गीतेवर, उपनिषदावर विवेचन करताना बहिर्मुख. त्यांचे दाखले, उच्चार, माहिती, विशेषणे, श्लेष, उत्प्रेक्षा अलंकार आणि भाषेची नजाकत आपली संस्कृती अलगद उलगडून दाखवते. संस्कृत, मराठी, इंग्रजीमधील सहजता आणि पुराण उपनिषदातील व्यापकता प्रेमात पाडणारी आणि विचारमंथन करणारी आहे.
अण्णा लताताई, गायत्रीताई आणि शुभदाताई हे आमच्या वेळचे शाळेचे चार स्तंभ रुपी शिलेदार ज्यांच्या नावाने शाळेला ओळख मिळाली. आदरणीय अवंतिकाबाई आणि जनुभाऊ यांच्या स्वतंत्र भारदस्त नावातील शाळा हस्तांतरित झाल्यावर त्यांच्या लिपीस न पुसता, शाळेची नवी ओळख आणि वेगळेपण जपण्याचं काम ज्ञानप्रबोधिनी च्या माध्यमातून लताताईंनी केलं.
अनेक पिढ्याचा यशस्वी प्रवास त्यांनी बघितलाय, मुलांसाठी त्यांनी कधी हात राखून व्यवहार केला नाही, शाळेच्या खरेदीत कृपणता दाखवली नाही, सह शिक्षकांना देखील त्यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केलं आजही करतात.
आदरयुक्त भीती कशी असते हे आम्ही त्याच्या मूळेच शिकलो. आजही त्या हक्काने बोलतात भेटतात आणि शिक्षक आणि विद्यार्थी यातील अंतर गत सोनेरी आठवणीत अलगद गळून पडते. जपून ठेवलेली पैठणी पुनः बाहेर येते आणि डोळ्याच्या कडा हलकेच पाणावते.
पत्रकारितेचा मिळालेल बाळकडू अतिशय योग्य पद्धतीने समाज प्रबोधनासाठी त्यांनी वापरलं.
हराळी प्रकल्प, साखर शाळा, तंबू शिबिर, व्यक्तिमत्त्व विकास असे अनेक नाविन्यपूर्ण प्रकल्प त्यांच्याच प्रेरणेतून आम्ही शिकलो.
आपल्यातील नावीन्य ,सर्जनशीलता कशी जपावी आणि बहुरंगी विकास कसा साधावा हे त्यांनीच शिकवलं
अनेकांना वाचनाची आवड कदाचित त्यांच्या मुळेच लागली असेल.
पहाटेची ५:५५ ची उपासना आणि शनिवारची उपासना आणि मुलांसोबत संवाद त्यांनी फारसा चुकवली नसेल.
बहुतांश विद्यार्थ्यांचे पालकांना नावासकट त्या ओळखतात ज्यांची आजही आस्थेने विचारपूस त्या करतात.
प्रबोधिनी च्या माध्यमातून अनेकांना केलेली मदत त्यांच्या अपरोक्ष अनेक लोक आवर्जून  व्यक्त करतात अगदी पु ल प्रमाणे.
तत्वांना धरून व्यतीत केलेलं त्यांच तपस्वी जिवन अनेकांना नक्कीच प्रेरणादायी असेल. स्वतः अविवाहित राहून राष्ट्र कार्याला , समाज प्रबोधनाला , विद्यार्थी शिक्षणाशी आयुष्याशी गाठ मारणाऱ्या त्या खऱ्या कर्मयोगी आहेत.
मला माहितीये की त्यांना त्यांची स्तुती आवडत नाही पण मला आठवणारे, आवडलेले त्यांच्यातील हे काही पैलू आहेत ज्यांची यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने मी उजळणी करत आहे.
आपल्या यशामागे काही दृश्य आणि अदृश्य हात असतात पण आमच्या ज्ञानप्रबोधिनी मागे कै पेंडसे सरांचे आशीर्वाद ,कै अण्णांचे हातआणि आपल्या लाडक्या लताताई चे मूक हात आहेत.
काही संस्था येतात जातात काही येतात बहरतात आणि वटवृक्ष होतात त्या अशा तपस्वी कर्मयोग्यांमुळे.

पुनःच एकच म्हणेन जिवेत शरद शतम
सुदीनं सुदीनं जन्म दिन तव भवतु मंगलं जन्म दिन.
प्रिय लताताई गो अहेड, नाबाद सत्तर !
**ओंकार केळकर,** माजी विद्यार्थी, ज्ञान प्रबोधिनी सोलापूर, दहावी तुकडी २००१
****************************************************************************

साक्षात सरस्वती ने जर का मला प्रत्यक्षात दर्शन दिलं असतं तर ती कशी असती हे मी अनुभवलं आहे कारण मी डॉ. स्वर्णलता भिशीकर यांना पाहिलंय आणि त्यांचा सहवास मला लाभला आहे ...
आदरणीय लताताई १ मे २०२१ रोजी वयाची सत्तरी पूर्ण करत आहेत. त्यानिमित्ताने अनेक जण अनेक विषयांवर लिहिणार आहेत. कारण समाजातील अनेकविध क्षेत्रात त्यांचं मोठं योगदान आहे.
मला १९८९ ते २००२ (प्रत्यक्ष) आणि तद्नंतर आजवर प्रासंगिक असा जो सहवास लाभला आणि त्यांच्या सहवासातुन माझ्यावर घडलेल्या संस्कारांविषयी थोडंस लिहिणार आहे .
माझा शाळेचा भरतीचाचा दिवस मला स्पष्टपणे आठवतोय १९८९ साली आदरणीय कै. अण्णा ताम्हणकर, आदरणीय लताताई भिशीकर, आदरणीय गायत्रीताई सेवक यांनी माझा प्रशालेच्या भरतीची मुलाखत घेतली होती. ही प्रथम ओळख माझी आदरणीय लताताईंसोबत झाली.
अवंतिकाबाई आणि जनुभाऊ केळकर यांनी लावलेल्या रोपट्याचा वृक्ष झालेल्या बालविकास संस्थेचं हस्तांतरण पुण्याच्या ज्ञान प्रबोधिनी संस्थेस १९८९ साली झाले आणि प्रकल्प संभाळण्यासाठी म्हणून अण्णा , लताताई आणि गायत्रीताई सोलापूर ला आले.
पुढे ज्ञान प्रबोधिनी बालविकास मंदिर प्रशालेला केवळ परीक्षार्थी घडवणे नव्हे तर देश घडणीचे कार्य करणारे उत्तम प्रबोधक घडवण्याचे कार्य यांच्यामार्फत झाले . फटाके विक्री, साखर शाळा, बालकामगार प्रकल्प, भूकंप पीडित पुनर्वसन असे नानाविध उपक्रम संस्थेने केले.
जेष्ठ पत्रकार आदरणीय बापूसाहेब भिशीकर यांच्या कन्या आदरणीय स्वर्णलता भिशीकर यांच व्यक्तिमत्त्व मुळात सात्विक अध्यात्माचा विशेष ओढा असणाऱ्या संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींना आपला आदर्श मानणाऱ्या लताताई यांनी सामाजिक कार्यासोबत अध्यात्मिक कार्यात विशेष उल्लेखनीय कार्य केले आहे.
अभ्यासात विशेष रुची नसणारा १० वि अनुतीर्ण झालेला मी विद्यार्थी पण त्याला विशेष प्राविण्य असणाऱ्या कलाक्षेत्रात जाण्यासाठी म्हणून कोणत्याच शाळेने प्रोत्साहन दिले नसते हे मी आवर्जून सांगू इच्छितो .
माझे आई वडील जेंव्हा मी १० वी अनुत्तीर्ण झालो तेव्हा अण्णा आणि लताताई यांना भेटण्यास गेले होते तेंव्हा आदरणीय लताताई आणि अण्णांनी माझ्या आई वडिलांना निक्षून सांगितले होते की तुम्ही त्याला रस आहे त्या क्षेत्रात काम करू द्या शैक्षणिक अभ्यासक्रमाचा अट्टाहास धरू नका.
मी जेव्हा २००३ साली पूर्णवेळ व्यावसायिक वादक म्हणून काम करायला लागलो तेव्हा आदरणीय लताताईंचा मला फोन आला आणि म्हणाल्या प्रबोधिनी मध्ये ये मला आणि अण्णांना तुझ्याशी बोलायचं आहे . मी गेलो तेव्हा जवळपास दीड दोन तास मला ते दोघे हे सांगत होते की पूर्णवेळ व्यावसायिक वादक म्हणून काम करत असताना कोठेही आई वडिलांच्या नावाला धक्का लागेल असे कोणतेही काम तुझ्या हातून घडू नये आणि निघताना एका पाकिटात १०० ची नोट घालून मला शुभेच्छा दिल्या त्यावर लिहिले होते कलाकार म्हणून खूप मोठा हो आई वडील, शाळा आणि देशाचं नाव मोठं कर त्यावेळी त्यांनी हा विश्वास दाखवला नसता तर कदाचित आज मी वादक म्हणून जे काही आहे ते नसतो हे निश्चित. ( ते पाकीट अजूनही मी जपून ठेवलं आहे )

१९९६ साली सोलापूर मधील अनेक गिरण्या बंद पडल्या. माझे वडील देखील गिरणी कामगार होते माझ्या वडिलांची नोकरी गेली तेव्हा मी सहावीत होतो सहावी ते दहावी या ४ वर्षांतील २ वर्षाच्या शालेय शुल्कात सवलत आणि २ वर्षाचं शालेय शुल्क माफ केलं . आदरणीय अण्णा आणि लताताई यांच्या द्रष्ट्या नेतृत्वामुळेच हे शक्य झाले हे निश्चित .

पूर्णवेळ व्यावसायिक म्हणून काम करू लागल्यानंतर मात्र भेटी कमी झाल्या . पण मी सोलापूर ला गेलो ताई तिकडे असल्या तरी आवर्जून भेट घ्यायचो , ताई पुण्यात आल्या तर आवर्जून कळवायच्या मग भेट व्हायची . एक दोनदा हराळी ला ही जाऊन आलो तेव्हाही भेट झाली .

२०१६ साली विश्वविनायक वाद्यवृंदाची स्थापना जेव्हा आम्ही सोलापूर मध्ये केली त्याविषयी वर्तमान पत्रात लेख छापून आला तेव्हा आवर्जून ताईंचा फोन आला आणि म्हणाल्या आम्हाला तुझा प्रचंड अभिमान वाटला की आपला विद्यार्थी नेहमीच्या चाकोरीबद्ध वाटेवर न जाता वेगळ्या वाटेवर जाऊन उत्तम कार्य करत आहे हे पाहून आनंद झाला असंच कार्य तुझ्या हातून घडो ...

खरं तर आदरणीय लताताई या अलौकिक प्रतिभा लाभलेल्या व्यक्तिमत्त्व आहेत . त्यांच्या व्यक्तिमत्वाविषयी विस्तृत लिहायला गेलं तर लेख पुरेसा नाही पण आज ताईंच्या सत्तरी पूर्ती निमित्त काही भावना व्यक्त कराव्यात म्हणून हा प्रपंच.

आदरणीय लताताई आपणांस उदंड निरोगी दीर्घायुष्य लाभो या शुभेच्छा आणि तुम्ही दाखवलेल्या राष्ट्र घडणीच्या मार्गावरून आम्ही सदैव चालत राहो हीच प्रार्थना ...

सदैव आपलाच

**नागेश भोसेकर.** माजी विद्यार्थी, ज्ञान प्रबोधिनी सोलापूर, दहावी तुकडी २००१

*****************************************************************************

आदरणीय तीलताताई आपणास माझा साष्टांग नमस्कार.,

आज तुम्हाला शुभेच्छापर पत्र लिहायला घेतले आणि १९९३ पासूनचा सगळा काळ आठवलाजेव्हापासून मी . युवा विभागाच्या माध्यमातून प्रबोधिनी परिवारातआलो त्याला जवळपास ३० वर्षे होत आलीपण त्या बैठकीत . वाचलेले भगवद्गीते मधले स्थितप्रज्ञ दर्शन आणि गीताई मधील त्याची समश्लोकी अजूनही तितकीच स्पष्टपणे आठवते आहे. त्यानंतर बरेच कार्यक्रम झालेखूप वेळा मी . तुमचं मार्गदर्शन घ्यायला सोलापूरला भेटलो. तुमची भेट आणि तुमचे मार्गदर्शन नेहमीच प्रेरणादायी ठरलेपण विशेषत्वाने मला आज इथे सांगावीशी वाटणारी . कचरतच मी बहुतांशी मनात .आठवण ती म्हणजे मी इकडे अमेरिकेला आल्यानंतर तुम्हाला केलेला दूरध्वनी विचार केला .तुम्हाला कॉल केला, ताई म्हणतील इथे असताना कधी फोन नाही आला ह्याचा आणि आता सातासमुद्रा पलीकडे गेल्यावर हयाला आठवण झालीपण .विशेष म्हणजे मी हे तुम्हाला बोललो देखील . तुम्ही इतक्या सहजतेनं म्हणाला की अरे लांब गेल्यावर आपल्या माणसांची विशेष आठवण येते आणि ते खूप साहजिक आहेतेव्हा कळले की तुम्ही . येवढ्या मोठ्या निवासी गुरुकुलचे पालकत्व कसे काय करू शकता . त्याला तुमच्यासारख विशाल मन, दृष्टिकोन आणि प्रेमळ अंतकरण असावे लागते. तुमच्या १०जरी मला हे % गुण माझ्या अंगी बाणवता आले तरी मी खूप धन्य होईन असे मला प्रामाणिकपणे वाटतेतुमच्या आध्यात्मिक . सत्संगाचा अनुभव तर खूप जणांनी घेतला. पण कन्याकुमारी शिबिरामुळे खूप जवळून आपला सहवास लाभला . तुम्ही वेळोवेळी मला मार्गदर्शन केलं, प्रोत्साहन दिले त्याबद्दल मी तुमचा खूप खूप ऋणी आहे.

लता म्हणजे वेलह्या .चकाकणे हा सोन्याचा गुणधर्म .त्यात तुम्ही तर स्वर्णलता .वेलीचा गुणधर्म बहरणे हाच . दोन्हीचा मिलाफ़ तुमच्या नुसत्या नावात नाही तर व्यक्तिमत्वामध्ये आहेहया स्वर्णवेलीच्या ज्ञानाच्या तेजाने . आणि प्रेमाच्या बहराने आम्ही जसे उजळून निघालो, तसे अनेकांचे जीवन उजळत राहो हीच त्या जगन्नियामक,

सर्वोत्तम श्रीविष्णुचरणी प्रार्थना.
या तुमच्या वाढदिवसाच्या मंगल दिनी आपणास आनंदी, निरामय आणि समृद्ध दीर्घायुष्य लाभो हीच श्रीहरी वायू गुरु चरणी प्रार्थना करतोतसेच इच्छा करतो की तुमच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाच्या वाढदिवसालादेखील मला .
.च शुभेच्छा देण्याची संधी मिळोअशा
आपला आज्ञाधारक
**धनंजय कुलकर्णी,** सिएटल, यु एस ए
*****************************************************************************

**१ रुपयाचे नाणे**

प्रथम आदरणीय लाताईंना वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा !!!
सन २००२ मध्ये सोलापूर मधील दुसऱ्या प्रशालेत इयत्ता ५ वी मध्ये शिकत होतो.माझी आई सौ.चित्रा वझे,आदरणीय ताईच्या सत्संग ला प्रबोधिनीत जात असत. माझ्या मुंजसोहळया च्या आदल्या दिवसांमधील ताईचा आशीर्वाद घेण्यासाठी झलेली पहिली भेट.
आता पर्यंत ताईच्या सोबती मधील बरेच आठवणी आहेत, पण त्यातील आवर्जून आठवणीतील एक घटना आयुष्य जगण्याचं एक सूत्र सांगून जाते.
मला आठवतंय, सुरवातीच्या काळात दर शनिवारी व रविवारी ताई सत्संग निमित्त हरळी होऊन सोलापूर ला येत असत, आणि बरेचदा रविवारी सकाळी उपासने नंतर मला ताईबरोबर प्रबोधिनी जवळील सिद्धेश्वर मंदिरास जाणायची संधी मिळत.
असच एकदा मंदिरास जाताना वाटेत मला १ रुपयाचे नाणे सापडले, आणि अर्थात मी ते पटकन उचलले. ताई सोबतच होत्या ,त्यांनी ते पाहिलं.
त्यावर त्या म्हणाल्या " असे रस्त्यात सापडलेले पैसे कधी हि स्वतः कडे ठेऊ नये, ते मंदिराच्या दान पेटीत टाकावे, कारण ज्या व्यक्तीचे ते पैसे असतील तो विचार करत असणार, चलबिचल असणार, त्याची तळमळ-तळ तळ आपल्याला लागते, त्यामुळे ते पैसे परमेश्वराला अर्पण करावेत. त्यावेळी (६वी दरम्यन ) मला फारस कळलं नाही,मी पैसे पेटीत टाकले.पण आयुष्यात पुढे त्याचा अर्थ उमगत गेला.
आज त्या घटनेला तटस्थ पणाने पाहिलं तर, एक समज मिळते कि, इतरांचे पैसे,वस्तू किंवा इतरांबद्दल आपल्या मनात आलेले वाईट विचार, आपल्या भवतीक विश्वातील प्रगतीसाठी व देह त्यागानंतर च्या प्रवासात बाधा ठरू शकतो.
माझ्या आईमुळे आ.ताई सारख्या अश्या थोर व्यक्तिमत्वाचं जवळून सहवास लाभला, त्यामुळे मी तिचा व परमेश्वराचे खूप आभार मानतो.
परत एकदा आदरणीय ताईंना दीर्घकाळ उत्तम प्रकृतीसाठी मनः पूर्वक शुभेच्छा!!!

**-अग्रजीत वझे**

*****************************************************************************

//**श्री**//

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे असेच एक संत आम्हास ज्ञान प्रबोधनी मध्ये मा. स्वर्णलता भिशीकर यांच्या रूपात दिसले मा. लताताई मुळे सोलापूर मध्ये सत्संग केंद्र सुरू झाले व दर रविवारी त्यांच्यामुळे सर्व सोलापूरकरांना सत्संगाचे ज्ञान मिळू लागले.

मी जेव्हा ज्ञानप्रबोधिनी शाळेत कामास लागले तेव्हा मा. आण्णा व मा. लताताई सन 1989 मध्ये सोलापूर मध्ये आले. त्यावेळेस आम्ही दोघेच मावशी (शांता मावशी व चतुरा मावशी ) कामास होतो. त्यावेळेस प्रबोधिनी मध्ये दोन ताट व दोन तांबे एवढेच होते. एवढ्यावरून त्यांनी प्रबोधिनी निर्माण केली, त्याकरीता दिवस-रात्र कष्ट केले. ताईंचे व्यक्तिमत्त्व असे आहे की आम्हास पण त्यांनी धीटपणा, शिस्तपणा व  कामात नीटनेटकेपणा शिकलो.
ताईंचे दररोजचे नित्यनेमाने सकाळी 7 वाजता गेट समोर येऊन उभे राहणार. सर्वजण त्यांना नमस्कार करून पुढे जाणार.अगदी शिशू मुले-मुली पासून पालक, कर्मचारी व सर्व शिक्षक नमस्कार करणार, त्यामुळे सर्वांच्या चेहऱ्यावर एक प्रकारचे तेज असायचे व कामातही खूप उत्साह असायचा. मा. ताई मुळे आम्हास विविध सहलीला जाण्यास मिळाले. ताईनी कधीही कर्मचारी म्हणून भेदभाव केलेला नाही. ताई मुळे आम्हास कन्याकुमारीही पाहता आली. तसेच त्यांच्यामुळे आमचे घर सुधारले हे सर्व लताताई मुळे शक्य झाले आहे. आई सारखे दुसरे दैवत नाही. ताईंनी आम्हास आई प्रमाणे माया प्रेम दिले. आमच्यासाठी आई म्हणजे लताताईंच.
तसेच एक आठवण म्हणजे आम्ही पावसात भिजून शाळेत आलो तेव्हा स्वतःच्या कपाटातील साडी आम्हास बदलण्यासाठी देणार असे मोठ्या मनाच्या आमच्या ताई.....
अशा या आमच्या ताईंना शांता मावशी पाटील परिवारातर्फे वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा...

आपली

**श्रीमती शांता पाटील** मो. क्र. 9422003003 / 9890563003

*****************************************************************************

नमस्कार

आज ७०री पूर्ण करून ७१व्या वर्षात पदार्पण करीत आहात ताई यानिमित्ताने आपल्याला जन्मदिनाच्या  कोटी कोटी शुभेच्छा. खरं तर शुभेच्छा हा शब्द लता ताई च्या प्रति माझ्या भावना व्यक्त करण्यासाठी फार अपूरा आहे.
मला ज्ञान प्रबोधिनी संस्था माहिती नाव्हती आणि तेथे चालणारे उपक्रम, प्रकल्प, समाजकार्य या गोष्टींपासून अनभिज्ञच होते.
मी मुळात कर्नाटकची. माझं लग्न २००३ साली झालं व मी सोलापूरला आले. लग्न झाल्या झाल्या पहिल्या रविवारी मला लता ताईंचे व्याख्यान ऐकण्याचे भाग्य मिळाले. मराठी बोलणं तसं अवघड होतं. मारठी नीट जमत नसल्यामुळे ताई काय बोलताहेत अजिबात माझ्या डोक्यात गेलं नाही.
मला माहीत नव्हते की मी व्याख्यान ऐक्याला चलले म्हणून. मी आपली नवी नवरी नवर्याबरोबर गेलेले. म्हणून दागिने व छानसे मेकअप करून व्याख्यानाला बसले होते. मला हे माहीत नव्हतं की मी कुठे आले, कुणा समोर बसले, समोर बोलणारे व्यक्ती कोण आहेत, मला काहीच कल्पना नव्हती. जाम वैतागले होते. माझे पती कैलास कनाळे यांनी माझी व लता ताईंची ओळख करून दिली. आम्ही दोघे जोडीने नमस्कार केला. मी पहिल्यांदा भेटले म्हणून मला गोड खाऊ पेढा दिला होता. लता ताई जे काही शुद्ध मराठीत छान आणि गोड आवाजात बोलत होते ते आवडत होतं पण मला नीट काही समजत नव्हतं. असं वाटत होतं की हे मी कुठे आले, कोण आहेत हे ? आणि माझा नवरा नवीन लग्न झालंय, मला छान फिरायला घेऊन जायचं सोडून मला प्रवचन ऐकायला बसवलं. तेव्हा मला राग आला होता पण आता त्यांनी योग्य केल अस वाटतं.
लग्ना नंतर माझ्या कुटुंबातल्या सदस्यां बरोबर जुळवून घेणं जरा अवघड चाललं होतं. काही अडचणी येत होत्या त्यामध्ये नकळत मला लता ताईंचा आधार कधी व कसा मिळाला कळलंच नाही. सासरी भांडण झाल्यावर मुली माहेरी निघून जातात पण मी मात्र लता ताईंच्या छत्र छायेत व कुशीत यायची. मी म्हणायचे की "ताई आता मी

सासरी जाणारच जाणार नाही". मग ताई म्हणायच्या "ठीक आहे". पण दोन तीन तासांनी मीच ताईं समोर उभारुन म्हणायचे की "मला घरी जायचं आहे". ताई म्हणायचे "हो का, ठीक आहे जाऊ शकतेस" एवढेच म्हणायचे आणि अलगद पाठीवरून हात फिरवून फाटका पर्यंत सोडायला यायचे. ताईंचे ते पाठीवर प्रेमाने फिरवलेले ते हात अजूनही माझ्या मागे आहे म्हणून आज ही मी माझ्या घरात व्यवस्थित व सुखाने संसार करत आहे.
२००६ साली मी शिशु अध्यापिका विद्यालया मध्ये प्रवेश घेतला. तेथून माझं घर आणि प्रबोधिनी असा प्रवास सुरू झाला. हे करत असताना घर, प्रबोधिनी, आणि सामाजीक कामांमध्ये मी कधी रमले समजलेच नाही.
लताताई सोलापूर केंद्रात येतात तेव्हा आवर्जून त्यांना भेटायला जायचे मी. खरं तर माझं काहीच काम नसायचं, फक्त त्यांना नमस्कार करण्यासाठी जायचे. पण त्यात माझा एक स्वार्थ असायचा. जेव्हा मी वाकून नमस्कार करायचे तेव्हा लता ताई प्रेमाने अलगद पाठीवरून हात फिरवत आणि आई प्रमणे कुशीत घेत ते माला हवं हवंस वाटायचं.
मला मुल झाले नाही म्हणून मी बरेच वैद्य, उपचार, पंचांग बघणे वगैरे वगैरे जे जे करता येतील ते सगळं करत होते. पण लताताईंनी माझ्यासाठी वेगळीच योजना केली होती. आ. आण्णा ताम्हणकर आजारी असतना अण्णांना सकाळची न्याहारी भरवण्याचे भाग्याचे काम माझ्या पदरी दिले. नंतर दररोज दवाखान्यात दोन तास त्यांच्या सोबत राहण्यासाठी पाठवलं होतं. सुरुवातीचे काही दिवस मला समजतच नाव्हत की हे काय होतंय. पण थोड्या दिवसांनी मला समजलं की ताईंनी आ. आण्णांची आई बनवलं होतं मला. तो क्षण माझ्यासाठी अविस्मरणीय आहे माझ्या आयुष्यात. अण्णांची आई होण्याच सौभाग्य लता ताईंनी मला दिलं आणि त्यासाठी मी सदैव ऋणी असेन. अण्णांचा आणि माझा संवाद व्हायचा व त्या संवादातून कळत होतं की मला अजून प्रबोधिनीचे कार्य काय व कशाप्रकारे करायचे आहे व कुठे कुठे करायचे आहे. प्रबोधिनीतील व बाहेरील काही लोकांना असे वाटते की मी खूप विषयांमध्ये कमी आहे. पण लताताई आणि आण्णा यांच्या दृष्टीत मी पुढे काय करणार आहे हे त्यांनी बघितले. यासाठी मी स्वतःला खूप भाग्यवान समजते की आ. लता ताईंनी माझ्या वर विश्वास ठेऊन ८० वर्षाच्या आ. आण्णांची सेवा सुश्रुषा करण्यासाठी पालकत्व करण्याची जबाबदारी माझ्या हाती दिले होते. आज त्या विश्वासाच्या बळावर ज्ञान प्रबोधिनीचे कार्य कर्नाटकात सुरुवात केली आहे.
मी कैलास ची पत्नी होऊन खूप धन्य आहे की त्यांच्या मार्फत ज्ञान प्रबोधिनी मध्ये एक छोटीशी कार्यकर्ता म्हणून देश सेवा करत आहे.
मला असे अनेक अनुभव आहेत की मी संस्थेचे काम करत असताना उपाशीपोटी असायचे, लताताईंना समजायचं की मी जेवले नाही. मग काय ताई स्वात: ताट लावून समोर बसून आग्रह करून जेवू घालत. त्यांच्या हातून ग्रहण केलेला तो प्रसाद चांगले विचार चांगले कार्य करण्यास नेहमीच प्रेरणा देतात. जेव्हा जेव्हा वरिष्ठांची सेवा करण्याचे भाग्य मिळायचे ती संधी मी दवडत नाही.
पुन्हश्च लता ताईंना जन्मदिनाच्या कोटी कोटी शुभेच्छा.
सुदिनं सुदिनं जन्मदिनं तव ||
भवतु मंगलं जन्मदिनम् ||
आपली कृपाभीलाशी
**सौ. श्वेता कैलास कनाळे**
***********************************************************************

नमस्ते आ.लताताई, मी मुक्ता.

तुम्हाला तुमच्या ७०व्या वाढदिवसाच्या आई (सुषमा दाबके) मीरा, मी व अनन्या (माझी मुलगी) आम्हा सर्वांकडून खूप खूप शुभेच्छा. तुम्हाला आनंदी आणि दीर्घायुष्य लाभो ही स्वामी चरणी प्रार्थना.
तुम्ही माझ्या आजीला सुद्धा जवळच्या होतात. त्यामुळे तुम्हाला तिच्या कडून सुद्धा अनेक शुभेच्छा.
लवकरच आपली भेट होवो आणि आम्हाला सर्वांना तुमचा प्रत्यक्ष आशिर्वाद घेण्याची संधी लाभो ही मनोकामना.
आपली
**-मुक्ता मिलिंद दाबके.**
(९९२२४००८०६)
*******************************************************************************

**"एक गगनवेल... विद्यावाचस्पती स्वर्णलताताई "**
विद्यावाचस्पती आदरणीय स्वर्णलताताई भिशीकर यांचा आज सप्तदशकपूर्तीचा शुभसमारंभ ! त्यांची " अमृत महोत्सवाकडे " वाटचाल ! साधनामग्न अशा आदरणीय ताईंच्या सोळा कला पूर्ण करुन सतरावीयेचे स्तन्य प्राशन करण्याची सिद्धता ! ताई एक तपस्वी व्यक्तिमत्त्व ! साधनशुचितेची परिसीमा, एकान्ती आणि लोकान्ती तितक्याच अलिप्ततेने, समरसतेने कार्यमग्न असणारी शुचिसंपन्न योगिनी म्हणजेच ही माझी अंतरंग सखी स्वर्णलता ताई !
आपण वेली खूप बघतो. बहूतेकींना मांडव घालून दिलेला असतो. तर काही जणी दिसेल, शेजारी असेल त्याच्या आधाराने बिलगुन वर चढत राहतात, नाही तर भुईवर सरपटत पसरतात. काही झाडाच्या आधाराने राहतात. पण मी ही अशी " गगनवेल " बघीतली आहे.
कि तिच्याच आधाराने गिरीतरु देखिल नीट उभे राहतात तिच ही गगनवेल म्हणजे " स्वर्णलता ताई !" लताताई माझे अत्यंत जिवलग व श्रद्धा स्थान आहे. सात वर्षापूर्वी मला ज्यांच्या सहवासाचा दिड वर्षे परिसस्नेह लाभला आणि माझा एकूणच स्वतःकडे पाहण्याचा एक सुंदर व उन्नत दृष्टीकोन लाभला. मलाच माझ्याकडे पाहता येऊ लागले. आत्मविकासाला केवळ आपले आपणच कारण असतो हेही कळले त्या लताताई !
ज्ञान प्रबोधिनीच्या कार्यात जवळपास पन्नास वर्षे त्या आपले योगदान देत आहेत. पुणे ते सोलापूर, आणि सोलापूर ते हराळी असा त्यांच्या कार्याचा चढता प्रवास. एक थक्क करणारे सामाजिक, शैक्षणिक, राष्ट्र हीतकारी कार्य त्यांनी निस्पृह तेने उभे केले आहे.
पंढरपूरला आमच्या मामांकडे म्हणजे कै. पू श्री. वा. ना. उत्पात यांच्या कडे त्या आई वडिलांबरोबर आल्या होत्या. तेंव्हा त्यांचे वडिल कै. बापूसाहेब भिशीकर मला म्हणाले , " काय करता आपण ? " मी म्हणाले, " मुद्रणव्यवसायात मुलाबरोबर काम करतेय पण आता वेगळ काही करावे वाटतेय . " तसे ते म्हणाले, " वाटते तर मग उशीर कशाला कामाला ? कामाला लागा, चला लगेचच.
" जरी उद्धरणी व्यय न तिचा हो साचा ।
हा व्यर्थ भार विद्येचा ।। "
आमच्या लताबरोबर ज्ञान प्रबोधिनीच्या हराळीच्या शाळेत मदत करा. खूप शिकायला मिळेल. चला येता का आमच्या बरोबर ? " मी खरच चटकन तयार झाले आणि त्यांच्याबरोबर हराळीला दाखलही झाले.
भूकंपग्रस्त भागातील माळरानावर ज्ञान प्रबोधिनीच्या माध्यमातून निवासी शाळा व शेतीचा मोठा प्रकल्प उभा करुन तो यशस्वी करण्यासाठी त्याचबरोबर परिसरातील अशिक्षित, गरजू समाजाला शिक्षणाचे, ज्ञानाचे महत्व पटवून देऊन त्यांच्या हाताला काम आणि बुद्धीला ज्ञान, मनाला सुसंस्कृत करण्यासाठी ताईंनी आणि स्वर्गीय

विद्यावाचस्पती व. सि. तथा आण्णासाहेब ताम्हणकर यांनी अविश्रांत परिश्रम केले आहेत. आजही त्या ते काम करतच आहेत.

लोक कल्याणार्थ, राष्ट्र कल्याणार्थ समर्पित असे त्यांचे जीवन आहे. महाराष्ट्रातील एक विदुषी लेखिका, प्रवचनकार, व्याख्याती म्हणून त्या सुप्रसिद्ध आहेतच. शिक्षणतज्ज्ञ आहेत. उपनिषदांचा गाढा अभ्यास आहे. श्री संत साहित्याच्या सखोल अभ्यासक, सर्जनशील प्रतिभासंपन्न कवियत्री, देव देश धर्माभिमानी, वीररसपूर्ण सामर्थाच्या गाथा लिहिणार्या सिद्ध हस्त लेखिका म्हणून त्यांची ख्याती आहे. एक तेजस्वी सात्विक श्वेतवसना प्रसन्न मूर्ती म्हणजे लताताई!

मी हराळीला त्यांच्या सहवासात होते तेव्हा त्यांच्या आचार विचारांनी मी खूपच भारावून जात असे. मला त्यांच्या निमित्ताने कितीतरी थोर व्यक्तींचा सहवास मिळाला, विचार ऐकायला मिळाले. विविध क्षेत्रातील नामवंत, विचारवंत दिग्गज बोलावून त्यांच्या ज्ञानाचा उपयोग खेड्यातील विद्यार्थ्यांना , ग्रामस्थांना कसा होईल या साठी त्यांचा अखंड प्रयत्न असतो. अनेक प्रकारची शिबीरे भरवून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास कसा होईल , ते सूज्ञ व सुजाण नागरिक कसे बनतील यासाठी ताईंचा कटाक्ष असतो. त्यांचे मन आणि मनगट घडले पाहिजे यासाठी ताई आईच्या मायेने, काळजीने कार्य करताना दिसतात.

ताईंशी गप्पा गोष्टी करताना खूप आनंद मिळतो त्याच्याकडून खूप ज्ञान मिळते. त्या इतक्या प्रेमाने सर्व थरातील व्यक्तींशी बोलतात. त्यांच्या व्यथा व समस्या समजून घेऊन त्या सोडवण्यासाठी खूप प्रयत्न करतात। त्यांना न्याय मिळवून देतात. अडचणी मधे असलेल्या, पिडीत मुलींना, महिलांना आश्रय, आधार देतात. त्या भुकेलेला अन्न आणि हाताला काम देण्यात त्या खूप कनवाळू, दयार्द व तत्पर असतात.

माझ्यावरील निस्सीम स्नेहापोटी त्यांनी मी लिहिलेल्या "नारी तू नायायणी ! " या पुस्तकाला वेळ काढून प्रस्तावना लिहून दिली. खरच त्यांच्या प्रेमळ सहवासाचा माझा तो हराळीतील काळ मला खूप समृद्ध करुन गेला. "वैष्णव" शद्बाचा अर्थ खोलवर रुजवला तो फक्त लताताई व स्व. आण्णासाहेबांनी. ते दोघेही खरे निस्सीम कर्मयोगी आहेत. भक्ती, ज्ञान आणि कर्म याचा सुरेख संगम लताताईंच्या व्यक्तिमत्वात आहे. पोलादीमनाच्या तरीही कनवाळू अशा ताईंच्या मनावर श्रीज्ञानेश्वर माऊलींचा प्रभाव आहे. तर आचारात शांतीब्रह्म एकनाथांचा भाव दिसतो. विचारात, अनुशासनात श्रीतुकयाचा व श्री समर्थांचा बाणा स्पष्ट पणे दिसतो. खरच आजच्या काळात ताईंच्या रुपाने एक संत परंपरेतील साध्वी महाराष्ट्राला, सोलपूरला मिळाली आहे हे भाग्य आहे. श्री नाथांच्या शद्बात मी त्यांचे वैयक्तिक थोरपण सांगताना त्याच्या अंगीकृत कार्याला व साधनप्रवासाला नमन करुनम्हणेन,

" कर्मरेखा नोलांडिता । नीज व्यापारे वर्तता । आत्मबोध सर्वथा । न मैळे ॥ " असे त्यांचे वैराग्य संपन्न परमशांतीरुप जीवन आहे. स्त्रीपणाच्या सार्या आदर्श परंपरेच्या चौकटीत राहूनही सारा पुरुषार्थ व पराक्रम गाजवून घराण्याला, समाजाला भूषणावह असणाऱ्या ताईंनी आपले परम पूज्य पिताश्री,सव्यसाची पत्रकार, विचारवंत, विद्वान संपादक स्वर्गीय चं. प. भिशीकरांचे आणि मातोश्री राष्ट्र सेविका समितीच्या जेष्ठ सेविका स्वर्गीय कुसुमताई भिशीकर यांचा ऋषितुल्य वारसा अधिक तेजाने पुढे नेऊन त्यांना धन्य केले आहे.

खरच ताईंसारखी " लता"सुवर्णमयी असूनही सुगंधीत आहे. त्यांच्या विचारांचा ठेवा, त्यांचा ममतेचा स्नेह त्यांच्या लेखणीतून, वक्तृत्वातून आम्हांला दीर्घकाळ लाभावा यासाठी श्री सद्गुरू, परमात्मा श्री पांडुरंग ताईंना निरामय दीर्घ आयुरारोग्य देवो हीच मंगल प्रार्थना !

**श्रीमती मानसी मार्तंड केसकर,** पंढरपूर, भ्रमणः ७५८८३७५४३९

**************************************************************************

**मा. लताताई,**

सर्वप्रथम तुम्हाला जन्म दिवसाच्या अनेक अनेक शुभेच्छा! यापुढील संपूर्ण आयुष्य आरोग्यदायी आणि तुमच्या इच्छे नुसार असो ही प्रार्थना!
खूप काही वाटते कायम तुमच्याशी बोलावे, वेगळेच अप्रूप असते तुम्हाला भेटण्याचे, कायमच हवाहवासा वाटतो तुमचा सहवास आणि त्या निमित्ताने तुमच्या सोबत होणारे काम…
मानसशास्त्र विषय निवडल्यानंतर जेव्हा कळत गेले की प्रबोधिनीतील मा.आप्पा, मा.उषा ताई आणि तुम्ही अशा तुम्हा सर्वांचा हा विषय आहे… तर असे वाटले की शोधत होतो ना की प्रबोधिनी मध्ये काय करायचे… ते सापडले… आणि म्हणूनच कायम आपल्या संपर्कात असण्याची इच्छा असते..
कार्यदिशेच्या निमित्ताने माझ्या लाडक्या, जवळच्या, आवडत्या विषयात सहभागी होता आले आणि त्याला पण तुम्ही मार्गदर्शक आहात तसेच मा.उषा ताईंकडून कळाले जेव्हा की आपल्याला शुभेच्छा पत्र लिहावे तेव्हा पण पुन्हा एकदा हे जाणवले की वेगवेगळ्या पद्धतीने जोडले जाण्याची संधी मिळते आहे…
ही अशी संधी तुमच्या सोबत कायम मिळत राहो अशीच प्रार्थना….आणि वेळोवेळी आपले मार्गदर्शन मिळण्याचे भाग्य मिळो ही मनापासून इच्छा...
तुम्हाला पुन्हा एकदा मनापासून हार्दिक शुभेच्छा! तुमचे आशीर्वाद कायमच सोबत असावेत ही इच्छा!
पुनश्च शुभेच्छा.
**अस्मिता इनामदार**, निगडी
*************************************************************************

आदरणीय लताताई,

सादर प्रणाम !

अत्यंत निःस्वार्थ आणि सत्वगुणसंपन्न आयुष्य कसं जगावं याचे पथदर्शन आपल्या सहवासातून आम्ही कार्यकर्ते शिकतो आहोत. प्रबोधीनिच्याच नाही तर अन्य अनेक संस्था संघटनांच्या कार्यकर्त्यांना कामाची प्रेरणा, दिशादर्शन प्रदीर्घकाळ आपण करीत आहात. अध्यात्म, शिक्षण, मानसशास्त्र अशा विषयांमधले आपले अनुभवसिद्ध चिंतन म्हणजे कार्यकर्त्यांच्या नित्य कामाला मिळालेले मोठे बळ आहे. इंग्रजी, मराठी, हिंदी, संस्कृत या भाषांचा आपला अभ्यास इतका मोठा असल्यानेच आपल्या वाणीला जणू देवी सरस्वतीने आशीर्वाद दिला आहे. त्यामुळेच अध्यात्म असू देत किंवा ललित लेखन असू देत, सामाजिक कार्यकर्त्यांशी नित्य संवाद असू देत किंवा भाषांतरासारखे काही काम असू देत, आपण केलेले लेखन किंवा आपले भाषण – प्रवचन म्हणजे उर्जानिर्मितीचे केंद्र ठरले आहे. आपण रचलेली प्रबोधन गीते ही कामाच्या आशयाचे चिंतन आणि कामासाठी प्रेरणेचे अमृतसिंचन झाली आहेत.

निगडीच्या कार्यकर्त्यांशी विविध निमित्ताने आपण संवाद केलेला आहे. अनेकांशी व्यक्तिगत संवाद असतो. सध्या प्राथमिक शिक्षण समितीमधील सदस्य आपल्या नित्य संपर्कात असल्याने त्यांना आणि त्यानिमित्ताने आम्हा सर्वांनाच आपल्या मार्गदर्शनाचा लाभ मिळतो आहे.आदरणीय भाऊंसोबत वेद वाङ्मय, पंचकोशाचे चिंतन, शिक्षणाबद्दलचे चिंतन असे नेहमी चालू असे. अनेकदा त्याबद्दलचा उल्लेख आवर्जून आ. भाऊंच्या बोलण्यात येत असे. त्यांच्या मनातही आपल्या प्रदीर्घ कामाबद्दल, चिंतन आणि व्यासंग याबद्दल मनोमन कृतज्ञभाव होते. त्यांच्या बोलण्यातून आणि सहज कृतीमधून तो भाव व्यक्तही होत असलेला आम्ही अनुभवला आहे. खरेतर आम्हा सर्वच कार्यकर्त्यांच्या मनात तो भाव आहे. पण थोड्या शब्दांच्या चौकटीत आपल्याबद्दल आमच्या मनात असलेली कृतज्ञतेची भावना कशी बांधणार?

निर्मळ झऱ्याच्याशेजारी नुसतं बसलं तरी समाधान मिळावं असा आपला सहवास आम्हाला नेहमी हवा असतो, अजून दीर्घकाळासाठी तो हवा आहे. परमेश्वरा, ताईंना निरोगी आणि उदंड आयुष्य दे एवढीच प्रार्थना या आनंदक्षणी करू शकतो. खरेतर ताई, आम्हालाही अर्थपूर्ण काम करण्यासाठी शुभेच्छा, आशीर्वाद आणि दिशादर्शन करावे अशी आपल्यालाच प्रार्थना आहे. आम्हा सर्वांचा मनःपूर्वक नमस्कार ! कळावे,

आपले,

**केंद्रीय समिती सदस्य,**

**ज्ञान प्रबोधिनी, निगडी.**

**********************************************************************

शुभ्र धवलसे वस्त्र नेसली, उभी शुभांगी पहा!
शुभ्र वस्त्रापरी,जियेचे मानस शुभ्र महा!
अपार माया सकलांसाठी, दाट जियेचे उरी!
पवित्रशा प्राजक्त फुलांचा,पाऊस सर्वांशिरी!!
पाऊस सर्वांशिरी!!

**-- सौ.विद्या - अविनाश. सोलापूर.**

****************************************************************************

**अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्र: करूण एव च**

(श्रीगीता १२.१३)

अनेक ज्येष्ठ,श्रेष्ठ,विद्वान व्यक्तींची आपली भेट होते, त्यांचे प्रबोधन मनाला स्पर्श करणारे असते पण त्यातही अगदी मोजके श्रेष्ठ,पथदर्शींचा आधार वाटावा अशी प्रतिमा आपणा अनेकांच्या मनी कायम साठी कोरली जाते, प्रत्यक्ष भेटी कमी होत असतीलही पण त्यांचे विचार प्रेरणा सतत सोबत आहेत ही खात्री असते! आदरणीय डॉ स्वर्णलता भिशीकर अर्थात लताताई असेच विरळा, दुर्मिळ, त्यागी तितकेच प्रसन्न व्यक्तिमत्व आहे,आज लताताई वयाची सत्तरी पार करीत आहेत ह्याचा मनस्वी आनंद आहे,त्यांचे हार्दिक अभिष्टचिंतन!

श्रीगीतेतील बाराव्या अध्यायातील अद्वेष्टा सर्व भूतानां ह्या श्लोकातील सर्व विशेषणे लताताईंना लागू पडतात असेच त्यांचे जीवन आहे. ह्या श्लोकावरील श्रीमाउलींचे भाष्य आणि लताताईंचे कार्य,त्याची व्याप्ती,त्यांची वाणी आणि आचारधर्म तंतोतंत जुळते आहे हे दिसून येते. आपणा सर्वांचे हे महद् भाग्य आहे की सत्संगाचे योगाने ताईंच्या प्रबोधनाचा,आशीर्वादाचा लाभ घेता आला.

१९८८ मध्ये ज्ञान प्रबोधिनीचे प्रतिनिधी म्हणून शिक्षणतज्ञ आण्णासाहेब ताम्हनकर आणि लताताई सोलापूरला आले आणि केवळ वास्तू निर्मितीचे वैभव हा उद्देश न ठेवता बालमनांवर सुयोग्य संस्कार रुजवीत एक आदर्श पिढी कार्यरत व्हावी ह्याच संकल्पना त्याच्या दृष्टिपुढे होत्या. आज सोलापूर आणि हराळी येथे शिक्षण घेतलेली मुले कै आण्णा आणि ताईंचे ऋण मान्य करून आपल्या कार्यक्षेत्रात अग्रेसर आहेत.

जानेवारी १९९३ पासून सत्संग केंद्र माध्यमातून ताईंची दासबोध,ज्ञानेश्वरी वरील प्रवचने ऐकण्याची संधी मला मिळत गेली. आपल्या दैनंदिन जीवनात अध्यात्माचे महत्व कसे असू शकते आणि प्रापंचिक जबाबदारी,आव्हाने प्रसंगी संकटात सुद्धा आपली समतोल वृत्ती राखता येऊ शकते हे ताईंचे मार्गदर्शन, पाठबळ ह्यामुळेच शिकता आले. त्यांचा आश्वस्त तितकाच विश्वासू धीरगंभीर शब्द माझ्याप्रमाणे अनेकांना मना होय उत्सावो|धैर्याचा ह्याच परिणामाची साक्ष देणारा ठरला आहे.

ताईंची स्वतःची ध्यान नाम योग साधना, सद्गुरू माधवनाथ यांची पूर्ण कृपा,संत विमलाजी ठकार यांचे प्रेम वात्सल्य ह्या सर्वांमुळे ताई आज अध्यात्म क्षेत्रातील अनुभूतीजन्य उंचीवर पोहोचल्या आहेत आणि तरीही प्रसिद्धी विन्मुख आहेत.आपल्या कार्य व्यस्ततेतील काही काळ त्या मौन ध्यान चिंतन साधनेसाठी व्यतीत करतात हे विशेष आहे,२००७ मध्ये श्रीक्षेत्र माचणूरला वर्षभर त्यांनी एकांत साधना केली.

बहु एकांतावरी प्रीती
जया जनपदावरी खंती
जाण मनुष्यकारे मूर्ती
ज्ञानाची तो
(श्रीज्ञानेश्वरी १३.६१३)

एकांत आणि लोकांत दोन्हीही प्रांती हा, ताईंना साधनेत विक्षेप वाटत नाही हे विशेष आहे.
ताईंचे पिताश्री कै बापूसाहेब भिशीकर एक सव्यसाची, ध्येयवादी पत्रकार होते,तो ज्ञान वारसा ताई त्यांच्या विधायक, शैक्षणिक आणि आध्यात्मिक कार्यातून सांभाळत आहेत.
अनेक अडथळे यशस्वीपणे पार करीत कै आण्णा आणि लताताईंनी संस्कार, शिस्त, राष्ट्रप्रेम तसेच व्यक्तिगत आणि सामाजिक उन्नती साधण्याचे बीज समाजात,पुढील पिढीत रोवले आहे,विकसित केले आहे हाच प्रवास त्यांचे शतायुषपर्यंत सुकरपणे सहजपणे प्रवाहित राहावा,ती शक्ती आरोग्य त्यांना विधात्याने प्रदान करावे हीच मनोमन प्रार्थना!
आणि मी तू हे भाष नेणे । माझे कांहीचि न म्हणे ।
सुखदुःख जाणणे । नाही जया ॥ (श्रीज्ञानेश्वरी १२.१४९)
"अद्वेष्टा सर्वभूतानां" ह्या श्लोकावर श्रीमाउलींनी केलेल्या वर्णनाशी साधर्मता असणाऱ्या लताताईंच्या उत्तुंग जीवन शिखराच्या पायथ्याशी अर्पिलेले हे भावश्रद्धायुक्त दंडवत!
**संजीव प्र कुसूरकर,पुणे**
************************************************************************

आदरणीय लताताई

शारदचंद्राची शीतलता
प्रभातीची प्रसन्नता
संध्याकाळची सौम्यता
संवादातून स्रवते..
परमवसा परंपरेचा
सद्भाव संतांचा
जागर जागृतीचा
उत्कटतेने उमटे..
सत्त्वता साधनेची
अनुभूती अध्यात्माची
स्वर्णता 'स्व'रूपाची
प्रबोधनातून प्रकटे..
त्या लताताईंना,
सत्तरीनिमित्त
सविनय समर्पित
भावफुलांनी भरली
ओंजळ ही!
हार्दिक अभीष्टचिंतन !
**-- सौ.सीमा**
**पुरुषोत्तम नगरकर**
************************************************************************

चंद्रकुसुमेच्या अंगणी उमलले स्वर्णलता हे पुष्प
प्रतिभासंपन्न गुणी कन्येचे मायपित्याला अप्रूप
ज्ञानप्रबोधिनीच्या प्रांगणात बहरली ही लतिका
अप्पा अण्णांच्या सत्संगतीने घडली ही राष्ट्र सेविका
देशभक्तीच्या प्रेमाने अन्याय विरोधी लढे आंदोलने
कधी बनतसे रणरागिणी, तर कधी आवेशयुक्त भाषणे
सद्ग्रंथ अभ्यास, सत्संगती, सद्गुरूंचा कृपाशीष माथा
तपस्या होई सुफलीत, आध्यात्मिक प्रसाद मिळता
तन मन झिजवोनी उभारली प्रबोधिनी सोलापुरी
कर्तृत्व अहंकार न शिवे, यशाच्या उत्तुंग शिखरी
सुमधुर भाषणे मने जिंकुनी, केली ज्ञानेश्वरी दासबोध प्रबोधने
बहरली अनेक जीवने, केवळ तुमच्या केवळ तुमच्या अस्तित्वाने
सद्भाग्य आमुचे, सहवास मिळे या अमृत जीवनाचा
देव देश भक्तीचा सुरेख संगम बघण्या तो साचा
होऊनि कुणाची भगिनी, कुणाची सखी, कुणाची माता
दुःख विरुनी जाते क्षणात, पाठीवर आश्वासक हात फिरता
धन्य जाहलो आम्ही, लाभे आम्हा तपस्विनीचा आदर्श
फुलून जाई आमुचे जीवन, होता तो दिव्य संस्पर्श
गुरूने दिला ज्ञानरुपी वसा, अंतरी उमटे हाच ठसा
प्रार्थना आम्हा द्यावी शक्ती, चालविण्या पुढे हा वसा
अर्पूनी माझी भावसुमने, वंदन करी सद्गुरू ताईंना
शतवर्षे निरामय आयु लाभो ही सद्गुरू चरणी प्रार्थना
**वासंती देशपांडे** पुणे
*************************************************************************

आ लताताईना
जीवेत शरद शतम । वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा
**प्रेमा जोशी**
*************************************************************************

लताताई म्हटल कि एक आदरणीय, शांत व्यक्तिमत्त्व डोळयासमोर येते. त्या प्रवचन खूप छान द्यायच्या. मला त्यांची एक आठवण चांगली लक्षात आहे. उपासनेच्या वेळेस त्यांना एकदा सहज म्हटल तुम्ही एकदा सर्वेपि सुखीनः सन्तु या श्लोकाचा अर्थ सांगा. लगेच दुसर्या दिवशी त्यांनी त्या श्लोकाचा सुंदर अर्थ सांगितला. मला ते खूप आवडल ही आठवण मी कधीही विसरणार नाही. नितान्त आदर वाटणार्या लताताईंना वाढदिवसाच्या आरोग्यदायी शुभेच्छा.
**सौ. वैशाली देगांवकर**
*************************************************************************

**स्फटिक गृहिंचे डोलत।दिप जैसे।।__**

म्हणोनि सद्भाव जीवगत। बाहेरि दिसती फांकत।

स्फटिक गृहिंचे डोलत। दिप जैसे।।

परमहंस सद्गुरु स्वामी माधवनाथ महाराजांनी सद्शिष्या डॉ.स्वर्णलताताई भिशीकर यांच्यासाठी ही ओवी तर निवडली असेल असं वाटत...... कारण ताईंचे कार्य असेच स्फटिका सारखे स्वच्छ असुन त्यांचे जीवन अखंड तेवत्या दिपज्योती प्रमाणे आहे, सहवासात येणाऱ्या प्रत्येकाला उजळून टाकणार आदर्श असं मार्गदर्शक आहे!

जयाचि आज्ञा आपण।शिरी वाहे अंतःकरण। मनुष्याकारे जाण।ज्ञानचि ते।।

अशा सर्व गुण संपन्ना लताताईंचा सहवास प्रेरणा आणि प्रेमाने भरुन आहे.ताईंच्या प्रार्थनेच्या भरिव शब्दांनी चैतन्याने भारीत झालेल्या ध्यान केंद्रातील ध्यान अविस्मरणीय अनुभूती देणारे असते! सर्व सांप्रदायाचे, सर्व संतांचे अंतरंग मधमाशी प्रमाणे टिपुन, आपल्या प्रवचनातून श्रोत्यांना त्याचे मधुपान देणारी ताईंची सुमधुर प्रवचने विचारांना व त्या प्रमाणे आचरणाला महत्व देणारी आहेत!

ज्ञानप्रबोधिनीच्या कार्यवाहक, समाजसेविका, अत्याधुनिक व्यवस्थापक,अध्यापक,मानसशास्त्रज्ञ,तत्वज्ञ, लेखिका, कवयित्री असे सर्व असामान्य, अद्वितीय कार्य करणाऱ्या या स्वर्णदुर्गेचं दर्शन अद्भुत आहेच पण सद्गुरु चरणी येताच एक साधक शिष्येचे विनम्र,निरहंकारी रुप केवळ वंदनियच आहे!

स्वर्णलताताई आणि सरलताई बाबर यांच्या अलौकिक मैत्रिचे स्नेह तुषार आम्हा बारामतीकरांना अनेकदा अनुभवता आले.अनेक विशेष कार्यक्रम,सोहळे लताताईंच्या उपस्थितीतच साजरे होतात!ताईंचे मार्गदर्शन हे केंद्राचा आधार आहे.त्यामुळेच संस्थेचे कार्य, इतर सर्व कार्यक्रम किंवा तब्बेत या सर्वांवर मात करून लताताई बारामती केंद्राला प्रेरणा देण्यासाठी,उभारी देण्यासाठी आवर्जून येतात, त्यांच्या,'प्रेमाला उपमा नाही हे तो देवा घरचे देणे!!

लताताईंचा सहवास व प्रेम लाभण्याचे सद्भाग्य सरलताईंच्यामुळे मिळाले.सोलापूर -हराळी येथे अध्यात्मिक शिबिराचे निमित्ताने आनंद यात्राकाळात लताताईचे संस्थेचे कार्य, अपार कष्ट पाहून आम्ही बारामतीचे साधक आश्चर्याने थक्क होऊन जातो, नतमस्तक होतो!

सामर्थ्य आहे चळवळीचे।जो जो करिल तयांचे।

परंतु तेथ भगवंताचे। अधिष्ठान पाहिजे।।

या समर्थांच्या आज्ञेनुसार कार्य करणाऱ्या लताताईंना शतशः प्रणाम.

ताईंना संस्थेचे, समाजसेवेचे कार्य करण्यासाठी तसेच श्री स्वामीजींच्या अधिकारी मार्गदर्शक जेष्ठ साधिका म्हणून अध्यात्मिक कार्य करण्यासाठी उत्तम आरोग्य व शतायुष्य लाभावे हीच श्री स्वामी चरणी प्रार्थना!!!

स्वामी माधवनाथ महाराजांच्या सद्शिष्या

स्वर्णलताताई-सरलताईंनी घेऊनी वसा

सोलापूर-बारामतीकर साधकांना दिला ठेवा!

ध्यान-प्रवचन-अध्यात्म आनंदाचा!!

श्री सिद्धेश्वरांच्या चरणी हीच प्रार्थना!

लाभो आयुरारोग्य प्रिय लताताईंना!!

**_बारामती ध्यान केंद्रातील सर्व साधक,**

**शब्दांकन-गौरी पाटील.**

****************************************************************************

निश्चयाचा महामेरु |
आम्हा सकल साधिकांसी आधारु ||
परमआदरणीया डॉ. स्वर्णलताताईंना ७०व्या जन्मदिनास्तव मनःपूर्वक शुभेच्छा.
**सर्व साधक**
**परमहंस सद्गुरु श्री स्वामी माधवनाथजी महाराज ध्यानमंदीर बारामती.**
*************************************************************************

मा.लताताईंना नमस्कार,
आपल्या ७०व्या वाढदिवसानिमित्त गुरूकृपा साधना केन्द्रातील सर्व भगिनींतर्फे हार्दिक शुभेच्छा.
पू.सुषमाताईंच्या पश्चात केन्द्राच्या सर्व कार्यक्रमात आपण आवर्जून सहभागी होता आणि आम्हाला मार्गदर्शन करता त्यामुळे आमचा उत्साह वाढतो. सद्ध्याच्या कोरोना काळातही आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून तुम्ही आम्हाला भेटत असता.
तुम्ही हराळीला घेतलेल्या शिबिरांमुळे आमच्या सर्व भगिनींना अध्यात्मिक ग्रंथाची गोडी लागली. अमृतानुभव, योगतारावली, वाल्मिकी रामायण ,भागवत कथा इत्यादी ग्रंथ आम्ही तुमच्या समवेत अभ्यासले. त्याच बरोबर ध्यान नामाचीही गोडी वाढली.
पूजनीय अण्णासाहेब ताम्हणकरांचाही तेथेच परीचय झाला.
असेच प्रेम आमच्यावर ठेवावे ही इच्छा. तुम्हाला आरोग्यसंपन्न दीर्घ आयुष्य लाभावे ही स्वामी चरणी प्रार्थना.
आपल्या,
**गुरूकृपा साधना केन्द्र,**
**भगिनी वर्ग, सदाशिव पेठ, पुणे.**
*************************************************************************

**मायेची माऊली तीच आमची सावली**

माझी माय श्रीमती प्रमिला शेटे यांची मी कन्या.१९९१ च्या दरम्यान माझ्या आईचा आणि आदरणीय लताताईंचा म्हणजे डॉक्टर स्वर्णलता भिशीकर यांचा सत्संगाच्या माध्यमातून परिचय झाला.परिचयाचे रुपांतर कालांतराने प्रेमाच्या दृढ़ नात्यात परिवर्तित झाले.इतके की, माझी माय लताताईंना तिची माऊली असे म्हणायला आणि समजायला लागली.आपल्या पिल्लांना आधार देत ,वळण लावत,संस्कार आणि शिक्षण देऊन सक्षम बनवत ,शेवटी त्यांना त्यांच्या त्यांच्या जोडीदारांच्या स्वाधीन करत माझी आई नुकतीच एकेका जबाबदारीतून मुक्त झाली होती.कळत न कळत कोळ्याचं जाळं विणण्याचीच ही प्रक्रिया! अशा माझ्या या आईलाच लताताईंच्या रूपाने माऊलीचा आधार मिळाला.कालांतराने मग आमच्या संपूर्ण शेटे कुटुंबाशी लताताईंचे जिव्हाळयाचे ,प्रेमाचे नाते जडले .पूर्ण कुटुंबाच्याच मग त्या मार्गदर्शक माऊली झाल्या.प्रबोधनाचे ज्ञानामृत पाजून आम्हाला त्यांनी कृतार्थ केले.त्यांच्या प्रवचने आणि व्याख्यानांमधून त्यांच्या मुखातून साक्षात सरस्वतीच प्रकट होत असल्याचा भास मला अनेक वेळा झाला आहे. प्रसन्न,हसऱ्या चेहऱ्याने सर्वांचे स्वागत करण्याचा त्यांचा स्वभाव मला अतिशय मोहून टाकतो. वेगवेगळया विषयांचा त्यांचा प्रचंड व्यासंग पाहून तर थक्क व्हायला होतं. मितभाषी,दयाळू, नि:स्वार्थ प्रेरणेने अखंड काम करीत राहाणं ही सोपी गोष्ट खचितच नव्हे.अध्यात्म, शिक्षण, मानसशास्त्र अशा अनेक विषयांवर लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांना लताताई लीलया मार्गदर्शन करतात. प्रकल्प-उपक्रमांना- शाळांना भेटी देणे,स्त्रियांना जागृत आणि सक्षम बनवणे ,स्वतःच्या पायांवर उभे करून स्वावलंबी

बनवणे, स्त्रियांना त्यांच्या छोट्या-मोठ्या प्रश्नांमध्ये नेहमीच आणि मनःपूर्वक मदत करणे ही ताईंची गुण वैशिष्ट्ये मला फार भावतात. प्रत्येक व्यक्तीतील चांगले गुण ओळखून त्यांना त्या योग्य कामांमध्ये गुंतवण्याचे कौशल्य लतातांईकडे आहे.सर्वांच्या अडचणी सोडवणे, सगळ्यांना समजावून सांगणे या त्यांच्या गुणांमुळे ताई फक्त माझ्याच आहेत असे प्रत्येकालाच वाटते.

सगळ्यांशी असा प्रेमाचा,सुसंवादाचा पूल बांधत बांधत लताताईंच्या वयाची सत्तरी कधी पूर्ण झाली हे आम्हाला समजलेदेखील नाही.परमेश्वराच्या अगाध लीलेचे प्रत्यंतर आम्ही शेटे कुटुंबीयानी लताताईंच्या इतक्या वर्षांच्या प्रेमळ सहवासात वारंवार घेतले आहे.त्यामुळेच माझी माय त्यांना माउली म्हणते.....आणि मी मायेची माउली तीच आमुची साउली असे म्हणते.

ती.लताताईंना शंभर वर्षांचे निरामय दीर्घायुष्य लाभो.आम्हाला त्यांच्याकडून ज्ञानाचे कण असेच आयुष्यभर वेचता येत राहोत हीच परमेश्वराकडे प्रार्थना आणि अंत:करणपूर्वक सदिच्छा!

**सौ.सुमित्रा शेटे - महाजन**

**********************************************************************

**साधकांचे मायबाप**

पूज्य डॉक्टर लताताईंना साधकांचे मायबाप हे नाव व शीर्षक देणे उचित ठरेल तसेच त्यांच्या व्यक्तिमत्वाला साजेसे आहे असे मला वाटते.

मितभाषी, प्रखर आध्यात्मिक अभ्यास व बैठक, साध्या आणि सोप्या भाषेतून प्रवचन सादर करण्याची शैली त्यांचे मध्ये सामावलेली आहे. रोजची उपासना त्या नियमित करत. आम्ही त्यांचे संपर्कात ज्ञानप्रबोधिनी प्रशाला, सोलापूर या माध्यमातून आलो. माझे घर डफरीन चौकाजवळ असल्याने, मी व सौ सविता उपासनेच्या निमित्ताने ज्ञानप्रबोधिनीशी जोडलो गेलो. अशा साधकांची जवळीक करायला कोणाला आवडणार नाही?

आज त्यांच्या वयाला ७0 वर्षे पूर्ण होत असताना त्यांना उदंड आयुष्य लाभावे हीच गुरु चरणी प्रार्थना करतो.

ज्ञानप्रबोधिनी चा सहवास आम्हाला घडला तो काळ होता साधारण १९९३ ते २००२ पर्यंतचा. रोज नित्यनेमाने सकाळी सव्वासहा वाजता उपासना, थोडा वेळ ध्यान आणि नंतर संतांच्या गोष्टीतून एका अनुच्छेदाचे वाचन स्वतः लताताई करायच्या. मनःपूर्वक ऐकून उपासना संपत असे. मी त्यावेळी नियमाने फुल देऊन नमस्कार करत असे. बऱ्याच वेळा मधाची बाटली ही त्यांना सुपूर्त करत असे (खेड्यातून मध गोळा करण्याच्या माझाभावाला छंद होता).

लताताईंचा परिचय सर्वांना आहेच, त्या साध्वी आहेतच. त्यांची आध्यात्मिक बैठक, ध्यानधारणा मधली अवस्था, अध्यात्मावर विवेचन व रसग्रहण, श्रोत्यांना सोप्या भाषेत सांगून मंत्रमुग्ध करणे त्याच करू शकतात. माझी बहीण पुणे विद्यापीठात एम ए सायकॉलॉजी हा विषय घेऊन शिकताना दोघीही विद्यापीठात मैत्रीणी म्हणून राहिल्याचे व वर्गात एकत्र शिकल्याची आठवण मला बहिणीनि सांगितली.

मध्यन्तरी सोलापूर नंतर मी पुणे येथे अठरा वर्षे वास्तव्यास असल्याने त्यांची भेट बराच काळ होऊ शकली नाही, त्यामुळे आता लताताई आपल्याला कदाचित ओळखत असतील का अशी शंका येते. पूज्यनीय गायत्री ताईंच्या निरोपामुळे काहीतरी लिहून मागील आठवणींना उजाळा दिला येवढेच.

पुन्हा एकदा लताताईंना वाढदिवसानिम्मित अभिवादन करतो :

जीवेत शरद: शतम...

**डॉ जयवंत बाळकृष्ण घाटे** दूरभाष क्रमांक - ९४०३३५९५०१

**********************************************************************

वं. लताताई, आमच्या सर्वांकडून वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा
आपल्या हरळीच्या भेटीमधील मार्गदर्शनानंतर आमच्या विचारांना वेगळे वळण लागले. आमच्या प्रतिकूल परिस्थितीत आपण धीर दिलात. आपले मार्गदर्शन असेच आम्हाला आणि इतरांना सदैव मिळत राहो. जीवेत् शरदः शतम्
**रोहिणी व चंद्रशेखर मोघे**
****************************************************************************

प.पू. ताईंना सादर प्रणाम.आपल्या बद्दल असलेल्या माझ्या भावनांना शब्दरूप देण्याचा हा प्रयत्न!
"स्वर्णलता" हे नांव ठेवतांना बाळाचे पाय पाळण्यात दिसतात ही म्हण आपल्या मातापित्यांनी सार्थ करून दाखवली असे वाटते. आपण सुवर्णा प्रमाणे तेजस्वी असून लता म्हणजे वेली प्रमाणे मृदू आहात.सोन्याचा आणखी एक गुण म्हणजे तन्यता--सोन्याला किती घाव घातले तरी ते तुटत नाही त्याचा मृदू मुलायम वर्ख होतो.आपण कोणत्याही बिकट प्रसंगी धीरोदात्तपणे , शांतपणे परिस्थिती हताळता. हे करीत असताना आपल्या मृदू व कोमल स्वभावाचा प्रत्यय येतो.
आपल्याला  नवदुर्गा हा पुरस्कार देण्यात आला. इतरही अनेक पुरस्कार प्रदान करण्यात आले.यथायोग्य व्यक्तीला हे पुरस्कार देण्यात आल्याचा देणार्यांना सार्थ अभिमान वाटला असेल.
हराळी गावात आपण साधकांना ध्यान,नाम जप करण्यासाठी खोल्या दिल्या आहेत.त्यामुळे निरव व शांत वातावरणात प्रसन्न चित्ताने ध्यान धारणा करता येते. वयोवृद्ध साधकांच्या सोयीसाठी रुग्णवाहिका व वैद्यकीय मदतीची सोय आपण दूरदृष्टीने करून ठेवली आहे.
आपण दैनंदिन कार्यक्रमात ध्यान धारणा ,नामजप,आध्यात्मावर प्रवचने ठेवल्याने साधकांचा वेळ आनंदात जात असेल ह्यात शंका नाही.
तेथील सर्व व्यवस्थापन आपण शांतपणे कोणासही जाणवू न देता करता व त्यात अभिमानाचा लवलेशही नसतो .
आपण आपल्या संयत वागण्यातून आमच्या सर्वांसमोर एक आदर्श ठेवला आहे.दासगणु महाराज यांच्या गजानन विजय ग्रंथामध्ये उल्लेख आहे त्या प्रमाणे आपण " गुरू असावा महाज्ञानी-चातुर्य शास्त्र चिंतामणी"ह्या उक्तीला सार्थ ठरविता.
"जीवेत शरद:शतम्"
ॐ तत् संत।
**धनश्री ओक** पुणे.+91 83697 22427
****************************************************************************

**...ज्योतीने तेजाची आरती!**
आपल्या आयुष्यात आपल्याला अनेक व्यक्ती भेटतात, त्यातली काही मोजकीच मंडळी मनात घर करुन राहतात कारण त्या केवळ व्यक्ती नसतात, तर व्यक्तिमत्वं असतात.
आदरणीय लताताई (डाॅ. स्वर्णलताताई भिशीकर) या त्यांपैकीच एक. लताताई म्हणजे एक अतिशय सात्त्विक व्यक्तिमत्व. ज्ञानाचं, अध्यात्मिक विचारांचं, संन्यस्त जीवनपद्धतीचं, व्रतस्थ देशसेवेचं अलौकिक तेज त्यांच्या चेहऱ्यावर सतत दिसून येतं. त्यांची अभ्यासपूर्ण व्याख्यानं ऐकणं, त्यांना भेटणं, त्यांच्याशी बोलणं ही मनाला शांततेची विलक्षण अनुभूती देणारी संधी असते. मृदु आवाजात, मोजक्या आणि नेमक्या अभ्यासपूर्ण शब्दांत

संवाद करण्याच्या शैलीने प्रत्येकजण प्रभावित होऊन जातो. आम्ही जेव्हा कधी त्यांना भेटलो आहे तेव्हा प्रत्येक वेळी त्यांच्या वाणीतला गोडवा लाभलेला सरस्वतीचा प्रसाद मिठाईच्या रुपात आमच्या तळहातावर आलेला आहे.
संस्कारक्षम पिढी आणि समाज घडविण्यासाठी ठिकठिकाणी ज्ञान प्रबोधिनीच्या माध्यमातून सातत्याने प्रयत्न केले जात आहेत, त्यात आदरणीय लताताईंचं योगदान मोठं आहे.
आज आदरणीय लताताई आपल्या आयुष्याची सात दशकं ओलांडून पुढे जात आहेत. त्यांना निरोगी आणि उदंड आयुष्य लाभो अशी परमपिता परमात्म्यास प्रार्थना. त्यांचा स्नेह, त्यांचे आशीर्वाद आम्हाला भविष्यात असेच मिळत राहोत हीच सदिच्छा!
**- मिलिंद अरुण गोरटे, सोलापूर**

milindgorte@gmail.com
9422370260

************************************************************************

पूजनीय डॉक्टर स्वर्णलताताई भिशीकर यांना सत्तराव्या वाढदिवसानिमित्त साष्टांग दंडवत, अनेकोत्तम शुभेच्छा आणि अभिष्टचिंतन. आदरणीय ताईंनी आजवर आपल्याला भरभरून प्रेम, सौहार्द व आधार दिला आहे. विशाल अंत:करणाने आणि मुक्तहस्ताने प्रचीतीयुक्त ज्ञानदान केलं आहे. साधकवर्गावर त्यांनी केलेले उपकार फेडता न येणारे आहेत. त्यांच्या ऋणात आजन्म राहून त्यांनी शिकवलेल्या उपासनामार्गाचे आचरण करण्यातच धन्यता आहे. सर्वशक्तिमान परमेश्वर त्यांना निरामय, सुदृढ दीर्घायुष्य प्रदान करो ही त्याच्या चरणी विनम्र प्रार्थना.

डॉ. हिमांशू वझे

************************************************************************

**माझी प्रेमळ सखी**

मी सोलापुरात रहाते ही गोष्ट माझ्यासाठी खूप भाग्याची ठरली. आयुष्य समृद्ध करणारे अनेक सुरुद्ध मला इथे भेटले . इथेच लताताई भेटल्या . एके सकाळी मी नेहमी प्रमाणे फीरायला चालले होते समोरून लताताई येत होत्या ओळख न्हवती पण छान हसल्या आणि तक्षणी दोस्ती झाली मन जुळली .त्या मला म्हणाल्या नमस्कार मी स्वर्णलता सोलापुरात नवीनच आलीय .तुम्ही सोलापुरातील माझी पहिली मैत्रीण .केवढं माझं भाग्य केवढं तो सन्माम मला सहज ताईंनी दिला.

लताताईंच्या खूप आठवणी मनात आहेत .माझी छोटुकली ऐश्वर्या नुकतीच बालवर्गत जात होती, पण तिला वर्गात बसायला नाही आवडायचं, ती आपली आवारात बूचाची फुल गोळा करत थांबायची . थोडी मोठी झाली की लताताईना म्हणाली मला बुचाच्या फुलाचे दागिने तुम्हाला करून घालायचेत आहेत . आणि गळ्यातल कानातल बांगड्या कम्बरपट्टा बिंदी सार केलं लताताईंनीपण ते सार शांतपणे घालून घेतलं . तीन दिवाळीचा केलेला इवला इवला फराळ पण त्या खूप मनापासून खात. आम्ही अनेकदा फिरायला जाताना भेटयचो, तेव्हा अनेक विषयांवरती आमचा मुक्त संवाद होत असे .सभोवतालची अनेक माणस चुकीचं वागताना दिसायची पण त्या बद्दल त्यांना कोणाला रागावतानाकिंवा त्यावरती साधं प्रतिकूल मत व्यक्त केलेले मी कधीही पाहिलं नाही . हाताखालच्या लोकांना एखादी सूचना कळली नाही तर कळेपर्यंत शांत चित्ताने समजावून सांगायच्या . अत्यंत शिस्त प्रिय . ज्या वेळी ज्या गोष्टी झाल्या पाहीजे त्या वेळी त्या त्या गोष्टी झाल्यापाहिजेत हया वरती त्यांचा कटाक्ष असे . शाळेचे अभ्यासक्रम वगैरे तर त्या उत्तम पार पाडतचं पण आपल्या शाळेतून बाहेर पडणार प्रत्येक मुल आधी एक चांगला माणूस व्हायला हवे या साठी त्यांची सारी धडपड असे.

आजारी पडल्याचं कळलं की सकाळीच घरी भेटायला यायच्या . अहो तुम्ही एकट्या रहाता तुमचं माहेरपण कोण करणार चला म्हणून हाराळीला रहायला 8 दिवस घेऊन गेल्या.

त्यांची दृष्टी खूप विशाल आणि प्रयोगशील होती त्यामुळे शाळेची आणि हाराळीच्या प्रोजेक्तची विविधांगाने खूप प्रगती झाली .शेती, फळांचे मळे ,लोणची, मुराब्बे , मुल मुलींची हॉस्टेलस, शाळा सार त्या उजाड माळराना वरती वसलं आणि पुढ त्याच रूपांतर नन्दनवनात झालय.

अश्या या माझ्या गुणी मैत्रिणीला भरपूर आयुरारोग्य शांतता समाधान आनन्द लाभो हीच मनापासून प्रार्थना.

**नीला मोरे**

******************************************************************************

**समई**

मी लता ताईंना प्रथम पाहिलं ते पुणे विद्यापीठात. मी 1975 ते 77 मानसशास्त्रात एम. ए. करीत असताना लताताई मानसशास्त्रात पीएचडी करीत होत्या त्यावेळी. युनिव्हर्सिटीच्या होस्टेलमध्ये राहत असताना आम्ही पोस्ट ग्रॅज्युएशन करणाऱ्या मुली एका बिल्डींगमध्ये राहत असू आणि पीएचडी करणाऱ्या मुलींना स्वतंत्र रूम असत असे. लताताई त्यावेळी पीएचडी साठींच्या एका रूम मध्ये राहायच्या. त्यामुळे आमचा फारसा संपर्क येत नसे. पण त्यांच्या शांत व्यक्तिमत्वाचा ठसा त्यावेळीही मनावर उमटला होता.

त्यानंतर ज्यावेळी त्यांनी सोलापूरला येऊन ज्ञानप्रबोधनीची धुरा स्वतःच्या खांद्यावर घेतली, तेव्हापासून ज्ञान प्रबोधिनी मधल्या काही कार्यक्रमांमधून त्यांची भेट व्हायला लागली. कोणत्याही कार्यक्रमाचं त्यांचं नेमकं, आखीवरेखीव नियोजन, वेळेचा काटेकोरपणा, शिस्त या गोष्टी सहज नजरेत येत गेल्या. स्वतःच्या तत्त्वांसाठी ची त्यांची निष्ठा आणि झोकून देऊन काम करण्याचं त्यांनी घेतलेलं असिधाराव्रत ठायी ठायी निदर्शनास येत गेलं.

त्यांच्याबरोबर नैनीतालला जाणं, अरबिंदो आश्रमात राहणं हा एक वेगळाच अनुभव होता. पहाटे पाच वाजता उठून सर्वांनी एकत्र येणं, वेगवेगळ्या विषयांवरचं विवेचन आणि ध्यान या गोष्टींनी ते संपूर्ण वातावरणच भारून गेल्यासारखं होत असे. त्या काळात मी स्वतः आध्यात्मिक गोष्टींच्या जास्त जवळ गेले.

'लताताई अध्यात्मिकता अक्षरशः जगतात' हे पुन्हा एकदा एका कार्यक्रमामधून माझ्या निदर्शनास आलं. आमच्या 'राज्य मानसशास्त्रज्ञ संघटने'च्या एका कार्यक्रमात त्यांना वक्ता म्हणून बोलावलं असताना त्यांनी 'भूमी ते आकाश' या विषयावर शारीरिक पातळीवरून अध्यात्मिक पातळीवरचा प्रवास कसा असावा याबद्दलचं, मास्लोच्या थिअरी द्वारे, सुंदर विवेचन केलं होतं. त्यावेळी त्यांनी दिलेल्या उदाहरणांमधून हे लक्षात येत होतं.

काही वर्षांपूर्वी आमच्या 'सुसंवाद मंच' मध्ये त्यांनी रीडिंग स्किल्सवर ज्या टिप्पणी दिल्या होत्या त्या खूपच उपयुक्त होत्या. त्यापैकी काही मी स्वतः वापरून अनुभव घेतला आहे.

मौनव्रत (खऱ्या अर्थानं) ही माणसाला तशी अवघडच गोष्ट. विपश्यनेद्वारे मी याचा अनुभव घेतला आहे. पण लता ताईंनी या व्रताची खूप साधना केली आहे. या साधनेमुळे त्यांच्या चेहऱ्यावर नेहमीच एक प्रकारचं तेज दिसून येतं. त्यामुळे 'देवघरात तेवणारी समई, जी शांतपणे तेवत असते आणि जगाला प्रकाश देत असते' तसं मला त्यांचं रूप वाटतं.

हा प्रकाश प्रखर नसतो, डोळे दिपवणारा नसतो पण मनाला शांती देणारा असतो. लताताईंच्या मुळे अनेकांना या मन:शांतीचा लाभ झाला आहे. त्यांच्या रूपाने समाजाला मिळालेली ही देणगी समईच्या रूपाने सतत अशीच तेवत राहो आणि लता ताईंना त्यासाठी आयुरारोग्य मिळो ही सदिच्छा.

**- अलका काकडे,** सोलापूर

*******************************************************************************

आदरणीय लताताई , नमस्कार .

लताताई तुमच्या व्यक्तिमत्वाचा व कर्तृत्वाचा एक छोटा भाग मी ओळखते पण देवगड हापूसची एक फोड चाखली तरी आपण त्याच्या गोडीची व अस्सल्पणाची कल्पना करू शकतो . तुमच्या लहानपणीच्या संस्काराचे फळ की तुम्ही एवढे मोठे काम करू शकला .

तुमचा सर्वात जास्त सहवास मला नैनीताल ट्रीप मध्ये मिळाला . त्या ट्रीपला यायचे भाग्य आम्हाला मिळाले . त्यावेळी 'सदगुणांची सभा' ही गोष्ट सर्वांना सांगीतली होती त्यातील कृतज्ञता या सदगुणांच . महत्व मनाला खूप भावले . आयुष्यात ही एक मोठी देणगी तुम्ही मला दिलीत . अशा गोष्टी तुम्हीच सांगू जाणे . समाजात असे आदर्श असणे आवशयक आहे ज्यांच्याकडे बघून सामान्य जनमानसाला प्रेरणा मिळेल .

तुमचा धीरगंभीर स्वभाव, तुमचा वक्तशीरपणा, तुमची संस्थे बद्लची आत्मीयता, एखद्या कार्यक्रमाच्या वेळी धावपळ व जबाबदारी ची जाणीव व इतर अनेक गोष्टी . तुमची जास्त आवडलेली गोष्ट म्हणजे तुमचे हळूवार बोलण . त्यातून तुमची संवेदनशीलता ,आदर ,प्रेम, अगत्य सर्व पोहच ते .

७० व्या वाडदिवसा निमीत तुम्हाला खूप खूप शुभेच्छा . तुमचे आरोग्य तुम्हाला नेहमी साथ देवो ही सदिच्छा .

तुमची चाहती

**सौ चंदा पाटील .**

*******************************************************************************

डॉक्टर स्वर्णलता भिशीकर.... हे नाव उच्चारलं की सगळ्यात पहिल्यांदा डोळ्यासमोर येतो तो त्यांचा ठसठशीत लाल कुंकू असलेला गोरापान चेहरा आणि अतिशय मंद स्मितहास्य! त्याहूनही अधिक भावतं ते त्यांचं स्निग्ध स्वरातलं आणि मनापासून च बोलणं!

त्यांच्या बद्दल खूप काही वाचलं होतं, पण मी जेव्हा सोलापूरच्या संगमेश्वर कॉलेजमध्ये मानसशास्त्राचा पदव्युत्तर अभ्यास करायला लागले, त्यावेळी आमच्या हेड ऑफ द डिपार्टमेंट असलेल्या प्राध्यापक जनई सरांनी सांगितलं की ह्या वर्षी एक पेपर तुम्हाला डॉक्टर स्वर्णलता भिशीकर या शिकवणार आहेत, त्यावेळी खूपच आनंद झाला.या क्षेत्रात गाजलेल्या आणि स्वतःच्या संशोधनामुळे सुपरिचित असलेल्या अधिकारी व्यक्तीकडून खूप काही शिकायला मिळेल आणि त्यांचा सहवास मिळेल असा हा दुहेरी आनंद होता.

त्यानंतर ज्ञान प्रबोधिनी सोलापूर, या संस्थेत काम करायची संधी मिळाली आणि त्यांच्याबरोबर एक वर्ष त्यांची स्वीय सहाय्यक म्हणून मी काम केलं. या वर्षभरात मी अनेक गोष्टी त्यांच्याकडून शिकले. काटेकोरपणाने वेळ पाळणे, आपल्याला प्रकृतीच्या कितीही तक्रारी असतील तरी कामांमध्ये असताना त्यांच्याकडे दुर्लक्ष करणं, याच बरोबर आपण जो पूर्ण करू शकू असाच शब्द देणं, पंचतारांकित हॉटेल असो किंवा एखादी झोपडपट्टी असो या दोन्ही ठिकाणी सारख्या सहजतेनं वावरणंही मी त्यांच्याकडून शिकले.

अतिशय ओघवत्या भाषेत सूत्रसंचालन करणे म्हणजे तर लताताईंच्या डाव्या हातचा मळ आहे. कधी कधी तर मुख्य पाहुण्यांपेक्षा त्यांचं सूत्रसंचालन जास्त सरस ठरतं!!

त्यांच्या अध्यात्मिक अभ्यासाबद्दल बोलण्या इतका माझा अभ्यास नाही पण विमलाजी ठकार यांच्या पुस्तकांचे त्यांनी जे अनुवाद केले आहेत ते मात्र अतिशय सुंदर आहेत यात कुठलीही शंका नाही. ज्ञानप्रबोधिनीच्या वार्षिक अंकांमध्ये त्यांचं लिखाण आणि त्यांना दिलेले मथळे अतिशय चपखल असतात.

आज पर्यंत लता ताईंना अनेक सन्मान पुरस्कार प्राप्त झाले आहेत, पण कुठल्याही पुरस्कारापेक्षा डॉक्टर स्वर्णलता भिशीकर हे नाव जास्त मोठे आहे असं मला नेहमीच वाटतं.

त्यांना वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा आणि आरोग्यपूर्ण आयुष्य त्यांना लाभावं ही ईश्वराकडे प्रार्थना!

**मंजुषा गाडगीळ.**

सोलापूर

*************************************************************************

अत्यंत तेजःपुंज प्रसन्न मुद्रा, सौम्य वाणी आणि मधुर परंतु शिस्तबद्ध व्यवहार असलेल्या आदरणीय व प्रिय लताताईंना वयाच्या एक्काहत्तराव्या वर्षारंभी मनःपूर्वक शुभकामना..!

ताईंची पहिली भेट सोलापुरातील ज्ञानप्रबोधिनी मधे १९९६ च्या सुमारास घडून आली, युद्धकला प्रशिक्षणाच्या निमित्तानं..! लता ताईंचा संयमित अन् सौम्य आवाज हृदयात तेव्हापासूनच कोरला गेलाय. तद्नंतर काही काळ युद्धकला, योगविद्या, प्राचीन भारतीय साहित्य, संस्कार कार्य इत्यादि निमित्तानं आमचा संपर्क सुरू राहिला. पूज्य गोविंददेव गिरि जी (आचार्य किशोरजी व्यास) स्थापित गीता परिवार द्वारा संचलित संस्कारकार्यानिमित्त ताईंसोबत युवा अवस्थेत संगमनेर ला प्रवास अन् सात दिवस निवास करण्याची संधी लाभली. त्या दरम्यान प्रकृति ठीक नसतानाही केवळ वचनबद्धतेपोटी स्वीकृत कार्य कसे निभवता येते, याचे प्रत्यक्ष दर्शन घडले.

ताईंचे समयपालन अदभुत, पण त्याचा त्यांनी इतरांसाठी बाऊ केल्याचे कधी जाणवले नाही. सोलापुरातील पार्क स्टेडियम मधे एका भव्य सार्वजनिक शालेय कार्यक्रमात ताई 'प्रमुख अतिथी' म्हणून आमंत्रित होत्या. ठरलेल्या वेळेत त्या पोहोचल्या. पण... कार्यक्रमाची सुरूवात कितीतरी वेळाने झाली. दरम्यान सवयीने मी सर्वत्र सर्वांनाच न्याहाळत होते. इतरांच्या तुलनेत जाणवले कि, आरंभाचा गोंधळ मिश्किल मुद्रेने अनुभवत ताई शांतपणे स्थिर

बसून होत्या. चेहे-यावरची प्रसन्नता जराही ढळली नाही आणि देहबोली मधे कुठेही नाराजी दिसत नव्हती. कार्यक्रमात विद्यार्थ्यांना उद्देशून बोलताना त्यांच्यातील शांत, सौम्य पण प्रगल्भ व प्रेरणादायी व्यक्तिमत्व विलक्षण ऊठून दिसले. कदाचित त्याचमुळे त्याच संयोजकांकडून भविष्यातील पुढचा कार्यक्रम अधिक रेखीवपणे साकारलेला मी पाहिलाय.

गेल्या काही वर्षांमधे ताईंशी प्रत्यक्ष संपर्क कमी झालाय. पण माझ्या युवावस्थेतच संगतिमुळे त्यांच्यातील सद्गुणांचे संक्रमण स्वतःमधे करवून घेता आले, हे मी माझे भाग्य समजते.

ताईंना स्वस्थ व निरामय आयुष्याच्या शुभेच्छा देत असतानाच ईश्वराला प्रार्थना कि, ताईंचे सुबुद्ध सान्निध्य पुन्हा लाभो आणि जीवनाचे सार्थक होवो..!!

**श्रीमती संगीता सुरेशजी जाधव**

युद्धकला, योगविद्या व संस्कार कार्य उपासक- साधक- प्रसारक

*************************************************************************

शांत अन हसरा चेहरा
अंतर्मनी ठाव देई
पाहूनच लवुनी जावे
आतून प्रेरणा येई

वात्सल्ये तृप्त ती नजर
करी वर्षाव प्रेमाचा
त्या शीतलशा दृष्टीत
भास अथांग सागराचा

वाणीने वर्षाव अमृताचा
श्रवणे कर्ण तृप्त होती
सहवासे त्यांच्या लाभे
या श्रांत जीवाला शांती

या वर्धापनदिनी ती आज
प्रार्थना ही परमेशाला
दीर्घायुरारोग्य लाभो
या सद्गुरु स्वर्णलतेला

**अपर्णा सहस्रबुद्धे**

*************************************************************************

लता ताईंची अणि माझी पहिली भेट 1989 साली जेव्हा बालविकास शाळा ज्ञान प्रबोधिनी कडे हस्तांतरित करण्यात आली. त्याच वर्षी माझ्या मुलाला त्या शाळेत प्रवेश घेतला होता. माझ्या सासुबाई राष्ट्र सेविका समितीचे काम करीत होत्या. त्यांनी सांगितले लता ही माझी मैत्रिण कुसुम ताईंची मुलगी आहे. बस, प्रथम मला त्यांची एवढीच ओळख. मग त्यांनी मला शाळेत दलावर शिकवायला बोलावले. तिसरी ते सातवीच्या मुलांना जिम्नॅस्टिक्स, दोरीवर चा मल्लखांब, सूर्यनमस्कार, योगासने शिकवताना मी शाळेची कधी होऊन गेले हे देखील कळले नाही. जी गोष्ट मला शाळेतील मुलांसाठी हवी असायची ती प्रत्येक गोष्ट मी थेट लता ताईंना सांगत असे अणि मला ती मिळत असे.
नंतर मी शाळेत नव्हते तरी योग परिषदेच्या उपक्रमांना शाळा उपलब्ध करून देण्यात लता ताईंची नेहमीच संमती राहिली. इतकेच नव्हे तर योग सूत्रे असोत की निर्वाण षटक 15 ते 20 जणांच्या समुदायासमोर देखील त्यांनी अतिशय तन्मयतेने त्यावर भाष्य केले.
कधीही भेटायला गेल तरी शांत, हसत मुख चेहरा,आतिथ्यशील स्वभाव या त्यांच्या गोष्टी सर्वांनाच आकर्षित करून घेतात. पण हल्ली त्या सोलापूर मध्ये रहात नाहीत त्यामुळे भेटणे खूप कमी होते. पण मनोमन त्या गुरुस्थानी आहेत हे नक्की.
त्यांना निरामय आरोग्य लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना!
**सौ स्नेहल पेंडसे** 94036 94530
***********************************************************************

डॉ. शुभांगी आणि डॉ. जगदीश ठाकुर यांच्या दोन कन्यांनी २००९ मध्ये आण्णांना व लताताईंना लिहिलेलं पत्र
Hi Latha Mavshi and Anna,
Your letter could not have come at better timing! We were waiting so expectantly for it and it came on the perfect day, when both us were feeling exasperated and words of love and encouragement from those for whom we have unparalleled love and respect were the perfect antidote!
You guys mean SOOO much to us; kharas we must have done something good in our past lives to get the privilege of having you in our lives, and that too - as friends of mommy (she thinks the same too =)). Thank you for having faith in us, it has such a galvanizing effect in us, so inspirational and we hope to live up to these ideals set by you and mommy! If we achieve even a fraction of the work that you guys have done with Prabodhini, we will be successful.
We do not know our potential life partners yet; much to mommy's worry, actually. Hopefully, we will know soon, if anything, for her sake =)
Latha Mavshi, you know I have been meditating every morning now at 5:30 since the new year began as you had recommended it. It has been a nice calming way to start the day, hopefully can keep it up.
We think of you guys often and all the fun times we had with you and miss you both so much!! So far away, but your potent words provide such strength and support for us - Thank you so much for the beautiful letter! With love always
Uma-Gouri
***********************************************************************

प्रिय लताताई
सादर नमस्कार ।
अभ्यासात बरी असलेली मी ,हुशार मुली असलेल्या प्रबोध शाळेत तुमच्या मुळे आले । लताताई , devotion आणि प्रामाणिकपणा या प्रबोधिनीने दिलेल्या शिदोरीवर पुढची माझी वाटचाल सुकर झाली । अनेक संकट आली, तुम्ही दिलेल्या मानसिक ताकदीवर ती पार करता आली ।
नेतृत्व गुण, माणसांना handle करण्याची कसब , निर्णय घेण्याची क्षमता या सर्व  मला माझ्या कामाच्या ठिकाणी आवश्यक गोष्टी होत्या , त्याच पाया प्रबोधिनीत रचला गेला । त्या  वेळी आपण काय शिकलो काय आत्मसात केले हे लक्षात येत नाही पण जेव्हा वेळ येते तेव्हा कळत जाते अरे हे तर आपण प्रबोधिनीत शिकलो आहोत ।
मी दहावीत असताना माझ्या डोळ्याचे operation झाले होते , दहावीत मार्क काही चांगले नव्हते मी नर्व्हस झाले होते , लताताई तुम्ही त्यावेळेस मला त्या अवस्थेतून बाहेर काढले होते । मला नवीन दृष्टी मिळाली याकडे बघ असे सांगितलेत । आणि  खरच नवीन दृष्टी तुम्ही दिलीत ।
तुमच्या घरी अनेक वेळा राहायला आले त्यावेळी तुम्ही केलेले लाड , आज मागे वळून बघताना सगळे आठवते आहे ।
मधल्या काळात प्रत्यक्ष भेट नाही घेता अली पण तुम्ही शिकवलेल्या मार्गावरून जात होते आणि मनात तुमची आठवण कायम होती ।
लताताई तुम्हाला खूप खूप शुभेच्छा आणि नमस्कार ।
**गीता तांबे** 9881151281
***************************************************************************

आदरणीय लताताई,
सप्रेम नमस्कार.
लताताई, तुम्ही माऊली जगाच्या।
परमप्रेम आकळे, संगे हो तुमच्या
ज्ञान-ध्यान- कर्म, जगून दावता।
आत्मरत नित्य, सुबोध करता।।
प्रेरणास्त्रोत सामाजिक कामांचे।
साम्ययोग दर्शन, सेतु हृदयांचे।
लेखनीं वाचनीं, सदा तुम्ही रत।
आम्हांसाठी कष्ट, घेता अविरत।।
शौर्य न् क्रांती; ओघवत्या वक्तृत्वें।
उपनिषद, सत्संग; भक्तिभावें।
तुमचा आदर्श, आनंद प्रसन्न।
दीर्घायुष्य लाभों, आरोग्यसंपन्न।।
**- अनुराधा राव**
***************************************************************************

प्रिय लताताई,
वाढदिवसानिमित्त तुम्हाला मनःपूर्वक शुभेच्छा !
अध्यात्ममार्गावरील तुमची साधना परिपूर्णतेला जावो ही शुभकामना !
**नलू (नलिनी उजळंबकर)**
*************************************************************************

प्रिय सद्भक्त लताताईंस ,
सप्रेम सादर नमस्कार .

तुमचं स्मरण झालं की त्याबरोबरच परमपूजनीय स्वामी माधवनाथांचे स्मरण प्रकर्षाने तीव्र होते याचे कारण तुम्हीच वारंवार केलेल्या प्रेमळ आग्रहामुळे प्राणप्रिय सद्गुरूंची प्रथम भेट घडली . त्याबद्दल मी तुमची आमरण ऋणी आहे .ब्युटी क्लॉथ स्टोअर्समधील त्या भेटीतच स्वामीजींनी ,"आता मीच तुझी आई आहे . आता कसलंही दु:ख करायचं नाही ,"या शब्दांत आश्वस्त करून या जिवाचा अंगीकार केला .केवळ तुमच्यामुळे सद्गुरूंचा लाभ होऊन जीवन परमार्थाच्या मार्गावरून चालू लागले याचा विसर कधीही झाला नाही आणि होणारही नाही .

मातोश्री कुसुमताईंमुळे स्वामीजींनी भागेश्वरनिवासात प्रथमच व्यक्तिगत भेटीसाठी बोलावले , त्यातून अनुग्रहाचा सुयोग आला .

मला कावीळ झाली तेव्हा स्वामीजींनी सांगितले म्हणून भारतीताईने घरी येऊन औषधोपचार सुचवले होते . या व अशा अनेक घटनांमुळे मी आपल्या सर्व भिशीकर कुटुंबीयांची सदैव आभारी आहे .

ज्ञान प्रबोधिनीतील आपल्या सुखद सहवासातील कितीतरी आठवणी आहेत .त्यात रमण्यात आनंद आहे .

स्वामिकृपेने परमार्थात तुम्ही साधलेल्या प्रगतीबद्दल सादर आनंदाची भावना मनात आहे .उत्तरोत्तर अंतिम ध्येयापर्यंत आपल्या सर्वांचाच साधनाप्रवास स्वामीजींच्याच कृपाशीर्वादाने सहजसुलभतेने घडो आणि त्यासाठी आवश्यक उत्तम आयुरारोग्य लाभो, ही त्यांच्याच पावनचरणी प्रार्थना !

' सर्वेऽपि सुखिन: सन्तु सर्वे सन्तु निरामया: |
सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चित् दु:खमाप्नुयात् || '
ही परमेश्वरचरणी प्रार्थना !

**नीला (नीला देशमुख)**
*************************************************************************

**मैत्र जीवाचे**

मा. लताताई आपल्या सगळ्या प्रबोधकाना वेगवेगवेगळ्या रूपात माहित अहेत. युवती विभाग प्रमुख, प्रतिभा विकसन संशोधिका आणि शिक्षिका, गुरू म्हणून त्या परिचित आहेत. तसच आनंदी गाण्यापासुन ते राष्ट्रप्रश्न आणि अध्यात्माच्या गूढ गंभीर संकल्पनावर कौशल्याने फिरणारी त्यांची सिद्धहस्त लेखणी आणि अमोघ वाणि माहित आहे. “मरुभूमिवर उभी रहातिल विभवे सुख मंदिरे " हे स्वप्न समर्पण बुद्धीने आणि धैर्याने साकारणारी कार्यकर्त्या म्हणून ही आपल्याला त्या महित आहेत.

त्यांच्या अष्टपैलु व्यक्तित्वाचे अनेक पैलू अनेकानी अनुभवले असतील.
पण माझ्या अगदी साध्या दोन तिन आठवणी आहेत.

शाळा संपल्यावार  तीन दशकं लताताई  बरोबार नियमित संपर्क रहिला नाही. पुढे काही निमित्ताने पुन्हा एकदा जुन्या स्नेहाला उजाळा मिळाला.  विशेष म्हणजे यावेळेला त्याच्या आणि माझ्या आई मधे एके आपुलकी चा बंध निर्माण झाला.
तशी माझी आई साधी संसारी स्त्री. तिचा आणि  लताताईच्या आयुष्याचा मार्ग खूप वेगळा होता. पण कदाचित एक सात्विक  आणि स्नेहल हृदयाला दुसर्या तशाच हृदयाची ओळख पटली असावी. त्या दोघिंची मैत्री जमली. त्या पुण्यात आल्यावर आतिशय व्यस्त कार्यकमातूनही  तिला भेटायला यायच्या.
ही मैत्री आईच्या आजारपणा च्या काळात ही कायम राहीली.
आईचे निधन झाल्यावर जेव्हा त्यांना कळले की मी प्रबोधिनी पद्धतीने श्राद्ध संस्कार करणार  तेव्हा त्यानी स्वतःहून सांगितले की  त्या स्वतः ते  करतील.
नेमकी त्या वेळी लताताई ची प्रक्रुती खूप खालावली. तरीही केवळ ईच्छा शक्ती च्या बळावर त्या  आल्या आणि त्यानी ते विधी उत्तम रितीने पार पाडाले. (विशेष उल्लेख असाकी मा. हेमाताईनीही खूप सहकार्य केले)
लताताईनी आईशी जे मैत्र जोड़ले ते तिच्या जीवन काळातच नाही तर तिच्या मृत्युनंतर ही निभावले.  त्यानी मलाही संगिताले, आई नसली तरी हराळी हे तुझे माहेर समज आणि मला तुझी  सख्खी मैत्रीण समज. केवळ म्हणून त्या थांबल्या नाही तर  अगत्याने माझी हरळीला जाण्याची व रहाण्याची व्यवस्था स्वतः केली. त्या वास्तव्यात खरंच आमच्या दोघीमधे गुरु शिष्य या नात्या बरोबर मैत्रीच ही नातं निर्माण झालं.
हराळीला असताना मला त्याची व्रुक्ष वेलीशी असलेली मैत्री ही पाहिला मिळाली.
तिथे असंच संध्याकाली आम्ही दोघी चालत होतो.
एक चिमुकली एक चकचकीत गारगोटी घेउन धावत आली आणि लताताईन  दाखवून म्हनाली, ताई, हे बघा मला काय मिळालं. त्या छोट्या चेहर्यावर  खूप मोठा खजिना मिळाल्यासारखा आनंद पाहून, त्या म्हणाल्या, आता असं कर अजून एक अशीच दुसरी मिळते का बघ  आणि ती मला दे, एक तुला एक मला. मग मी पण तुला माझ्याकडची एक गंमत देईन आणि ही देवाण घेवाण झाली की मग आपण दोघी पक्क्या मैत्रीणी. ते बघून, माझं मन अचनाक चार दशकं मागे गेलं, मैत्रीणीची गाभुलेली चिंच घेऊन बदल्यात तिला आपला आवळा द्यायचा आणि  आपली मैत्री आता पक्की असा  निरागस विश्वास आणि निष्पाप आनंद देणारे ते बालपण आठवले.
प्रौढत्वातही निरागसता जपणारी लताताईची सहृदयता  आणि त्या चिमुकलीशी जमलेलं त्याच मैत्र मला चकित करुन गेलं.
या आठवणीं साध्याच आहेत. पण  वय, शिक्षण,  समाजिक स्थान याच्या  पलिकडे  जाउन अगदी सहज सुन्दर मैत्र जिवाचे जोडणे सोपं नाही.
एक निर्मल निरहंकारी मनुष्य आणि शुद्ध आत्माच ते घडवून आणू शकतो.
चांगला गुरु लाभणे हे शिष्याचं भाग्य है पण त्याचं ' मैत्री मधे रूपांतर होणे  भाग्य अगदी विरळ आहे. ते मला आणि अनेक प्रबोधिनीच्या विध्यार्थ्याना लाभलं आहे.
ज्ञानेश्वर आणि ज्ञानेश्वरी त्याच्या जिव्हाळ्याचा विषय आहे म्हणून त्या भाषेतच म्हणते सर्व सामाजिक  फरक ओलांडून मैत्र जीवाच सहज साधू शकणार्या लताताई  निश्चितच "ईश्वर निष्ठाची मांदियाळी" मधल्या एक आहेत. त्याना उत्तम आयुष्य आरोग्य लाभो ही प्रार्थना.
लताताई, मी तुमच्या सारखी  लेखिका नाहीं पण तुम्हीं निश्चितच " वरलिया रंगा' भुलणार नाही म्हणून म्हणते
लेख डोंगा परि भाव नोहे डोंगा

**सुप्रिया क्षीरसागर**

******************************************************************************

मा स्वर्णलताताई भिशीकर
आमच्या सर्वांच्या लाडक्या, प्रसन्न हसणाऱ्या, मायेचा प्रेमळ हात पाठीवरून फिरवणाऱ्या लताताई तुम्हाला ७० व्या वाढदिवसा निमित्त अनेक शुभेच्छा !!!
लताताई तुम्हाला व मला २०१९ साली स्वच्छंदानंद संस्थेचा ' नवदुर्गा ' पुरस्कार मिळाला. तो पुरस्कार स्वीकारताना इतका अभिमान वाटला. कारण तुम्ही माझ्या गुरु. तुमचे 'आनंदी गाणे' म्हणत आम्ही मोठे झालो आणि हा पुरस्कार मला योग क्षेत्रामधील कामासाठी मिळाल्याबद्दल .
तुमच्या डोळ्यात ते 'आनंदी गाणे' मला दिसले व मी धन्य झाले.
तुमच्या उत्तुंग सामाजिक कामासमोर माझे काम अगदी छोटे आहे हेही मी जाणते. पण तुमचा आशिर्वाद आम्हा सर्व युवतींना मिळत राहिल्यामुळे नक्कीच आम्ही सुद्धा चांगले काम करू. तुमचे आशिर्वाद असेच कायम मिळावेत.
जिवेत शरद: शतम,
पश्येम शरद: शतम |
सुदिनं सुदिनं सर्व दिनं ||
आपलीच प्रिय,
**विदुला बुरसे - शेंडे**
(१९८१- १९८७ बॅच, ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे)
***********************************************************************

प्रिय लताताईंना,
70 व्या वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा.
मला एक वेगळीच आठवण या निमित्ताने सांगायची आहे.
प्रबोधिनीत मी नव्यानेच यायला लागले होते. इथे आपल्याला नवनवीन कौशल्ये आत्मसात करायला लागतात त्यात वाहन चालवता येणे हेही आवश्यक कौशल्या पैकी एक, महत्वाचे.
गायत्रीताईंनी त्यांच्या scooter वर सप महाविद्यालयाच्या मैदानावर मला 2 दिवसात स्कूटर चालवायला शिकवली. मी त्यावेळी गाडी प्रथमच हातात घेतली होती. मैदानावरच्या २ दिवसाच्या कौशल्यावर , त्यांनी मला बैठकीसाठी सोलापूरहून लताताई येणार होत्या, त्यांना शिवाजीनगर बस स्थानकातून घेऊन यायला सांगितले. ही बैठक ज्ञाप्र सदाशिव पेठेत नसून, निगडीच्या शाळेत होती. त्याकाळी (८८/८९) इतकी गर्दी नसली तरी माझ्या सारख्या नवशिक्या व्यक्तीने लताताईंवर हा प्रयोग करावा, याचा चांगलाच ताण आला होता. शिवाजी नगर स्थानकातून वेध शाळेच्या चौकात येईपर्यंत स्कूटर ४/५ बंद पडली. मग मात्र लताताई म्हणाल्या तू गाडी इथेच कुठेतरी park कर, आपण रिक्षाने निगडीला जाऊ. मी लताताईंना विनंती केली, एकदा प्रयत्न करते, नाही जमले तर मग रिक्षाने जाऊ. मग देवाचे नाव घेत गाडीला kick मारली, आमचा प्रवास सुरु झाला. हळूहळू का होईना, गाडी न बंद पडता चालत राहिली, एकदम चिंचवडलाच बंद झाली. मग पुरेसा आत्मविश्वास आला होता. पुढचा निगडी पर्यंतचा प्रवास सुखरूप न थांबता झाला. चिंचवड पर्यंत मी बहुदा गाडी फक्त first gear मध्येच चालवली. अपेक्षेपक्षा आम्ही किती उशीरा पोचलो, हे आता लक्षात नाही. पण सांगितलेले काम पूर्ण केले, लताताईंनी ठेवलेल्या विश्वासाला, त्यांच्या धारिष्ट्याला शतशः प्रणाम !
**सुप्रिया गोडबोले कुमठेकर**
***********************************************************************

प्रिय लताताई,
खरंतर आदरणीय असे लिहायला हवे पण त्याही पलीकडे तुम्ही प्रिय आहात !!
जन्मदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा !
सगळ्यात पहिल्यांदा एकदा संवादिनीच्या बैठकीत तुम्हाला भेटले त्यानंतर झालेल्या प्रत्येक भेटीतल्या तुम्ही लक्षात आहात
तुमचा खूप गोष्टींमध्ये आदर्श ठेवायचा प्रयत्न करते पण ते १०% सुध्दा जमतंय अस वाटत नाही
तुमच्या प्रेमळ स्वभावाचा आणि हसत हसत पाठीवर हात ठेवून कशी आहेस विचारण्यातला आपलेपणा कायम हवाहवासा वाटतो.
तुमची जिद्द , अभ्यास , आणि सगळ्यांवरची माया हे सगळं अनेक गोष्टींमधून आठवत रहात.
मी जेव्हा तृतीय प्रतिज्ञा घेतली तेंव्हा खूप मनात होत की हराळीला राहून काही काम करूया.
तुमच्याकडून आणि आ.आण्णांकडून काही शिकूया पण ते राहूनच गेलं.
पण तरीही मी स्वतःला भाग्यवान समजते की सौरभमुळे मी प्रबोधिनीत आले. संवादिनीमुळे जोडली गेले त्यामुळे थोडस का होईना पण तुमच्या सहवासात येता आलं.
असेच तुमचे प्रेम आणि माया आम्हाला दीर्घकाळ मिळो ही इच्छा !!
तुम्हाला आरोग्यपूर्ण दीर्घायुष्य मिळो ही परमेश्वर चरणी प्रार्थना !
तुमची,
**मानसी बापट**
**************************************************************************

**लताई**
सप्तत्यब्दिपूर्तिनिमित्तेन शताब्दिपूर्त्यर्थं विनम्रतापूर्वकं भूयांसि भूयांसि शुभचिन्तनानि ईश्वरं प्रति प्रार्थनाश्च !!!
जन्मदिनमिदं मङ्गलमयं सुखकारकम् आनन्दमयं भवतु इति शुभाशया: समर्प्यन्ते !!!
या निमित्ताने १९८३ पासूनचे अर्थात् ३०-३५ वर्षांपूर्वीचे लताताईंच्या सहवासातले प्रसंग आठवले.
पंजाब दौऱ्यामध्ये आपल्या भावमधुर तरीही ठामपणा असलेल्या स्वरात पंजाबी बंधुभगिनींशी संवाद साधणाऱ्या लताताई, एका गुरुद्वारात ताणाची परिस्थिती निर्माण झाली असताना धैर्यपूर्वक त्या परिस्थितीला हाताळणाऱ्या लताताई मला आठवतात. पुण्याला येतानाच्या प्रवासात त्या आजारी पडल्या असताना तो प्रवास कधी संपतोय असं वाटण्यासारखं जे काही घडलं ते आज पुन्हा तपशीलासह आठवतंय.
'एक अदम्य उत्कट चैतन्य' हे आप्पांचे चरित्रलेखन करताना अखंड त्यामध्येच रमलेल्या लताताई पाहाण्याचं भाग्य मला मिळालं आहे. त्याची मुद्रणप्रत तयार करण्यासाठी मी ही गणेशवाडीतल्या लताताईंच्या घरी कितीतरी दिवस जात होते. 'ते हि नो दिवसा: गता:' असे ते छान दिवस होते असं आता मागे वळून पाहाताना वाटतंय. लताताईंच्या वत्सलतेचा अनुभव त्याच काळात पहिल्यांदा घेतला. तेव्हाच लताई असं मनातल्या मनात त्यांना अनेकदा संबोधलं आहे. आता गंमत वाटेल पण तेव्हा काही वेळा लताताईंबरोबर भाजी आणायला गेल्याचं सुद्धा आठवतंय. एकदा तापानं आजारी पडले असताना लताताई, त्यांच्या आई कुसुमताई आणि बापूसाहेब सर्वांनीच घेतलेली माझी काळजी आणि त्या काळात गणेशवाडीतच केलेला मुक्काम अगदी तसाच्या तसा आठवतोय. घरी आणि प्रबोधिनीतही वाढदिवसानिमित्त लताताईंनी अनेकदाऔक्षण केलं आहे हे माझं भाग्यच आहे !
लताताई या सिद्धहस्त लेखिका- कवयित्री ही ओळख तर सर्वांनाच आहे. आण्णांबरोबर काम करताना कोणतंही लेखन असू दे पत्र असो किंवा वृत्त ते लताताईंच्या लेखणीतून उतरलेलं असेल तर ते 'रमणीयं वाक्यं काव्यम् '

असायचंच ! त्यांनी लिहिलेली पद्य म्हणताना त्यांच्या काव्यप्रतिभेपुढे मनापासून नतमस्तक व्हायला होतं. सूरही अर्थवाही असले की त्या शब्दांची अनुभूती येतेच येते. 'हे ऋषिवर श्री अरविंद' हे पद्य म्हणताना आजही विलक्षण आनंदानुभव येतो.
सोलापूरची शाळा प्रबोधिनीकडे आल्यानंतर पहिल्याच वर्षी लताताईंच्या मार्गदर्शनाखाली सोलापुरी काम करण्याची संधी मिळाली. अवंतिकाबाईंशी लताताई ज्या पद्धतीने संवाद साधत असत त्यातून माझं खूपच शिक्षण झालं. सोलापुरात नवीन काम सुरू करताना अनेक अनुभव घेण्याची संधी लताताईंमुळे मिळाली.
रत्नागिरीमध्ये लताताई आलेल्या असताना काही वेळा त्यांची भेट झाली आहे, त्या घरीही आल्या आहेत आणि त्यांचा प्रेमळ सहवास लाभला आहे याचा मला खूप आनंद आहे.
सर्वार्थानं महान असलेल्या वंदनीय लताताईंचा सहवास, प्रेम आणि मार्गदर्शन लाभलं ही ईश्वराची कृपाच आहे !
खरं तर तीर्थरूप लताताईंना शुभेच्छा देण्याची माझी योग्यता नाही परंतु मनातला सद्भाव व्यक्त करण्याची संधी मात्र घेते आहे. त्यांना आयुरारोग्यसम्पन्नता लाभो यासाठी पुनश्च ईशचरणी विनम्र प्रार्थना !
**कल्पना भालेकर- आठल्ये**
**********************************************************************

प्रिय आदरणीय लताताई,
सादर आणि सप्रेम नमस्कार .
खूप दिवसांत प्रत्यक्ष भेट झाली नाही आणि सध्याच्या परिस्थितीत लगेचच भेटता येईल असे वाटत नाही.
म्हणूनच पत्राद्वारे आपल्याशी संवाद साधण्याचा हा प्रयत्न.
खूप वर्षांत पत्राद्वारे संवाद झाला नाही. मोबाईल फोन आले नव्हते तेव्हा बरे होते. आपल्याशी पत्राद्वारे संवाद सुरू राहायचा. कधी मधी फोनवर गप्पा बोलणे सुरू आहे. पण पूर्वीसारखा पत्रसंवाद, हितगुज बऱ्याच वर्षांत झाले नाही.
तुम्हाला वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी आणि तुमच्याकडून हक्काचे आशिर्वाद घेण्यासाठी लिहिती झाले.
प्रपंचात गुरफटून गेलेल्या लेकीला आईचा विसर पडावा आणि तिच्याकडून काहीच संवाद नसावा असं काहीसं झाले आहे ...
पण आई नेहमीच मुलीला समजून घेते ...आणि... मग काय होते ... मग मुलीकडून अनेक गोष्टी आईला सांगायाच्या म्हणजे आताच्या भाषेत शेअर करायच्या राहूनच जातात...
मी तुम्हाला पहिल्यांदा पाहिले आणि ऐकले ते मला अजूनही लख्ख आठवते आहे
इ ५ वीत, आमच्या कन्यका प्रशालेच्या वर्गात तुम्ही उपासना शिकवायला आला होतात...
‘चिदानंद रूप: शिवोहऽम’...तुम्ही असे काही समजावून सांगितले की मला उपासना खूप आवडूनच गेली. मी घरी जाऊन सगळ्यांना उपासना म्हणूनच दाखविली की .... आमच्या शाळेत अशी उपासना करतात......
नंतर विद्याव्रताच्या निमित्ताने पुन्हा या उपासनेच्या अर्थाला उजाळा मिळाला तो तुमच्या आणि नीलाताई देशमुख यांच्या व्याख्यानामुळेच ...
मग मी आणि सुवर्णा दोघींनी संकल्प केला... आणि शाळेत असताना नियमितपणे प्रबोधिनितील सकाळच्या उपासनेला यायला लागलो ...
आणि .... आजही कोणत्या ना कोणत्या स्वरूपात उपासना सुरु आहे .....
आम्ही युवती विभागाचे काम करीत असताना तुमच्या घरी रविवारी बैठकीला यायचो....
बैठक घेण्याचे तंत्र आणि मंत्र तुमच्याकडून शिकलो ...

आणि अभ्यास शिबिरे. युवती विभागाच्या पहिल्या पदव्युत्तर गटा साठी  दर वर्षी अभ्यास शिबिर व्हायचे ते तुमच्या पुढाकारने...
रामदास अभ्यास शिबीर ते  प्रत्यक्ष पोंडीचेरी येथे जाऊन अनुभवलेले माताजी आणि अरविंद अभ्यास शिबीर ...
या शिबिरांमध्ये तुमचे आमच्या बरोबर राहाणे, तुमच्याबरोबर गप्पा, ही आमच्यासाठी पर्वणी होती...
आता लक्षात येते की तुम्ही कितीतरी गोष्टी एकाच वेळेस पार पाडत होतात. आताच्या  भाषेत multi tasking.
तुमचे दैनंदिन कामाचे व्याप सांभाळत इतक्या प्रकारच्या विषयांची तयारी करत होतात... आम्हाला प्रबोधिनीने स्वीकारलेल्या पथकाधिपतींचे विचार, हिंदुत्वविचार आणि आचार समजावे यासाठी सतत प्रयत्न करत होतात ...
आजही त्या वेळी केलेला अभ्यास उपयोगी पडतो....नव्हे तुम्ही संपूर्ण आयुष्याच्या प्रवासला पुरतील एवढे तहानलाडू भूकलाडू तुम्ही आम्हा अनेकजणींना  बांधून दिलेत... त्या वेळी  ते मोलाचे आहे हे समजत होते ...आता त्याचे मोल किती किती आहे हे थोडे थोडे उमगू लागले आहे ...
प्रबोधिनीच्या  कार्यकर्त्यांना अध्यात्माचा पाया असलाच पाहिजे असा तुमचा आग्रह. तुमच्या मुळे  आम्हाला "जगावेगळे अध्यात्म " समजून घेण्याची  संधी मिळाली, तीही प्रत्यक्ष वंदनीय विमलाजींच्या कडून. जीवनयोग शिबीर... खरोखरच असे अनुभव घेताना त्या वेळी फारसे समजत नाही. अश्या गोष्टींचे मोल कळते ते आयुष्याचा पुरेसा अनुभव घेतल्या नंतरच...
लताताई, आताच्या कार्यकर्त्यांसाठी  "जगावेगळे अध्यात्म" समजण्यासाठी तुम्ही 'जीवनयोग' शिबीर ठरवाल का? आम्ही सगळयाजणी शिबिरातील सर्व प्रकारच्या व्यवस्था पाहू... सर्व खाती नीट सांभाळू...
तुमच्याविषयीचा आदर आणि श्रद्धा नितांत वाढली तो प्रसंग ... स्थळ टिळक स्मारक मंदिर ... रामकृष्ण मठाच्या त्या वेळच्या अध्यक्षांचे, स्वामी रंगनाथानंदांचे इंग्रजीतून व्याख्यान... आणि तुम्ही अनुवादक ... त्यांचे वाक्य पूर्ण होता होताच तुमचा सहज असा मराठी अनुवाद ...
तो अनुवाद होता? की  ते होते अनुमोदन, आत्मनुभवातून आलेले....
आता उमगते रामकृष्ण मठात तुमची व्याख्यानमाला का असते?
ताई तुम्ही किती उंचावरून आमच्याशी संवाद साधत होतात आणि आताही साधत आहात...
आयुष्याच्या या टप्प्यावर, तुमच्याकडे बघत, लांबूनच एकलव्य पद्धतीने शिकते आहे... समजून घेते आहे...
तुकारामांच्या या अभंगाचा अर्थ...
चंदनाचे हात... पायही चंदन... परिसा नाही हीन कोणी अंग...
**परिसाचा स्पर्श** आम्हाला झाला आहे... पण आम्ही मातीच बनलेले आहोत का लोहकणांचे?
... हा आत्मसाक्षात्कार बाकी आहे...
मला वाटते ताई, आता तुम्ही आमचे एक अभ्यास शिबीर घ्याच, आवश्यकता आहे त्याची आम्हाला.
तुमचीच
**संगोडी तीळपांडे** (तुम्हीच ठेवलेले नाव) - **संगीता कुलकर्णी**
**************************************************************************

**नातं**

आपलं नातं घट्ट विणीचं
कधी कसं बांधलं गेलं
कळलं नाही कुणालाच

आपलं नातं काळाचं भान नसलेलं
तरीही वेळेला तत्पर असणारं
टणक खडकाच्या आधाराचं

आपलं नातं अलवार फुलणारं
तप्त ऊन्हातल्या सावलीसारखं
सीमीत गहिऱ्या खोलीचं

आपलं नातं गोडवा जपणारं
सुख दु:खात सोबत असणारं
निष्पाप निर्मळ प्रेमाचं

आपलं नातं खोल रूजलेलं
हलक्या हातांनी शिंपलेलं
असलेल्या प्रगाढ विश्वासाचं

आपलं नातं विसाव्याचं
खोलवर जाणलेल्या संवेदनांचं
नितळ स्वच्छंद पाण्याचं

आपलं नातं शब्दांचं
कधी शब्दांपलीकडल्या
अथांग पसरलेल्या नि:शब्दाचं

आपल नातं बंधन नसणारं
शाश्वत निरंतर टिकून रहाणारं
कुपीत दरवळणाऱ्या अत्तराचं

**अनिता**
*************************************************************************

**सत्वगुणस्वर्णलताला शरीर स्वास्थ्यासाठी वाढदिवसाच्या दिवशी विशेष शुभेच्छा व विनम्र अभिवादन !**

पुण्यात 'कमलराज' मधील देवघरात रामदास स्वामींचे एक पूर्णाकृती चित्र होते. महाविद्यालयातल्या दिवसांत आणि नंतरही पुण्यात जेव्हा जेव्हा जाणं घडलं तेव्हा मी त्या घरी गेले की आई देवांपुढचा नैवेद्य प्रसाद घे, म्हणायच्या.दरवेळी प्रसाद घेताना चित्रावर नजर गेली की रामदास 'मला लतामधे पहा'असं सांगताहेत, असं वाटायचं , आणि तिच्या स्नेहाचाच प्रसाद मिळाला, असं मनात येई.

असं म्हणतात की वाल्मिकींनी रामायण आधी लिहिले आणि नंतर रामाने ते चरितार्थ केले, तसं मला नेहमी लताचं सगळं आचरण रामदासांनी दिलेल्या आदर्शांना व्यवहारात आणणारं वाटत आलं आहे.' मनाच्या श्लोकां'मधील श्लोक ४७ ते५६ हे दहा श्लोक खऱ्याखुऱ्या अर्थाने आचरणात आणत असलेली लता माझीही आहे, याचा दिलासा हा अद्वितीय अनुभव आहे.

ते श्लोकच तिचे यथातथ्य वर्णन करतात, ते असेः

मनी लोचनीं श्रीहरी तोचि पाहे
जनीं जाणता भक्त होऊनि राहे
गुणीं प्रीती राखे क्रमू साधनाचा
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा

सदा देवकाजीं झिजे देह ज्याचा
सदा रामनामे वदे नित्य वाचा
स्वधर्मेचि चाले सदा उत्तमाचा
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा

सदा बोलण्यासारिखें चालताहे
अनेकीं सदा एक देवासि पाहे
सगुणीं भजे लेश नाही भ्रमाचा
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा

नसे अंतरी काम नानाविकारी
उदासीन जो तापसी, ब्रह्मचारी
निवाला मनीं.लेश नाही तमाचा
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा

मदे मत्सरे सांडिला स्वार्थबुद्धी
प्रपंचीक नाही जयाते उपाधी
सदा बोलणे नम्र वाचा सुवाचा
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा

क्रमी वेळ जो तत्वचिंतानुवादे
न लिंपे कदा दंभवादे विवादे
करी सूखसंवाद जो ऊगमाचा
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा

सदा आर्जवी ,प्रीय जो सर्वलोकीं
सदासर्वदा सत्यवादी, विवेकी

न बोले कदा मित्थ्यवाचा त्रिवाचा
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा
सदा सेवि आरण्य तारूण्यकाळी
मिळेना कदा कल्पनेचेनि मेळीं
चळेना मनीं निश्चयो दृढ ज्याचा
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा
नसे मानसी नष्ट आशा दुराशा
वसे अंतरीं प्रेमपाशख पिपाशा
ऋणी देव हा भक्तिभावे जयाचा
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा
दिनाचा दयाळू, मनाचा मवाळू
स्नेहाळू, कृपाळू जगीं दासपाळू
तया अंतरीं क्रोध संताप कैंचा
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा
जयजय रघुवीर समर्थ।

असा समर्थ स्नेहसंस्पर्श मला सदैव लाभला,म्हणून देवाला आणि लताला आभारपूर्वक विनम्र नमस्कार.देव तिला उदंड, निरामय आयुष्य देवो, ही मनापासून विज्ञापना. हरि ओम्

**मीनाक्षी-सुखमणि (सुखमणि रॉय)**

*************************************************************************

मा. स्वर्णलताताई भिशीकरांशी माझी प्रत्यक्ष भेट फार उशिरा झाली. ताईंनी हराळी येथे उभं केलेल्या कामाबद्दल अनेक वर्षं मी ऐकून होते. त्यांनी अनुवादित केलेली अनेक पुस्तकंही वाचली होती. त्यांचे वेद-उपनिषदांचे अध्ययन - त्यावरची प्रवचनं याबद्दल खूप काही ऐकलं होतं. त्यामुळे लता ताईंना भेटायची खूप उत्सुकता होती. पूज्य विमला ताई ठकार यांचे सान्निध्य मला 2007 साली मिळाले. त्यावेळीही विमला ताई अनेकदा स्वर्णलता ताईंचा उल्लेख करीत. त्या दोघींचं सख्यत्व काही वेगळंच होतं. माणूस घडणं म्हणजे काय त्याचं मूर्तिमंत उदाहरण म्हणजे ‘स्वर्णलता’ असं ताई म्हणत. “हराळी सारख्या भूकंपग्रस्त आणि दुष्काळग्रस्त भागात राहून फक्त सामाजिक कार्य करणं कदाचित सोपं असू शकतं. पण त्या जोडीला आध्यात्मिक साधना करत राहणं – आध्यात्मिक जीवन जगणं हे तितकं सोपं नसतं. अध्यात्म जगणं हा देखील एक पुरुषार्थ आहे” हे विमलाताईंनी लताताईंबद्दल म्हटल्याचं मला आठवतंय. त्यामुळे लताताईंना भेटायची खूप उत्सुकता होती. ओळख व्हावी म्हणून मी आधी माझे ‘नर्मदा परिक्रमा-एक अंतर्यात्रा’ हे पुस्तक त्यांना भेट म्हणून पाठवलं. त्यावर त्यांनी काही प्रतिक्रिया द्यावी म्हणून मी विनंती केली आणि काय आश्चर्य ! आठवड्याच्या आतच त्यांनी पुस्तकाचे चारपाच पानी सुंदर असे परीक्षणच पाठवले. ते परीक्षण म्हणजे माझ्यासाठी एक अनमोल ठेवाच आहे.
माझी आणि लताताईंची पहिली भेट पुण्याला त्यांच्या घरी गायत्री सेवक हिच्यामुळे झाली. ताईंच्या आई तेंव्हा खूप आजारी होत्या. तरीही ताईंनी आस्थेने चौकशी केली. भरपूर वेळ दिला.

2018 सालच्या डिसेंबर महिन्यात एक दिवस अचानक पुण्याच्या नातू फौंडेशन ची ईमेल आली. त्यात मध्य प्रदेशातील निमाड क्षेत्रात जे काही कार्य आमच्या नर्मदालय या संस्थेच्या माध्यमातून होत आहे त्यासाठीचा पुरस्कार जाहीर केला होता. 09 जानेवारी 2019. रोजी तो पुरस्कार आम्हाला मा. लताताईंच्या हस्ते दिला जाणार होता. पुरस्कारा पेक्षाही मला आनंद तो लताताईंच्या हस्ते मिळणार याचा होता. अभिनंदनाचा पहिला फोन मला लता ताईंचाच आला. 'दुग्धशर्करा योग' म्हणावा तसं ताई म्हणाल्या, "12 जानेवारीला हराळी येथे ज्ञानप्रबोधिनीच्या शाळेतील मुलांचा विद्याव्रत संस्कार आहे त्याला तू यावंस असं आम्हाला वाटतं. 11 जानेवारीला आपण पुण्याहून माझ्या गाडीने बरोबरच निघू."

11 जानेवारी 2019 चा तो पुणे - सोलापूर प्रवास म्हणजे माझ्यासाठी एक संस्मरणीय असा सत्संगच होता. विमला ताईंच्या सान्निध्यात एका वेगळ्याच मन:शांतीचा अनुभव आला. वाटलं, आपल्या शेजारी बसलेली व्यक्ति म्हणजे 'Personification of divine peace' आहे. विमला ताईंनी म्हटल्याप्रमाणे 'The peace and quietness are the fragrance of the silence and equanimity within' चा प्रत्यय लता ताईंच्या व्यक्तिमत्वात येतो. इतकी प्रगाढ विद्वत्ता असलेल्या व्यक्तीबरोबर माझ्यासारखी एवढ्या लांबच्या प्रवासात काय बोलणार? आमच्या दोघींच्या आवडीचा एक विषय होता "विमलाताई ठकार'. त्यांच्या आठवणीत आम्ही रमलो.

12 जानेवारीला रात्री जेवणानंतर आम्ही दोघी त्यांच्या खोलीत बसलो होतो. अत्यंत मौल्यवान वस्तू जपून ठेवावी तसा जपून ठेवलेल्या विमलाताईंवर त्यांनी केलेल्या काही कविता त्यांनी मला दाखवल्या. फारसा कुणी न पाहिलेला तो अनमोल ठेवा बघण्याचं, वाचण्याचं भाग्य मला लाभलं. त्या मनोगतात्मक कवितेत लताताई म्हणतात –

आशीर्वाद अेवढाच दे
की आमचीही चेतना तुझ्या प्रमाणे
होवो विमल, विमुक्त.
आमचं प्रेम होवो
सत्याचंच दुसरं नामरूप
आमची जागलेली प्रज्ञा
घेवो उमेदीनं भरारी.

लताताई, हा आशीर्वाद तुम्ही विमला ताईंकडे मागितलात. त्यांनी तो मनोमन दिलाही असणार तुम्हाला. तुमच्या सत्तराव्या वाढदिवसाबद्दल मन:पूर्वक शुभेच्छा ! पण एक मागणं आहे. हाच आशीर्वाद तुमच्या साऱ्या सुहृदांच्या वतीने आम्ही आज तुमच्याकडे मागत आहोत.

**भारती ठाकूर**
नर्मदालय, लेपा पुनर्वास (बैरागढ), तालुका कसरावद, जिल्हा खरगोन, मध्य प्रदेश - 451228

**************************************************************************

प्रिय वंदनीय लताताई
सादर सप्रेम नमस्कार

तुमच्या सत्तराव्या वाढदिवसाच्या निमित्ताने लिहिताना मन अनेक आठवणींनी भरलेलं नि भारलेलं आहे... सुमारे १९७६-७७ पासून आपलं एकत्र येणं, गणेशवाडीतील ‘कमलराज’मधले अनेक मुक्काम नि तिथल्या पायऱ्यांवर रात्री चांदण्यात गप्पा मारणं, टेकडीवर फिरायला जाणं, एकमेकींना लिहिलेली भावसंपुटात जपून ठेवावीत अशी अनेक पत्रं, रविवार बैठक, युवती विभागातलं आणि संचालक कार्यालयातलं काम, प्रतिज्ञाग्रहणाचे कार्यक्रम, अनेक प्रकारची शिबिरं व एकत्र प्रवास, सोलापूरला एकत्र नांदणं व काम करणं, सरस्वतीचा वरदहस्त लाभलेल्या तुमच्याकडून अभ्यास शिबिरांमध्ये व सत्संगात श्रवण करणं, सिद्धेश्वर मंदिरातील तलावाकाठी बसून निवांत गप्पा मारणं, नात्यातले चढउतार अनुभवणं, प्रबोधिनीच्या दैनंदिन कामातून थांबल्यावर आठ वर्षांनी माचणूरला झालेल्या हृद्य भेटीतून आपण मनाने वेगळ्या राहू शकत नाही हे सिद्ध होणं... अशा नि अन्य कितीतरी छोट्या छोट्या स्मृती...!

‘कमलराज’ हे कधीच फक्त भिशीकरांचं घर नव्हतं... या संपूर्ण कुटुंबाचं मन वैश्विकच होतं. त्यामुळे कुसुमताई व बापूसाहेब या दोन पुण्यात्म्यांचा अकृत्रिम स्नेह अनेकांना लाभला. संगीता, मी अशा काहींसाठी तर भारतीताई, क्रांतीताई व नंतर शुभाताई या तिघींची घरंही अगदी जवळची होती. आई-बापूसाहेबांचा तोच खोल जिव्हाळा तुमच्यातही किती सहज उतरला... शिवाय आप्पांकडून आलेला स्नेहशक्तीचा अक्षय कोश... आणि तुमच्यात जन्मजात असलेलं ‘यशोदे’चं मृदू वात्सल्य... तुमच्या मऊसूत हस्तस्पर्शातलं लाघव... हे सगळं जगभरात अनेकानेक मंडळींपर्यंत अथांगपणे पोचत राहिलं आहे याचं प्रत्यंतर या संकलनाच्या निमित्ताने परत एकदा आलं.

आई-बापूसाहेबांकडून तुम्हाला मिळालेल्या राष्ट्रभक्तीच्या बाळकडूचं रूपांतर आप्पांच्या सहवासाने अधिक जाज्वल्य निष्ठेत झालं... आणि तुमच्यातील तरलहृदयी कवयित्रीला हिंदुभूमीच्या गौरवात श्रेय गवसलं आणि ती पूर्ण समर्पित कार्यकर्ती झाली ! तुमच्या कुशाग्र बुद्धिमत्तेने तुम्ही स्वतःला कामासाठी योग्य असं घडवत नेलंत. उत्तम यशासह स्वतःचं लौकिक शिक्षण, व्यासंग-वक्तृत्व-नेतृत्व यांसह व्यक्तिमत्त्व विकास, प्रबोधिनीच्या माध्यमातून अनेक ठिकाणी विविध प्रकारचं सामाजिक काम, घरातूनच मिळालेल्या आध्यात्मिक वारशामुळे स्वामी माधवनाथांच्या व विमलाजी ठकार यांच्या कृपाप्रसादाने आणि नियमितपणे केलेल्या साधनेने घडून आलेला आध्यात्मिक विकास, त्याच्या आधारे विविध संप्रदायांतील साधकांच्या आध्यात्मिक प्रगतीसाठी सहजतेने घडणारं मार्गदर्शन, ललित-राष्ट्रीय-आध्यात्मिक अशा अनेक प्रकारच्या पुस्तकांचं एकटाकी लेखन व अनुवाद आणि याच्या जोडीने कामाच्या स्थानी असलेल्या कार्यकर्त्यांचं सहजपणे होणारं मृदू वात्सल्ययुक्त आईपण-- असे अनेक प्रकारचे आयाम नि तशीच उंचीही असलेलं तुमचं व्यक्तिमत्त्व... आणि आता तर हे दोन्ही आणखीनच गडद झालेलं...! मी त्या मानाने फारच साधारण व्यक्तिमत्त्व असलेली... पण तरी आपल्यात एका हळव्या गभरेशमी मैत्रीचे धागे विणले गेले... यात काही ईश्वरी योजनेचा आणि पूर्वसंचिताचा भाग असावा हे निःसंशय ! तुमच्या ठायी माझ्या मनात शिक्षिका, गुरू, आई, मोठी ताई, मैत्रीण-- अशी अनेक नाती जोपासली गेली आहेत.

सदा सूर्य डोळ्यांत जागे तरीही
विरागी स्मितांतून ओला जिव्हाळा

असीमान्त स्पर्शून नीडात येता
विसावा मिळाला इथे वादळाला
... हे अशोकरावांनी तुमच्यासाठी लिहिलेलं मी साक्षात अनुभवलं आहे. पण असा विसावा कधीतरी तुम्हालाही गरजेचा असेलच ना? तो कसा नि कोणाकडून मिळत असेल बरं? आतूनच मिळवत राहिलात तुम्ही तो... !!

सुमारे २४-२५ वर्षांपूर्वी सरलताईंच्या सांगण्यानुसार 'कन्हेरी संदेश'साठी तुमच्यावर 'जे तपोतेजाचिया राशी' अशा शीर्षकाने एक लेख लिहिला होता. वर उल्लेखलेल्या सगळ्या गोष्टी आणि आयुष्यभर शरीराची फारशी साथ नसतानाही सर्व कामांमध्ये असलेला तुमचा कामाचा झपाटा, अनंत कामांच्या धावपळीतूनही अनेकांची (त्यांत मीही आलेच) सहज-निरपेक्ष सेवा, सरस्वतीचा वरदहस्त लाभलेली ओघवती वाणी, विलक्षण प्रासादिक काव्यप्रतिभा, विविध सामाजिक वर्तुळांतील आणि आध्यात्मिक संप्रदायांतील व्यक्तींशी असलेले स्नेहसंबंध, मिळालेले अनेकानेक पुरस्कार-- अशा अनेक गोष्टी आत्ताही डोळ्यांसमोर आहेत. या सगळ्यांतून तुमचं 'स्वर्णलता' हे अनोखं नाव सार्थ ठरलं. देवाने तुम्हाला एकाच जन्मात किती समृद्ध करून या भूतलावर पाठवलं आणि ती वैभवसंपदा तुम्ही किती छानपणे जोपासलीत... अतिशय दुर्मीळ आहे हे !! तथापि या सगळ्या वलयातील लताताईंना शब्दांत उतरवावं असं मनात येईना. माझं स्वतःचं सामाजिक अंग विलग झाल्यामुळे असेल कदाचित किंवा एका विशिष्ट काळानंतर हे सगळंच गळून पडतं, म्हणूनही असेल... तुमच्या सामाजिक व्यक्तिमत्त्वाला लेखणीने आत्ता स्पर्शही करावासा वाटत नाहीये ! आणि सहाच महिन्यांपूर्वी निगडीच्या पुरस्काराच्या मानपत्रासाठी ते सगळं लिहून झालंही... ! शिवाय हे सगळं लिहूनही तुम्हाला शब्दांत बांधता येईल असं नाही... त्यामुळे या सर्वांच्या पलीकडच्या माझ्या लताई माउलीपर्यंत आभाळमाया पोचवण्याशिवाय नि मन भरून शुभेच्छा देण्याशिवाय काहीही मनात उमटत नाहीये...

कोणत्याही दोन माणसांचं असतं तसंच आपल्यातही सगळंच छान, सुखाचं, गुळगुळीत होतं असं नाही. आपल्यात एकमेकींच्या न रुचणाऱ्या काही गोष्टी होत्याच. सोलापूरला सातत्याने एकत्र राहू लागलो तेव्हा त्या अधिक ध्यानी येऊ लागल्या. बरेचदा आपलं एकमत असे तसंच क्वचित घटनांना दिले जाणारे प्रतिसाद वेगवेगळे असत. त्यामुळे आपणही एकमेकींना सोसलं, पचवलं, नि त्यातून अधिक प्रगल्भ झालो... कामासाठी अधिक योग्य झालो. एकत्र कामाचा, सहचिंतनाचा, संवादाचा पुष्कळ आनंद आण्णा, तुम्ही आणि मी तिघांनीही घेतला... त्या स्मृतीही जाग्या आहेत... पण आता दोघीही इतकी वाट चाललो आहोत की हे सगळंच खूप मागे पडलं... 'झाले मोकळे आकाश' अशी छान भावना आहे... !!

तुम्ही मला अनेकार्थांनी घडवलंत पण तुम्ही दिलेली अत्युच्च भेट म्हणजे अध्यात्माचा- मनुष्यजीवनातील अंतिम ईप्सिताचा- संस्पर्श ! अनेकांना तुम्ही बोटाला धरून पूजनीय स्वामींकडे नेलंत. माझ्या भाग्याने त्यांत मीही होते. ११ वीच्या वयाला हे भाग्य वाट्याला आलं तेव्हा आपल्या पदरात काय पडलंय हे फारसं कळलं नव्हतं. हळूहळू उलगडत गेलं नि आता केवळ तेच एकमेव गंतव्य उरलं आहे... त्या घननीळ परमात्म्याच्या दर्शनार्थ क्षितिज खुणावतं आहे... आत्मारामाच्या वाटेवर पोचण्यासाठी तुम्ही माझ्यासाठी 'श्रीमत् हनुमानकीलकम्'सदृश झालात. या सुखनिधानाची वाट रेखून दिल्याबद्दल मी तुमची जन्मोजन्मींची ऋणी झाले आहे. स्वामीजींच्या चरणी नतमस्तक होण्यापूर्वी आत्यंतिक कृतज्ञतेने आपोआपच तुम्हाला नमस्कार होतो. मागच्या महिन्यात स्वामीजींच्या या जन्मातील अनुग्रहाला ४० वर्षं पूर्ण झाली... अजून अध्यात्मसाधनेतील अंतरंग स्थिती गाठता आलेली नाही...

तथापि तुमच्या, पूजनीय स्वामीजींच्या आणि सर्व संत-सद्गुरूंच्या आशीर्वादांनी परमोच्च स्थिती गाठता येईल आणि स्वस्वरूपी राहणं निश्चितच जमेल असा विश्वास वाटतो.

दिनकर मावळतीकडे झुकू लागतो तेव्हाच्या त्याच्या नितांतसुंदर रंगच्छटा मनाला मोहून टाकतात नि एक शांतिमय अस्तित्व सृष्टीला व्यापून राहतं... तसं तुमचं तेजोमय अस्तित्व जगाला उजळून टाकत असलेलं पाहताना मनाला निखळ आनंदाने मोहून टाकतं. तुमच्यासाठी लोकांनी लिहिलेलं सगळं वाचायला सवड झालेली नाही पण पूजनीय गोविंददेवजी गिरि, सुखमणिताई, भारतीताई ठाकूर इत्यादींच्या अगदी निवडक लेखनाची सोनेरी किनार अनुभवता आली. या कामात माझे गेले काही दिवस 'लताई'मय झाले... त्याचं निखळ समाधान मिळालं. लोकांनी अगदी सहजपणे लेखन पाठवलं. तुमचं माझ्यावर असलेलं ऋण कधीही फिटू शकणार नाही पण या संकलनाच्या निमित्ताने त्यातले काही आणे फिटले तर स्वतःला धन्य समजेन ! सुरुवातीला लिहिलं आहे तसं तुम्हाला याचा काही त्रास झाला तर तो रोष स्वीकारण्याची मानसिक तयारी आहे.

आता थांबते. तुमची सर्व लौकिक व्यवहारांतील निवृत्ती तुमच्या मनासारखी आणि योग्य वेळी घडून येवो. ज्या अनेकानेक संत-साध्वी व सत्पुरुषांच्या अकृत्रिम स्नेहछायेत तुम्ही सहजपणे आलात त्या सर्वांच्या कृपेने तुम्हाला सर्वांग-परिपूर्ण अशा अंतिम आध्यात्मिक स्थितीचा लाभ होवो आणि जीवन सुफल-संपूर्ण होवो ही प्रार्थना !!
तुमच्या आयुरारोग्यासाठी कुशलप्रार्थना आणि या पत्रातूनच छानसे देवचाफे देऊन मनापासून नमस्कार व आशीर्वादप्रार्थनापूर्वक खूप प्रेमासह,
गायत्री **(गायत्री सेवक, पुणे)**
****************************************************************************

